ाखा, ठाणे.
e1.....
2

म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय :.....निबंध.....
सं.क्र. : २९७०

REFBK-0023444

संदर्भ ग्रंथ (सामाजिक)
२९७
२३१११
२७/२/८२

आदिवासी प्रश्न

डॉ. गोविंद गारे

REFBK-0023444

आदिम प्रकाशन, पुणे ४११ ००१

© डॉ. गोविंद गारे
सौ. पार्वती गारे

पहिली आवृत्ती :
१५ ऑगस्ट १९७५

दुसरी आवृत्ती :
१ जानेवारी १९८२

प्रकाशक :
आदिम् प्रकाशन
श्री. शशिकांत रा. साबळे
४०६ सोमवार पेठ,
पुणे ४११ ००१

मुद्रक :
नंदकिशोर लाहोटी
नंदा प्रिंटर्स,
२७३ नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ :
श्री. ल. म. कडू

किंमत १० रुपये



तिर्थरूप आईस

नितांत श्रद्धेने

मनोगत

समाज प्रबोधन संस्थेने माननीय शंकरराव देव यांच्या जीवन चिंतनाला अभिवादन करण्याच्या भावनेने ' भारतीय प्रबोधन, या नावानी शंकरराव देव गौरव ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथासाठी समाज प्रबोधन संस्थेने आदिवासींच्या प्रश्नांसंबंधी सविस्तर लेख लिहिण्याचे काम माझ्यावर सोपविले. संस्थेच्या विनंतीला मान देऊन एक प्रदीर्घ लेख मी या गौरव ग्रंथासाठी लिहिला. कालांतराने हा प्रदीर्घ लेख पुन्हा सविस्तर लिहिण्याचे मी ठरविले. ही छोटीशी पुस्तिका हा त्या लेखाचाच सविस्तर भाग आहे. या निमित्ताने आदीवासींच्या प्रश्नासंबंधाने विचार प्रगट करण्याची व पुस्तिकेच्या रूपाने मराठी वाचकांपुढे ठेवण्याची संधी मिळाली. त्याबद्दल अल्पसे समाधान वाटते. पुस्तिका प्रकाशित करण्याची जबाबदारी आदिम् प्रकाशनाने उचलली, त्याबद्दल त्यांचा मी खरोखर ऋणी आहे.

डॉ. गोविंद गारे

पुरस्कार

ग्रामीण भागातील आदिवासी हा आपल्या समाजाचा एक अति दुर्बल घटक. स्वातंत्र्यपूर्व काळात हा घटक पूर्णपणे उपेक्षित राहिला. जन्मजात बुजरेपणामुळे, डोंगर दऱ्याखोऱ्यांत, जंगलातदूरवर कुठेतरी एका बाजूला राहत असल्यामुळे त्यांचा इतरांशी संपर्क आला नाही. अलिप्त राहण्याची त्यांची प्रवृत्ती वाढत गेली. आदिवासी समाजात घडत असणाऱ्या गोष्टींची त्यामुळे इतरांना कल्पना आली नाही व इतरांनीही आस्थेने त्यांची कधी चौकशी केली नाही. त्यांच्या विभागात फारसे कोणी गेले नाही, जे गेले ते स्वार्थासाठी, त्यांना लुबाडण्यासाठी. त्याचा परिणाम असा झाला की हा समाज सतत लुबाडला गेला. त्यांच्या मालकीच्या जमिनी गेल्या. ते भूमिहीन झाले. पिढ्यान् पिढ्याच्या कर्जात ते गाडले गेले. त्यांच्या कष्टावर, त्यांच्या उत्पादनावर दुसरे गबर झाले आणि ते मात्र सतत उपेक्षित आणि शोषितच राहिले.

स्वातंत्र्यानंतर या उपेक्षित समाजाची दुःखे कमी होतील अशी अपेक्षा होती. परंतु आज जे दिसते आहे त्यावरून आदिवासींच्या पदरात फारसं काही पडलेलं नाही. उलट त्यांच्या उपजीविकेची साधने हिरावून घेतली जात आहेत, त्यांना त्यांच्या झोपड्यांत राहाणं अशक्य झालं आहे. ससेहोलपट व्हावी तशी त्यांची अवस्था झालेली आहे. आदिवासींमधील नेतृत्वही त्यांना दिशा देण्यात यशस्वी ठरले नाही. आदिवासींच्या चळवळी संघटित करून त्यांची पिळवणूक थांबविण्याची प्रक्रिया आदिवासी विभागात अद्याप सुरू झालेली नाही. शैक्षणिक संस्था, विविध शासकीय योजना, आदिवासी सेवा मंडळे यांच्या माध्यमातून आदिवासी विभागात जाणिव जागृती करण्याचे काही प्रयत्न चालू आहेत. पण त्यातून अद्याप 'नवा आदिवासी' बाहेर आलेला नाही. आदिवासींच्या प्रश्नांचे स्वरूप नीट समजून न घेतले गेल्यामुळे साधनांची व साध्याची निश्चिति नेमकी होत नसावी असे वाटते. प्रस्तुत पुस्तिका त्या दृष्टीने सर्वांना आत्मपरिक्षण करावयास लावणारी आहे. डॉ. गारे यांनी या पुस्तिकेत त्यादृष्टिने विचार प्रगट केलेले आहेत. आदिवासींना, आदिवासी कार्यकर्त्यांना, आदिवासी भागात काम करणाऱ्या सेवा संस्थांना, आदिवासी तरुणांना या पुस्तिकेचा उपयोग होईल व आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकता येईल असा मला विश्वास वाटतो.

१ जानेवारी १९८२

श्री. बाबुरावजी मडावी
महाराष्ट्र प्रदेश आदिवासी सेवा मंडळ,
नागपूर

अनुक्रमणिका

१.	महाराष्ट्रातील आदिवासी	१
२.	सामाजिक जीवन वैशिष्ट्ये	४
३.	सामाजिक प्रश्न	८
४.	आर्थिक जीवनाचे प्रश्न	१९
५.	कर्जबाजारीपणा आणि आर्थिक शोषण	२६
६.	आदिवासी भागातील आर्थिक विकास व शिक्षणाची दिशा	३१
७.	खाजगी वनजमिनी, जंगलजमिनी आणि वनविषयक प्रश्न	३७
८.	आदिवासी विकासाच्या योजना आणि काही मुलभूत प्रश्न	४३
९.	घटनात्मक तरतूदी, सवलती आणि काही प्रश्न	४५
१०.	आदिवासी सेवा कार्याची दिशा	५२
११.	आदिवासींच्या ऐतिहासिक लढ्यांची दिशा	५२
१२.	सामाजिक परिवर्तनाची दिशा	५७
१३.	एकसंघ समाजजीवनाच्या दिशेने	६२
	★ परिशिष्ट नं. १	६८
	★ परिशिष्ट नं. २	७०
	★ परिशिष्ट नं. ३	७२
	★ परिशिष्ट नं. ४	७४



: १ :

महाराष्ट्रातील आदिवासी

आदिवासी हा शब्द aboriginal या इंग्लिश शब्दावरून आला आहे. युरोपियन लोकांनी जेव्हा अमेरिका, दक्षिण आणि पूर्व आफ्रिका, ऑस्ट्रेलिया ह्या भूप्रदेशांत वसाहती स्थापल्या तेव्हा आधीपासून तिथे राहणाऱ्या रहिवाशांना त्यांनी aboriginal आदिवासी (मूळचे रहिवासी) असे नाव दिले. भारतातील लोकांबद्दल मात्र त्यांनी Native (एतद्देशीय) ह्या शब्दाचा उपयोग केला. हिंदुस्थानात आर्यांचे आगमन होण्यापूर्वी अनेक 'टोळचा' Tribes राहत होत्या. तेच या देशाचे मूळ रहिवासी. त्यांना 'भूमिज', 'भूमिजन', 'आदिम' अशाहि नावांनी ओळखले जाई. भारतीय संविधानात ह्या टोळचांना 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes) असा शब्दप्रयोग आहे. हा शब्दप्रयोग फार व्यापक व तितकाच तो मोघम आहे. 'आदिवासी किंवा मूळ निवासी' हाच शब्दप्रयोग त्यासाठी योग्य आहे. मूळ निवासी (aboriginal), टोळचा (Tribes), जमाती यांची काही वैशिष्ट्ये आढळून येतात. त्यांतील काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील. आदिवासी जमात म्हणजे असा एक समाज की,

१) जो रक्ताच्या आणि लग्नाच्या नात्यावर म्हणजे ज्याला आपण शरीरसंबंध म्हणत असू त्यावर आधारलेला;

२) निरनिराळे कुळे (clan groups) एकत्र येऊन बनलेला;

३) समाज म्हणून स्वयंपूर्ण राहणारा व समाजव्यवस्था, चालीरीती, समजुती या बाबतींत आपली मूळची वैशिष्ट्ये कायम राखणारा;

४) बेटीबंद कुलपद्धती असणारा;

५) प्राचीन व वेगळी संस्कृतीवैशिष्ट्ये असणारा, मुख्य समाज प्रवाहापासून दूर, मुख्यतः डोंगर दऱ्या खोऱ्यात, जंगलांत, दुर्दम्य प्रदेशांत एका बाजूला एकांगी राहणारा व आधुनिकतेपासून दूर असणारा;

६) प्राचीन विनिमयव्यवस्था व जीवनावस्था, अलिखितभाषी, बुजरा व निसर्गावलंबित, प्राणीपूजक वैशिष्ट्ये असणारा समाज. वांशिक दृष्ट्याहि ते विभिन्न गटातले आहेत.

१९४५–४६ पर्यंत महाराष्ट्रात आदिवासी राहतात याची कल्पनाहि महाराष्ट्रातल्या सामान्य जनतेला नसावी. १९४५–४६ ला वारल्यांनी ठाणे जिल्ह्यात जे बंड केले व जो रक्तपात झाला त्यामुळे वारल्यांचे नाव महाराष्ट्रभर माहीत झाले. ते देखील आदिवासी आहेत, मागासलेले आहेत, गरीबीने पीडलेले आहेत, गुलामीने गांजलेले आहेत अशा अर्थाने नव्हे, तर ते क्रूर आहेत, जंगली आहेत, भयंकर विश्वासघातकी आहेत अशा अर्थाने. सामान्य जनता 'वारली कोण' असे प्रश्न विचारू लागली. 'आदिवासी' हे नाव त्यावेळी रूढ झालेले नव्हते. त्या काळी आदिवासी लोकासंबंधी सामान्य लोकांत गैरसमज आणि भयंकर कल्पना असत. ते दुराचारी, दुष्ट, क्रूर आणि विश्वासघातकी आहेत अशी लोकांची कल्पना होती. खरे पाहता रामायणमहाभारताच्या काळापासून हिंदू समाजाशी संबंध येऊन देखील पुराणवाङ्मयात त्यांचे वर्णन 'कावळ्यापेक्षा काळे', 'धरतीचे पापी प्राणी', 'नरभक्षक', 'लुटारू' वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते. त्यामुळे लोकांमध्ये त्यांच्या संबंधाने गैरसमज असणे स्वाभाविक होते. भौगोलिक दृष्ट्याहि ते बाह्य समाजापासून नेहमीच दूर म्हणजे गिरिकंदरात राहिल्यामुळे आदिवासी शबरीसारखे मवाळ आणि भक्त आहेत याची कोणाला कल्पना देखील आली नाही. सामाजिक दृष्ट्या त्यांना भारतीय समाजात स्थानच नव्हते व सामाजिक प्रतिष्ठाहि नव्हती. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांपेक्षाहि त्यांना खालच्या दर्जाचे स्थान होते. एक गोष्ट मात्र तितकीच खरी, हिंदू समाजातील कनिष्ठ थरांच्या अस्पृश्यापेक्षा त्यांचा मागासलेपणा निराळा होता. हिंदू समाज आदिवासींना कधी अस्पृश्य मानत नव्हता. पण त्याबरोबरच कोणत्याहि स्पृश्य समाजात हिंदू समाजाने त्यांची गणना केलेली नव्हती.

गेल्या तीस वर्षांत आदिवासी जीवनासंबंधी लोकांना बरीच माहिती झालेली आहे. १९३५ ते १९५० च्या दरम्यान भिल्ल सेवा मंडळ, डांग सेवा मंडळ, आदिवासी सेवा मंडळ, जंगल कामगार सोसायटचा यांसारख्या सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाचे काम करणाऱ्या अनेक संस्था आदिवासी विभागात स्थापन झाल्या. त्यांच्या कार्याला आणि सेवेला आज पुष्कळच गती मिळाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात आदिवासी कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने आणि नव्या प्रेरणेने अनेक सामाजिक संस्था निर्माण केल्या आहेत. शासनाच्या मदतीने त्यांचे हे कार्य चालू आहे. शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या विविध योजनांद्वारेहि सामाजिक सुधारणेचे व बदलाचे कार्य आदिवासी समाजात चालू आहे.

भारतात एकूण आदिवासींची संख्या चार कोटी पंचवीस लाख एवढी आहे. महाराष्ट्रात सुमारे ४० लाख आदिवासी राहतात. देशाच्या व राज्याच्या लोकसंख्येच्या मानाने ही संख्या जरी फारशी मोठी नसली तरी एवढ्या मोठ्या

लोकसंख्येचा हिस्सा मागासलेला, दारिद्र्याने पीडलेला आणि सावकार, जमीनदार यांनी नागवलेला, पिळलेला, शोषलेला आहे हे दृष्टीआड करून चालता येणार नाही. हे जे चाळीस लाख आदिवासी महाराष्ट्रात राहतात ते विशिष्ट एका जमातीचे लोक नाहीत. महाराष्ट्रात त्यांच्या ४४ जमाती आहेत. त्यांपैकी काही प्रमुख आदिवासी जमाती विशिष्ट अशा प्रादेशिक विभागात राहतात.

महाराष्ट्रात आदिवासी वस्ती असलेले तीन प्रादेशिक विभाग आढळतात. (१) सह्याद्री विभाग, (२) गोंडवन विभाग व (३) सातपुडा विभाग. सह्याद्री विभागात वारली, महादेवकोळी, कातकरी, ठाकर व कोकणा ह्या जमातीची वस्ती प्रामुख्याने आहे. सातपुडा विभागात भिल्ल, मावची, गावीत, पावरा व धानका जमातींची तर गोंडवन विभागात गोंड, कोलाम व परधान जमातींची वस्ती मुख्यतः आढळते. आदिवासींच्या ह्या प्रादेशिक विभागात भौगोलिक दृष्य मुख्यतः तीन पट्टे आढळतात. (१) दुर्दम्य विभाग, (२) सखल विभाग व (३) ग्रामीण विभागाच्या शेजारचा प्रदेश. ह्या भौगोलिक पट्ट्यांचे प्रश्न व त्या भागात राहणाऱ्या आदिवासीचे प्रश्न हे एकमेकांमध्ये गुंतलेले आहेत. परिणामतः आदिवासीचे प्रश्न सोडविताना त्या प्रदेशातील प्रश्नांना प्राधान्य देणे महत्त्वाचे ठरते. प्रादेशिक प्रश्न सोडविताना आदिवासींच्या प्रश्नांना वगळून अगर विसरून तेथील प्रश्न सोडविता येणार नाहीत.

एका लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या जमातींत भिल्ल, महादेवकोळी किंवा डोंगर कोळी, गोंड, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, गावीत ह्या जमातींचा समावेश होतो. पन्नास हजार ते एक लाख या दरम्यान लोकसंख्या असलेल्या जमातीत कोरकू, कोलाम, परधान, मल्हारकोळी, धानका, आंध, ढोरकोळी ह्या जमातींचा समावेश होतो. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येच्या सुमारे ८२.५ टक्के लोकसंख्या ह्या जमातींचीच आढळते. ह्या जमाती प्रामुख्याने धुळे, ठाणे, नाशिक, चंद्रपूर, अहमदनगर, पुणे, यवतमाळ, अमरावती, जळगाव व नांदेड ह्या जिल्ह्यांतून आढळतात.

धुळे, नासिक, ठाणे, चंद्रपूर, अमरावती, अहमदनगर, पुणे, भंडारा, नांदेड जिल्हचांतील काही तालुक्यामध्ये आदिवासीची वस्ती सलग भागात ६० टक्क्यांहून अधिक प्रमाणात आढळून येते. महाराष्ट्रातील १५ तालुक्यात आदिवासीचे संख्याधिक्य ५० टक्क्याहून अधिक तर १६ तालुक्यांत हे प्रमाण २५ ते ५० टक्के आणि ३३ तालुक्यात ५ ते २५ टक्के आढळते.

आदिवासी विभाग आणि आदिवासी जमातीची वस्ती याचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे विशिष्ट जिल्हा किंवा तालुका विभागात विशिष्ट जमातीची वस्ती. ठाणे जिल्ह्यात मुख्यतः वारली, कातकरी, कोकणा, मल्हारकोळी व ठाकर

ह्या जमाती, धुळे जिल्ह्यात भिल्ल, कोकणा व गावीत ह्या जमाती तर अहमदनगर, पुणे जिल्ह्यात महादेव कोळी किंवा डोंगरकोळी व ठाकर, तर कुलाबा जिल्ह्यात कातकरी जमातींची वस्ती प्रामुख्याने आढळते. नाशिक जिल्ह्यात महादेव कोळी, कोकणा, भिल्ल ह्या जमाती आढळतात. अमरावती जिल्ह्यात कोरकू, यवतमाळ जिल्ह्यात कोलाम, चंद्रपूर जिल्ह्यात गोंड, परधान, नांदेड जिल्ह्यात आंध या प्रमुख जमातींची वस्ती आहे.

: २ :

सामाजिक जीवनवैशिष्ट्ये

आदिवासी जमातीची जीवनरहाटी इतर लोकांपेक्षा काहीशी निराळी आहे. त्यांची राहणी, रीतिरिवाज देवदेवकी, करमणूक, सामाजिक नीतिनियम, धर्मभावना, भाषा, आचारविचार, ह्यामध्ये इतर समाजापेक्षा पुष्कळच भिन्नता आढळते. मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा इत्यादी प्रांतामधील आदिवासींच्या तुलनेने महाराष्ट्रातील आदिवासी हा बाह्यसमाजात पुष्कळच मिसळत आलेला व एकरूप होण्याच्या मार्गावरील समाज आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील भामरागड विभागातील माडिया गोंड जमात फक्त याला अपवाद समजावी लागेल. हा गट अद्यापही नव्या संस्कृतिपासून दूर आहे. भाषा, संस्कृति, सामाजिक जीवन आणि लोकसंपर्क या दृष्टीने हा समाज इतर जमातींच्या मानाने खूपच मागासलेला आहे. भिन्नतेचे हे प्रकार महाराष्ट्रातील आदिवासींच्या बाबतीत साऱ्याच जमातींना लागू पडण्यासारखे नाहीत. काही जमातींची खास अशी काही वैशिष्ट्ये व वेगळेपणा असला तरी ते त्या भिन्नतेतून, वेगळेपणातून हळूहळू मुक्त होत आहेत. त्यामुळे त्यांची जुनी संस्कृती आणि समाजजीवनाचे अवशेष आजच्या बदलत्या आदिवासी समाजात काही विशेष प्रसंगालाच आढळून येतात.

महाराष्ट्रातील प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरिती व धार्मिकता यांच्यात सारखेपणा अगर एकविधता आढळत नाही. प्रत्येक जमातीची वेगळी अशी काही वैशिट्ये असतातच. प्रत्येक जमातीचा मानसिक पिंड व व्यापक अर्थाने सामाजिक जीवन त्यांच्या सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत

आलेल्या व रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनले आहे. त्यामुळे त्यांच्यात विविधता आढळते. असे असले तरी सर्वसामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्ये आणि वैशिष्ट्ये ही आदिवासी समाजात समान स्वरूपाची आहेत.

सर्वसामान्य आदिवासी हा भोळाभाबडा, अबोल, अलग, त्रयस्थाबरोबर शक्य तो बोलण्याचे टाळणारा, प्रामाणिक, पापभिरू, दैववादी, परंपरागत जीवन-दृष्टीचा, निसर्गसानिध्यात रमणारा, निसर्गावर प्रेम करणारा व जीवनाचा स्वच्छंदपणे उपभोग घेणारा असतो. तो वनवासी असला तरी त्याची राहणी त्याच्या निर्मळ अतःकरणाप्रमाणे साधी व स्वच्छ असते. त्याच्यातील आत्मीयता व सचोटी हे गुण लक्षात घेण्यासारखे आहेत. स्वतंत्र, स्वावलंबी, साधी राहणी, थोड्या गरजा, मर्यादित आशाआकांक्षा, रूढी, विधी, नातेवाईक, गावकरी ह्यांचा त्याच्या जीवनावर विशेष प्रभाव जाणवतो. जमात पंचायतीची व्यक्तीवरील निरंकुश सत्ता, स्थितीस्थापकत्वाचे दौर्बल्य, संकोची व बुजरी वृत्ती यांचाही प्रभाव आदिवासी जमातीच्या सामाजिक जीवनात आढळून येतो. त्याची जीवनाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी आहे. त्याच्या जीवनात पैशाला फार स्थान नाही. जमीन गुरेढोरे, बकऱ्या, कोंबड्या, मासे, खेकडे व श्रम करण्यासाठी मजबूत हातपाय हीच त्याची संपत्ती. आपणास हवे ते निसर्गातून व सभोवतालच्या साधनांतून मिळविण्याची शक्यता असेल तर आदिवासी स्वतःला अत्यंत सुखी प्राणी समजतो.

आदिवासींची गावे विशेषतः एकाच जमातीची आणि गटागटाने वसलेली असतात. त्यामुळे या भागात कारागीरवर्ग सापडत नाही. स्थानिक साधनांद्वारे घरे निर्माण करावयाची व १०–१२ झोपड्यांच्या गटाने रहावयाचे. याला ते पाडा, हाटी किंवा झाप म्हणतात. आदिवासींचे १०–१२ पाडे मिळून त्यांचे एक गाव होते. पाड्याचे नाव तेथे राहणाऱ्या प्रमुख कुलाचे, भौगोलिक स्थळाचे, वनस्पतीचे अगर प्राण्याचे असते. आदिवासींच्या झोपड्या लहान असतात. त्यांचे क्षेत्रफळ १०० ते २०० चौ. फूट असते. जनावरे बांधण्याची सोय घरातच एका बाजूला किंवा घराच्या शेजारी केलेली असते. आदिवासीच्या घरात रोजच्या गरजेइतकी भांडी देखील नसतात. घरात अन्नधान्य साठविण्यासाठी मातीची साठबणे केलेली असतात. काही ठिकाणी त्याला 'कणगुली' म्हणतात. त्याचा पेहरावही अगदी साधाच असतो. कमरेला लंगोटी किंवा गुढग्यापर्यंत लावलेला धोतराचा काच्या, अंगात कोपरी किंवा पेहरन असते. आदिवासी वर्षातून एकदोन कपडे घेतो. दुबळ्या आर्थिक परिस्थितीमुळे वारंवार कपडे घेणे त्याला शक्य नसते. प्रत्येक जमातीत स्त्रियांचा पेहराव वेगवेगळा आढळतो. कोकणा, महादेवकोळी, ठाकर जमातींच्या स्त्रिया डोक्यावरून 'फडकी' नावाचे वस्त्र घेतात. ते वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिझाईन केलेली असते. सातपुड्यातील भिल्ल समाजातील

स्त्रिया ९ वारी लुगड्याचे दोन तुकडे करतात. एक तुकडा नेसतात आणि दुसरा तुकडा डोक्यावरून घेतात. ठाकूर, भिल्ल, कातकरी जमातींच्या स्त्रियांचा पेहराव किंवा नेसू पद्धतीही वेगवेगळी आहे. स्त्रियांच्या दागदागिण्यांतही प्रत्येक जमातीत वेगवेगळी वैशिष्ट्ये आढळतात. आदिवासींपैकी महादेवकोळी, कोकणा, ठाकर आणि भिल्ल जमाती शेतीवर स्थिर होत आहेत. माडिया गोंड, कोलाम आणि कातकरी यांचे आर्थिक आणि सामाजिक जीवन अद्यापही अस्थिरच आहे. गावात अशुभ घडले तर माडिया गोंड गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी वस्ती करून राहतात.

जंगलात मिळणारी साधने जमवून झोपड्या बांधावयाच्या व आपले जीवन जगावयाचे. यात पैशाला व बाहेरच्या वस्तूला स्थान फार कमी. दळणवळणाच्या साधनाअभावी दूर दूर असणाऱ्या लोकांनी बाजारात जाऊन आपल्या वस्तू विकावयाच्या व त्यांच्या बदल्यात आपल्याला हव्या त्या वस्तु घ्यावयाच्या ही त्यांच्या जीवनाची आर्थिक घडण आहे. त्यांच्या जीवनप्रवाहाचे वर्णन तीन शब्दांत करता येईल. 'अन्न, दारू आणि स्त्री.' जीवनात प्रामुख्याने हव्या तीन वस्तू सहज सुलभतेने मिळविण्यासाठी त्यांची धडपड असते.

आदिवासींच्या धार्मिक व सामाजिक रूढी परंपरागत निसर्गपूजेतून निर्माण झाल्या आहेत. निसर्गातील निरनिराळी गूढ, आकाशात चमकणारी वीज, चंद्र, सूर्य, ढग, प्रचंड वृक्ष, वाघ, सिंह, साप, विंचू अशा नैसर्गिक वस्तूंची आणि प्राण्याची ते पूजा करतात. त्यांच्यात हिरवा, हिमाई, वनदेव, वडादेव, गावदेव, कणसारी, धरतारी, वाघदेव, वाघिया, चित्ता, डोंगरदेव अशा निसर्गातून निर्माण झालेल्या देवतांचीही पूजा केली जाते. ते आपल्या पितरांना देव मानतात. भूत, पिशाच्च देखील त्यांना देवासारखीच वाटतात. त्यांच्या पितरांचे देव लाकडाच्या ओंडक्यावर किंवा दगडावर कोरून गावाच्या बाहेर वेशीजवळ उभे केलेले दिसतात. निसर्गातील विविधतेचा उल्लेख त्यांच्या गाण्यांतून आढळतो. बऱ्याच आदिवासी जमातींनी हिंदू देवदेवतांनादेखील आपल्या धार्मिकतेत स्थान दिले आहे. मन्नादेवी महालक्ष्मी, चामुंडा, महादेव (बडादेव), नारनदेव, भैरोबा, खंडोबा, मारुती, इत्यादी हिंदू दैवते आदिवासींच्या खेड्यापाड्यापर्यंत पोहचली आहेत. आदिवासी देवदैवतावरोबर हिंदु देवदैवताचीही सर्वत्र पूजा होऊ लागली आहे. परंतु अद्यापही कॉलऱ्यासारखे साथीचे रोग आले तर भूत पिशाचाच्या कोपामुळे हे रोग निर्माण झालेत असे ते मानतात. साथीच्या रोगांत 'शिवबंदी', 'भूतपिशाच बंदी' यासारखे धार्मिक प्रकारही अनेक खेड्यांपाड्यांतून होतात. साथीचे रोग व अन्य रोगराई कशी उद्भवली आणि त्यावर उपाय काय करावयाचे हे शोधून काढण्यासाठी प्रत्येक गावात 'भगत' ही एक धार्मिक संस्था असते. 'भगताकडे दैवशक्ती असते, अनाकलनीय बाबी त्याला कळतात. त्यामुळे तो भूत भविष्य सांगू

शकतो व उपाय सूचवू शकतो' अशी आदिवासीची श्रद्धा आहे. भगतांमध्ये 'मुखिया', 'पानफोड्या', 'दगडफोड्या', 'राखोंड्या', 'अवतऱ्या' असे अनेक प्रकार आढळतात. सर्व आदिवासी जमातीत धार्मिक व सामाजिक विधीत दारूला विशेष स्थान आहे. जन्मल्यापासून पुढे लग्न, मृत्यू, पंचायत सभा, पाहुण्याचा सत्कार, सण, जत्रा, अगर कुठल्याही विशेष प्रसंगाच्या निमित्ताने एकत्र येणे झाले की दारूचा पाहुणचार होतो. काही जमातीत स्त्रिया, मुले, पुरुष, सर्व मंडळी दारू पितात. मूल जन्माला आले की त्याच्या तोंडात दारूचा थेंब टाकला जातो. मनुष्य मेल्यावरही त्याच्या तोंडात दारू घातली जाते. 'दारू आणि आदिवासी' असे हे समीकरण अतूट आहे. 'होरो', 'अंबिल', 'हंडिया', असे दारूचेच अनेक प्रकार आदिवासी विभागात प्रचलित आहेत. आदिवासीचे खास असे सण हिंदू सणाहून निराळे आहेत. 'नव्याचा सण, कोवळीचा सण, भंगोऱ्या सण, गाव दिवाळी, वाघबारस, गाव बांधणी' इत्यादिचा त्यात उल्लेख करावा लागेल. हे आदिवासी सण हिंदू सणाहून काहीसे निराळे आहेत. त्यांच्या हचा सणाबरोबरच दिवाळी, दसरा, होळी, सक्रांत हेही सण आदिवासी साजरे करतात. त्यामुळे हिंदू सणांचे व आदिवासी सणांचे रूप 'अर्ध-हिंदू अर्ध-आदिवासी' असे पहावयास मिळते. माडियागोंड, जमातीत तरुणतरुणींना एकत्र जमविण्यासाठी व समाज जीवनाचे शिक्षण देण्यासाठी 'गोटूल' ची प्रथा आढळते. 'घरघूशी, कोरड्यावर आणणे, पाट लावणे, झगडा, लमझाना, घरगडी, घरजावई, लग्नगडी, नांगऱ्या, सालदार, जागल्या,' इ. सामाजिक व विवाहविषयक प्रथा आदिवासी जमातीमध्ये आढळून येतात. जन्ममृत्यूचे संस्कार व प्रथा जमाती जमातीत वेगवेगळचा आढळतात. आदिवासी जमातीच्या बोली भाषाही भिन्न भिन्न आढळतात.

जीवनाला अत्यंत आवश्यक अशा अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या गरजा भागविण्यासाठी सर्व आयुष्य कष्टावे लागत असले तरी शिकार केलेल्या पशुपक्षांची चिरफाड करता करता आदिवासींनी आपले शरीरविज्ञान विकसित केले आहे. रात्री वेळ समजण्यासाठी तारांगणाचा अभ्यास करून त्यांनी वेळेचे ठोकताळे बसविले आहेत. जंगलाचा शिपाई, तलाठी, भटजी, तात्या, सावकार, शेट, वाडीवाला, इत्यादी पिळवणूक करणारांची सोंगे नृत्याचे वेळी पाहिली की आदिवासीवर अन्याय होत आहे व तो आगतिक व असहाय्य स्थितीत त्यास सहन करावा लागत आहे, हेच दर्शवितात. शिवाय बदला किंवा सूड घेण्याच्या त्यांच्या नैसर्गिक भावनेला वाट करून देऊन आदिवासींची मनःशांती ढळू न देण्यास सहाय्यभूत होतात. आदिवासीमधील परंपरागत नाच, गाणी, कथा, उखाणे, कोडी, खेळ, औषधे, आकाशदर्शन इत्यादी गोष्टी पाहिल्यावर आदिवासींनी योजलेले बुद्धीचातुर्य ठिकठिकाणी प्रत्ययास येते.

३ :

सामाजिक प्रश्न

आदिवासींची समस्या ही केवळ आर्थिक नसून ती सांस्कृतिक व सामाजिक स्वरूपाची देखील आहे व त्यात अनेक सामाजिक प्रश्न गुंतलेले आहेत. कुठलीच समस्या ही पूर्णतः आर्थिक अगर सामाजिक असू शकत नाही. समस्येला विविध अंगे असू शकतात. समस्येचा तोल कोणत्या अंगावर अधिक आहे हेच अशावेळी लक्षात घेणे जरुरीचे असते. आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा व त्यांतील छोट्या मोठ्या प्रश्नांचा त्यादृष्टीने विचार करणे उचित होईल. आदिवासीमधील दारूचा वापर, आरोग्याच्या व रोगराईच्या भ्रामक कल्पना, अज्ञान, लग्नविधीच्या कल्पना व त्यामुळे त्यांचे होणारे आर्थिक नुकसान, अशा काही सामाजिक प्रथांचा त्या दृष्टिकोनातून विचार करावा लागेल.

दारू आणि व्यसनाधिनता

आदिवासींमध्ये दारूचा वापर धार्मिक व सामाजिक विधींशी जोडलेला आहे. दारू पिणारांचे प्रमाण सर्व जमातींत सापडते, पण सर्व जमातच दारू पिणारी असणे हे त्याहून वेगळे आहे. त्यामुळे आदिवासीमधील कोणतीही व्यक्ती या व्यसनापासून सहसा वाचू शकत नाही. व्यक्तीला व्यसनमुक्त करणे सहज शक्य असते. पण सर्व जमातीला, समाजाला व्यसनमुक्त कोण करणार ? थोडक्यात आदिवासींत व्यक्तीला व्यसनमुक्त होण्याचे सांस्कृतिक व सामाजिक स्वातंत्र्य असत नाही. दारू पिणे हे पाप आहे किंवा समाजस्वास्थ्याला विघातक आहे हे सूत्र आदिवासी समाजजीवनाला मान्य नाही. ही व्यसनाधिनता सर्व जमातींतून नष्ट केल्याशिवाय त्यांच्या आर्थिक, सामाजिक विकासाची मोठी आशा करता येणार नाही. ज्या ठिकाणी व्यक्तीला आत्मनिर्धाराने व्यसनमुक्त होण्याचे स्वातंत्र्य असू शकते तेथे जमातीचे, समाजाचे अधःपतन होण्याचा भयंकर धोका नसतो, परंतु आदिवासी जमातीची परिस्थिती या उलट आहे. इथे दारूबंदी किंवा नियंत्रणे असणे केव्हाही फायद्याचेच आहे. व्यसनाधिनता घालवायची तर या समाजात एक शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी तयार करावयाम पाहिजे. सुशिक्षित आदिवासींवर दिवसेंदिवस बाहय समाजाच्या सामाजिक नीतिमूल्यांचा परिणाम होऊन ' दारू पिणे हा सामाजिक कलंक आहे, गुन्हा आहे•

सामाजिक प्रतिष्ठा त्यामुळे कमी होते,' अशा नवकल्पनांचा चांगला परिणाम होऊ लागला आहे. कुटुंबाची व समाजाची धूळधाण उडविणारी दारू ही वाईट गोष्ट आहे हे आस्ते आस्ते आदिवासींना कळू लागले आहे. दारूचे दुष्परिणाम काय असतात याची झळ आदिवासींना, विशेषतः त्यांच्यातील स्त्रियांना ती अधिक जाणवू लागली आहे. जाणिव करून देणारा हा बदल चांगला आहे. त्याला श्री. गुलाम महाराजांसारख्या आदिवासी संताच्या शिकवणीची जोड आणि ' गावातील दारूची मडकी फोडण्यासाठी श्री. अंबरसिंग महाराजांनी व श्री. भाई कडू (महादेव गोपाळ कडू) सारख्या संतवृत्तीच्या कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या आदिवासी स्वउद्धाराच्या चळवळी या समाजाला व्यसनाधिनतेपासून मुक्त करण्यास उपयोगी ठरतील. आदिवासी भागात कायद्याने दारूबंदी करणे कठीण आहे हे गेल्या २५ वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झाले आहे. त्याचे कारण बहुतेक पोलीस, जंगलचे अधिकारी, तलाठी वगैरे दारू पिणारे असतात किंवा आदिवासी विभागांत गेल्यावर ते तसे बनतात. पोलिस गैरकायदेशीर हातभट्ट्या चालविणाऱ्यांकडून नियमितपणे ' हप्ते ' घेणारे असतात. त्यामुळे कायद्याचे वातावरण आदिवासी भागात निर्माण होत नाही व सर्वसाधारण समाजापुढे कायद्याचा आदर्शही ठेवला जात नाही. दुसरीही एक प्रक्रिया यासंबंधाने आदिवासी समाजात दिसू लागली आहे. समाजविघातक व्यक्तींच्या उत्तेजनामुळे किंवा पैशाच्या लोभामुळे चोरट्या दारूचा व्यवहार करणारी माणसे व बाजारपेठांच्या जवळ दारूची विक्री करणारी माणसे आदिवासी समाजात दिवसेदिवस वाढत आहेत. त्यातून सामाजिक भ्रष्टतेची कीड आदिवासी भागांत फैलावत आहे. आदिवासी समाजाला हा भयंकर धोका आहे.

अज्ञान व आरोग्य

आदिवासींच्या सामाजिकतेचा दुसरा महत्त्वाचा प्रश्न आरोग्य व अज्ञानाचा आहे. त्यांच्या विकासातील ती एक धोंड आहे. दुसऱ्या कोणत्याही समाजापेक्षा आदिवासी समाजात आरोग्यविषयक नियमांविषयीची व औषधोपचाराविषयींची अनास्था फार आढळते. स्वच्छतेची राहणी, शुद्ध व सप्रमाण आहार ही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याच्या साधनांपैकी दोन साधने आहेत. परंतु बहुतेक सर्व सामाजिक प्रश्न आर्थिक प्रश्नांशी निगडित असल्यामुळे गरीबांना स्वच्छतेची राहणी व सप्रमाण जेवण परवडत नाही. स्वच्छता बव्हंशी विपुल पाणी पुरवठ्यावर अवलंबून असते, पण जिथे पिण्याच्या पाण्याचीच सोय नाही तिथे आंघोळ आणि कपडे धुणे कुठे मिळणार ? नोव्हेंबर, डिसेंबर उजाडला की आदिवासी भागांत पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागते व पुढील पाच सहा महिने ' पाणी ' ही आदिवासींची एक समस्या होऊन बसते. सह्याद्री, सातपुडा पर्वताच्या पठारांवरील

शेकडो गावांमध्ये व पाड्यांमधे ही समस्या उन्हाळ्यात 'पाण्याच्या टिपवणीचे' किंवा ४–५ मैल अंतराचे डोंगर उतरून पिण्यासाठी हंडे दोन हंडे पाणी आणण्याचे स्वरूप धारण करते. अशा प्रकारच्या टिपवणीच्या (थेंब थेंब गोळा करणे) पाण्यामुळे 'रक्ती हगवण, कृमी, नारू, कावीळ, डायरिया यांसारखे रोग होतात.

आरोग्याचा प्रश्न पाण्याच्या बरोबरच आहाराशी अधिक जवळचा आहे. वर्षाकाठी फक्त चार महिने आदिवासीला दोन वेळेला पुरेसे व पोटभर अन्न मिळते. राहिलेल्या दिवसांत तो कधी अर्धपोटी तर कधी उपाशी. तेव्हा तो कंदमुळे, सावा, वरई, कोदो, कुडकी, राळे यासारख्या तृणधान्यावर गुजराण करतो. मिळणारे अन्न बहुधा भात, भाताची अंबिल, पेज, घाटा, खिचडी, घुगऱ्या या स्वरूपाचे असते. अन्नांत कडधान्याचे प्रमाण अत्यंस अल्प असून वर उल्लेख केलेल्या तृणधान्यांचे प्रमाण अधिक असते. ही सारी तृणधान्ये निकृष्ट दर्जाची आहेत. शरीराचे आरोग्य चांगले राहण्यासाठी नैट्रोजन, पिष्टमय, स्निग्ध पदार्थ, क्षार, प्रथिने आणि जीवनसत्त्वे पुरविणारे घटक, विशेषतः मांस, अंडी, फळे, दूध, भाज्या, तूप, तेल इत्यादींची त्यांना अधिक जरूरी आहे. पण हे पदार्थ आदिवासीला मिळणार कुठून ? त्यामुळे आदिवासी समाजातील ७० टक्के लोक अशा अपुऱ्या, असमतोल व अपौष्टिक आहारात निकृष्ट जीवन जगत असतात. लहान मुले आणि स्त्रिया यांच्यात हे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आढळते. त्यामुळे त्यांचे चेहरे निस्तेज आणि आजारी असल्यासारखे दिसतात.

आदिवासींच्या आरोग्याला 'आहार आणि पाणी' या बरोबरच रोगराई-संबंधी त्यांच्या भ्रामक कल्पना व उपचारांची अनास्था हेही कारणीभूत असते. देवी प्रतिबंधक लस टोचणाऱ्या पथकाला किंवा कॉलरा प्रतिबंधक लस टोचणाऱ्या डॉक्टरांना आदिवासी भागात अनेकवेगळा माघार घ्यावी लागते. त्यांच्यामते अनेक भयावह रोग हे ईश्वरी कोपामुळेच झालेले असतात, त्यामुळे अशा रोगांच्या रोग्यांना ते देवप्रमाण मानतात. अशा भ्रामक समजुतीच्या जाळ्यातून त्यांना बाहेर काढणे, त्यांच्या मनातील रोगराईची भीती दूर करणे व उपचाराबद्दल त्यांचा विश्वास संपादन करणे ही देखील एक सामाजिक समस्याच आहे.

शिक्षण व जागृती

कोणत्याही समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर त्यासाठी प्रथम शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे हा अगदी सामान्य सिद्धांत आहे. समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते फोल ठरतात. ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्या समाजाला जोपर्यंत केल्या जाणाऱ्या सुधारणेचे महत्त्व पटत नाही तोपर्यंत त्या सुधारणा बाहेरून

लादल्यासारख्या होतात व अल्पकाळच टिकतात. सुधारणेच्या नव्या कल्पनेने ज्यांची सुधारणा करावयाची त्यांच्या मनाची पकड घेतली की त्या कल्पना शक्तिशाली बनतात व खऱ्या अर्थाने प्रगतीची सुरूवात होते. म्हणून सर्वप्रथम आदिवासींच्या सुधारणेसाठी शिक्षणाचा प्रसार वाढला पाहिजे. केवळ त्यामुळेच त्यांची दृष्टी व्यापक व प्रगत बनेल. सभोवतालच्या समाजाचे ज्ञान होऊन समाज घटकामध्ये इष्ट स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा निर्माण होऊन आदिवासींच्या प्रगतीला निश्चित गती मिळेल. हे होण्यासाठी प्रथम त्यांच्यात शिक्षणाची गोडी आणि लालसा निर्माण होणे निकडीचे आहे. हे तत्वतः मान्य करून मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी शासन तऱ्हेतऱ्हेचे प्रयत्न करत आले आहे व तसे प्रयत्न चालूही आहेत. महाराष्ट्र सरकारने आदिवासी विभागात 'सर्वोदय केंद्रे' अनेक वर्षे चालविली. साधारणतः प्राथमिक शिक्षण, विद्यार्थीवसतीगृहे, तेलघाणे, सेवाग्रामांतून आढळणारे ग्रामोद्योग यांवर ह्या केंद्रांचा भर असे. आदिवासींच्या विकासासाठी आणलेली दुसरी योजना म्हणजे 'आदिवासी विकास गट.' रस्ते विहिरी, शेतीविकास, आर्थिक उन्नती ह्यासाठी योजनेमार्फत भरपूर पैसा खर्च करण्यात आला. फलश्रुती मात्र त्यातून तेवढी होऊ शकली नाही. पहिल्या योजनेतून गांधीवादी व सर्वोदयवादी पांढरपेशांची पोषणूक झाली तर दुसऱ्या योजनेमुळे नोकरशाहीची आणि पुढाऱ्यांची चंगळ झाली. त्यानंतर आदिवासी-विकासासाठी 'आदिवासी योजनेची' निर्मिती करण्यात आली. 'एकात्मिक क्षेत्रविकास करून आदिवासींची उन्नती करता येईल' या नियोजनसूत्राचा आधार घेऊन आदिवासी क्षेत्र विकासाचा व त्याबरोबरच आदिवासी जमातींचा विकास घडविण्याचे कार्य १९७४–७५ पासून सुरू झाले आहे. आदिवासी क्षेत्र योजनेच्या या निर्मितीमुळे आदिवासी समाजाचा कितपत विकास होईल अगर होऊ शकेल या विषयी आज अनुकूल अगर प्रतिकूल तर्क बांधणे योग्य होणार नाही. कारण आदिवासींच्या विकासाचा प्रश्न हा केवळ 'एकात्मिक क्षेत्र विकासाचा' प्रश्न एवढाच नसून तो बऱ्याच गुंतागुंतीचा प्रश्न आहे. विचारवंतांप्रमाणेच राज्यकर्त्यांना, शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि नोकरशाहीला त्याची आता जाणीव होऊ लागली आहे. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने योजनांतर्गत आखलेल्या उपयोजना कितपत शास्त्रशुद्ध व वास्तव परिस्थितीला धरून आहेत हा एक मतभेदाचा विषय होऊ शकेल. आदिवासींचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल तर आदिवासींनी सर्वप्रथम शिक्षणक्षेत्रात पुढे सरकले पाहिजे याविषयी मात्र कोणाचेच दुमत होणार नाही. त्यांसाठी राज्यातील लहानमोठ्या खाजगी संस्थांनी व शासनाने शिक्षणावर अधिक भर दिला पाहिजे. आज शिक्षणावर अधिक खर्च करण्याचे धोरण आहे. पण शिक्षणावरील हा खर्च आदिवासींच्या

कितपत सार्थकी लागेल अशी शंका निर्माण होते. ही शंका निर्माण होण्याचे कारण असे की, सन १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणे आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण केवळ ७ टक्के होते. ते १९७१ च्या खानेसुमारीत १२ टक्के एवढे झाले आहे. पुरुष १९ व स्त्रिया ४ टक्के. माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले तीन हजार विद्यार्थी ही तुटपुंजी संख्या लक्षात घेतली तर आदिवासींची शैक्षणिक प्रगती गेल्या ३० वर्षांत किती मंदगतीने चालू आहे याची कल्पना येते. वेगवेगळ्या जमातींत हेच प्रमाण पाहिले तर काही जमातींत शिक्षणाचा प्रसार किती तुरळक झालेला आहे याची कल्पना येते. आदिवासी विभागातील अनेक खेडेगांवात पूर्वीच्या लोकलबोर्डांनी व आजच्या जिल्हा परिषदांनी प्राथमिक शाळा काढलेल्या आहेत. तरी देखील विरळ वस्ती असलेल्या, दुर्गम, डोंगरी व जंगलव्याप्त आदिवासी भागांतील ५०० गावांना व ८०० पाड्यांना अद्यापही प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. आदिवासी भागातील शाळांची स्थिती कागदोपत्री ठाकठीक दितस असली तरी प्रत्यक्ष परिस्थिती अपेक्षांना धक्का देणारी आहे. कित्येक शाळांवर शिक्षकच हजर नसतात. शिक्षक शाळेवर हजर असला तर मुलांची उपस्थिती असमाधानकारक असते. एखाद्या प्रामाणिक शिक्षकाने प्रयत्नांची पराकाष्ठा करून मुलांची उपस्थिती वाढविली तर ही मुले अभ्यासात अपेक्षेप्रमाणे प्रगती करू शकत नाहीत. साहजिकच ही मुले मराठी चौथी पास होऊन पुढील शिक्षणासाठी शहराच्या गावी शाळेत गेली तर तेथील विद्यार्थ्यांपुढे ती अभ्यासात टिकू शकत नाहीत. बाहेरून आलेल्या शिक्षकांना देखील अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

शाळेतील शिक्षण आणि मुलांचे जीवन यांत कुठे सुसंवादत्व नसल्याने मुले कंटाळतात व पुढे पुढे शाळेत येण्याची बंद होतात. जी काही थोडीफार मुले शाळेत दोनचार वर्षे काढतात व थोडेफार शिकतात त्या शिक्षणाचा त्यांना पुढे त्यांच्या आयुष्यात कोठेच उपयोग होत नाही. शेवटी बहुधा शाळेतील विद्या शाळेतच ठेवून ही मुले आपआपल्या जीवनाची सुरवात करतात. फार तर जेमतेम सही करण्याचे ज्ञान त्यांच्याजवळ राहिले तर राहते. आदिवासींची वस्ती पाड्या-पाड्यांवर विखुरलेली असते. त्यामुळे एका पाड्यावर शाळा चालविण्याइतकी पुरेशी मुले मिळत नाहीत व सर्व पाड्यांवरील मुले एकत्र जमविणे कठीण. पावसाळ्यांत तर ते सर्वांत कठीण. मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी शिक्षकाला मुलांच्या पालकांचे व गावकऱ्यांचे पाहिजे तसे सहकार्य मिळत नाही. कारण पालकांना व गावकऱ्यांना मुळी आपली मुले शाळेत पाठविण्याची गरज व आवश्यकता वाटत नाही. गावकऱ्यांचा व पालकांचा अडाणीपणा दूर करण्याचे प्रयत्न करणे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतल्यासारखे आहे. गावकरी

सज्ञान होतील व ते आपली मुले आपण होऊन शाळेत पाठवतील अशी अपेक्षा बाळगणे म्हणजे हवेत मनोरे रचण्यासारखे आहे. मूळ कारण आहे आदिवासींचे दारिद्र्य. घरातील सर्वच वडिल माणसांना शेतावर व अन्य मजुरीसाठी जावे लागते. स्त्रियाही घरी राहू शकत नाहीत. सहाजिकच गुरे राखणे, बकऱ्या राखणे, लहान भावंडे संभाळणे, किरकोळ घरगुती कामे करणे, त्यामुळे या वयातील मुलांना शाळेत पाठविणे शक्य होत नाही. मुलगी किंवा मुलगा १३–१४ वर्षांचा झाला की तो शेतीची व मजुरीची कामे करू लागतो. आदिवासी कुटुंबाचा प्रत्येक माणूस असा आर्थिक प्राप्ती करून देणारा आधार असल्यामुळे शाळेत जाऊन निरर्थक वेळ घालविणे त्यांना परवडत नाही. त्याशिवाय शाळेचे कपडे, पाटी-पुस्तके वगैरे बाबी आदिवासीच्या दृष्टीने खर्चाच्याच असल्यामुळे 'नको ती शाळा आपल्याला' या विचाराचे लोक बनतात, आजही बनलेले आहेत. एकूण त्यांच्या दारिद्र्यामुळे त्यांचे शिक्षण होत नाही आणि शिक्षण नसल्यामुळे दारिद्र्य त्यांचा पिच्छा सोडीत नाही.

अलीकडे ध्येयवादी शिक्षकांचा भरणा देखील कमी. कुठे तरी नोकरी करा वयाची म्हणून बरेच लोक शिक्षकपेशात पडतात. त्यांना शिक्षणाविषयी पाहिजे तेवढी ज्ञानलालसा नसते, आस्था नसते. आदिवासी भागांत त्यांची नेमणूक म्हणजे त्यांना शिक्षा वाटते. दळणवळणाचा अभाव, वेगळे लोकजीवन, राहण्याची गैरसोय व आदिवासी जीवनासंबंधीची अनास्था यामुळे लोकांत समरस होणे व शिक्षणाचे कार्य करणे त्यांना कठीण जाते. जे थोडेफार या परिस्थितीवर मात करतात ते कालान्तराने निराश होतात.

आदिवासी शिक्षणाच्या व विचार देवाणघेवाण करण्याच्या संदर्भात दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे जरूरीचे आहे. तो म्हणजे आदिवासींच्या बोली-भाषांचा, शिक्षण माध्यमाचा व शिक्षणपद्धतीचा. महाराष्ट्रांत ४४ आदिवासी जमातींच्या ७४ बोलीभाषा आहेत. त्यांपैकी काही बोलीभाषा मराठीच्याच पोट-भाषा आहेत. तर काही स्वतंत्र आहेत. १९७१ च्या जनगणनेप्रमाणे फक्त २० टक्के आदिवासींची मातृभाषा किंवा बोलीभाषा मराठी आहे. आदिवासींमधील गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल, पावरा, माडिया गोंड ह्या जमातींना मराठी भाषा समजणे कठीण जाते. बाकीच्या जमातींना उदा. वारली, कातकरी, ठाकर, मल्हार कोळी जी भाषा येते तीही फक्त व्यवहारातील देवाणघेवाण व कामचलाऊपणा करण्याइतपतच आदिवासी मुलांना दिले जाणारे शिक्षण त्यामुळे प्रथमतः समज-ण्यास व पुढे स्मरणात ठेवण्यात अनेक अडचणी येतात. विचार देवाणघेवाण करण्याच्या प्राथमिक पातळीवरील आदिवासी मुलांची ही अडचण त्यांच्या वाटचाला अवहेलना, तुच्छता व न्यूनगंडाची भावना निर्माण करते. साहजिकच प्राथमिक

स्थीतीत आदिवासी विद्यार्थ्याला समजून घडविणे व बोलण्याचालण्यात त्याचा आत्मविश्वास वाढविणे महत्त्वाचे ठरते.

हल्ली शासनाने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक आश्रमशाळा, आश्रमशाळांना जोडून बालवाडचा, संस्कार केन्द्रे, निवासी केन्द्रशाळा, विद्याश्रम, वसतिगृहे, माध्यमिकशाळा, धंदे, तंत्र शिक्षण शाळा काढलेल्या आहेत. आदिवासी लोकसंख्येच्या तुलनेत आश्रमशाळा, बालवाडचा, माध्यमिक व धंदेतंत्रशिक्षणशाळा फारच कमी आहेत. आदिवासींच्या शैक्षणिक परिवर्तनावर परिणाम घडविण्यासाठी त्यांची संख्या व कार्यक्षमता आज आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने वाढणे गरजेचे आहे. अशाप्रकारच्या योजनांद्वारे स्वंयप्रेरित व शासकीय संस्थांना शिक्षणाचे नवे कार्यक्षेत्र निर्माण होत आहे व त्याद्वारा आदिवासी भागांत नवे चैतन्य येऊ पाहात आहे. आदिवासींपैकी काही जमातींनी अशा योजनांचा फायदा घेतल्यामुळे त्यांच्यातील शैक्षणिक जागृती कोणालाही आशादायक वाटेल. जेथे परिश्रमपूर्वक आदिवासी योजना राबत आहेत तेथे परिवर्तनाला गती मिळत आहे. तेथील आदिवासी परंपरागत जीवन बदलून नवीन बनत आहे. ठिकठिकाणी आदिवासींची बरीच मुले शाळांमधून जाऊ लागली आहेत. धीट होऊ लागली आहेत. स्वच्छ कपडे घालू लागली आहेत. नाचगाण्याइतकाच शिक्षणातही रस घेऊ लागली आहेत. आदिवासींच्या नाच-नृत्यांनी तुम्हाला जेवढा आनंद होईल त्यापेक्षा कितीतरी जास्त आनंद बालवाडचांतील आणि आश्रमशाळांमधील आदिवासींची छोटी छोटी मुले–मुली यांच्या दर्शनाने होईल. आदिवासींच्या नव्या जीवनाची ही पहाट कोणालाही विलोभनीय अशीच वाटेल. आदिवासी स्त्री पुरुषांत एक प्रकारचा भेकड भाव असतो. नवा माणूस दिसला की तो घाबरतो, बुजतो, चाचरतो, तो त्याला टाळू बघतो. पण नव्या दमाची आश्रमशाळांतील, हायस्कूलमधील मुले हा भेकडभाव टाकून पुढे जात आहेत. ती धीटपणे बोलू लागली आहेत. सुधारणेचे खरेखुरे दर्शन यापुढे आश्रमशाळांमधून दिसेल. आज त्याची नुकती सुरुवात होत आहे.

आश्रमशाळांच्या संदर्भात काही कटुसत्ये आहेत. आश्रमशाळा काही धंदेवाईक, सराईत पुढाऱ्यांची कामधेनू बनली आहे. आश्रमशाळांमधून दिले जाणारे शिक्षण अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. त्यात वेळीच सुधारणा आणि बदल घडविला नाही तर तेथून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या आदिवासी तरुणांची पिढी सर्व सामान्य तरुणांशी स्पर्धा करू शकणार नाही. मागासवर्गीयांतील तरुणांच्या तुलनेने देखील ही पिढी फारच मागे राहील. परिणामतः आदिवासींमधील उदयोन्मुख पिढी आक्षरओळख होऊन देखील दिशाहीन राहील. समाजात पुन्हा ते मागासलेलेच राहण्याचा त्यात मोठा धोका आहे. आश्रमशाळांत प्रशिक्षित शिक्षक नाहीत.

त्यांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमासाठी योजना हवी आहे. 'शिकून आपल्यालाच नोकऱ्या नाहीत तर आदिवासींना शिकवून त्यांना कुठल्या नोकऱ्या द्यावयाच्या.' अशा प्रवृतीचा व विचारसरणीचा एक वर्ग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाणिवेने कार्य करतो. आदिवासींच्या भविष्यातील हे धोके टाळणे जरूरीचे आहे. यावर आदिवासी योजनेत सखोल विचार झाला असावा असे वाटते.

आश्रमशाळास केन्द्र योजनेखाली महाराष्ट्र राज्यात १९७३–७४ पासून आजपर्यंत अनेक शासकीय आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. परंतु निवास व्यवस्थेअभावी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊन आश्रम शाळा जनतेच्या नजरेत बदनामीला पात्र ठरल्या आहेत. कुठे जमीन उपलब्ध नाही, कुठे जंगलविभाग जमीन देत नाही, जमीन मिळाली तर बांधकाम होत नाही, कुठे जमीन आहे तर पैसा मंजूर नाही, अशा अनेक तक्रारी निदर्शनास येत आहेत. कित्येक ठिकाणी तर पावसाळ्यामध्ये विद्यार्थ्यांची अवस्था केविलवाणी आढळून येते. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने शासकीय आश्रमशाळा बांधकामाचा धडक कार्यक्रम घेतल्याविना मुलांची राहण्याची सोय होणार नाही. शासनाला या बाबतीत गांभीर्यपूर्वक विचार करावा लागेल. आज आश्रमशाळेतील मुलांवर दरडोई खर्चाचे प्रमाण वसतिगृहापेक्षा खूपच अधिक आहे. आदिवासी कल्याण खात्याने आश्रमशाळांचा कारभार पाहण्यासाठी जी यंत्रणा उभी केली आहे तिच्या मध्ये अनेक कमतरता आहेत. सुरुवातीला दर १०–१२ आश्रमशाळांसाठी एक अधिकारी नेमण्याची कल्पना होती. परंतु आज जिल्हयाला एक अधिकारी व त्याच्या कक्षेत ४० पर्यंत आश्रमशाळांची संख्या वाढलेली आहे. कार्यवाहीसाठी नोकरवर्गही जुजबीच आहे. त्यामुळे अतिशय प्रभावी व उपयुक्त योजनेचा अधिक लाभ होत नाही अशी भावना आदिवासी विभागात वाढीस लागली आहे.

कुटुंबसंस्था व लग्नविधीचे खर्च

आदिवासींची सामाजिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने आणखी काही बाबीकडे लक्ष वेधणे जरूरीचे आहे. आदिवासी समाजातील कुटुंबसंस्था अस्थिर स्वरुपाची आहे. काही आदिवासी जमातींतील पुरुष, बायका सहजासहजी बदलतात, त्यांच्याशी काडीमोड घेतात. अशा आदिवासी कुटुंबात जन्मास आलेला मुलगा समजू लागल्याबरोबर इतराप्रमाणे विडी कोढायला व दारू प्यायला शिकतो. त्याच्यावर शिक्षणाचे किंवा कुटुंबसंस्थेचे संस्कार काय होत असतील याची केवळ कल्पनाच केलेली बरी. आदिवासी समाजात अशा अस्थिर कुटुंबसंस्थेमुळे निर्माण झालेली पोकळी प्रत्येक गावात अगर पाड्यावर बालवाड्या

स्थापन करून भरून काढता येईल. बायको किंवा नवरा सहज बदलण्याच्या परंपरागत प्रथेत पुनर्विवाह बंदीच्या कायद्याद्वारा हळूहळू बदल घडघून आणता येईल. सामाजिकतेमधील आणखीन एक महत्त्वाची बाब म्हणजे लग्नात होणारा खर्च. आदिवासी जमातीत लग्नकार्य करण्यासाठी कर्जाची जरूरी भासते. अनेक लोक कर्ज काढून लग्न करतात. 'जवळ असलेले पैसे खर्च करून लग्न केले तर लोक आपल्याला श्रीमंत समजतील व सावकारदेखील कर्ज देणार नाही; म्हणून पैसे असणारा आदिवासी देखील लग्नासाठी कर्ज काढतो.' आदिवासींच्या कर्ज बाजारात लग्नाच्या खर्चाने व कर्जाने जेवढी भर पडते तेवढी भर दुसऱ्या कोणत्याही कारणाने पडत नाही. कर्जामुळे आपण सावकाराचे गुलाम होतो; लाचार होतो; याची आदिवासीला जाणीव होत नाही. 'लग्न ही सामाजिक व शारीरिक गरज भागविणारी, सामाजिक इभ्रत आणि प्रतिष्ठा मिळवून देणारी संस्कारक्रिया आहे; ती पूर्ण केलीच पाहिजे,' असा त्यांच्यात अट्टाहास असतो. त्यामुळे लग्न करावयाचे म्हणजे कर्जही लागणार व खर्चही होणारच हे त्यांनी गृहीत धरलेले असते. 'लग्नाचा बस्ता, बोलाचा खर्च, दहेज, मानपान, जमातीची जेवणे' ह्या खर्चांनी आदिवासी संपूर्ण उघडा होतो. लग्नाचा खर्च जसा अवास्तव होतो तसे आणखीनही अवास्तव खर्च सर्व आदिवासी करत असतात. मुलाचा जन्म, जन्मानंतरचे काही धार्मिक व परंपरागत विधी, मृत्यूनंतरचे विधी, मांत्रिक व भगताचे विधी इत्यादी कार्यक्रमांत होणारे खर्च आदिवासींना अनावश्यक वाटत नाहीत. हे खर्च आपल्या गरीबीचे आणि दारिद्र्याचे मूळ आहेत हे पटण्याइतक्या पातळीवर त्यांना/आणण्याची आज खरी गरज आहे. आदिवासींमधील नव्या विचारांच्या लोकांनी पुढे येऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला तर असे करू इच्छिणाऱ्या अनेकांना आत्मविश्वास प्राप्त होईल. असे कार्य करू इच्छिणाऱ्या तरुणांना अर्थात यासाठी पार्श्वभूमी तयार करावी लागेल.

नकली आदिवासी

आदिवासी, दलिताचा मागासलेपणा कमी करण्यासाठी संविधानाने जाहीर केलेल्या सवलतींचा हेवा अन्यजनांना वाटणे स्वभाविक आहे. अज्ञान आणि विषमतेच्या दरीत आडकलेल्या मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतींचा इतरांना हेवा का वाटावा ? खरं म्हणजे तसे वाटायला नको. मागासमान्यता व सवलती यांचा जातीशी संबंध असतो. यातून मागासलेपणाचे पोषण, वर्धन वाढत आहे व त्यातून मागासवर्गीयांची यादी दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे दृष्टीआड करून चालणार नाही. कारण आज अपात्र सवलतदारांच्या पाठीशी राजकीय शक्ती उभ्या आहेत असा अनुभव येत आहे. त्यामुळे संविधानाने जाहीर केलेल्या सुपात्र

सवलतदारांना, बनावट मागासलेले किंवा मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले, नकली मागासलेले लोक सतत दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात. परिणामी खऱ्या मागासलेल्या सवलतदारांना नोकरी धंद्यात, शैक्षणिक सवलतीत आज मागे रहावे लागत आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर 'हलबा' आदिवासी जमातीच्या नावावर 'कोष्टी' व 'हलवा कोष्टी', तर महादेवकोळी किंवा डोंगरकोळी या आदिवासी जमातीच्या नावावर 'सूर्यवंशी कोळी, कोळी, पानभरे कोळी, मच्छिमारी कोळी, सोनकोळी' ह्या जमाती सध्या राजरोसपणे फायदा उठवत आहेत हे उदाहरण देता येईल. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ह्या कृत्यांना राजकीय हेतूपोटी पाठीशी घालून खऱ्या आदिवासींवर अन्याय केला जातो व खोट्यांना भ्रष्टाचार करण्यास प्रवृत करतात. त्यामुळे सामाजिक प्रश्नांची सोडवणूक होण्याऐवजी त्यातून गुंतागुंतच अधिक वाढत आहे. नागपूर, विदर्भ विभागात जातीच्या खोट्या दाखल्यावर मागावसर्गीय सामाजाची शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हजारोने आहे. खऱ्या अर्थाने दलितांना व आदिवासींना यांच्यापासूनच मोठा धोका आहे.

अनुसूचित जमातीच्या परिशिष्टामधील पुष्कळशा जमाती अशा आहेत की राज्यात त्यांची संख्या अत्यल्प आहे. परंतु परिशिष्टात अशांचा उल्लेख असल्यामुळे समशब्द साधर्म्य असणाऱ्या जमाती त्याचा गैरफायदा घेत आहेत. उदा. धनगर जातीचे लोक धनवार या जमातीचा, हलबा कोष्टी जात हलबा जमातीचा, उत्तर प्रदेश व मध्यप्रदेशातील ठाकूर (मोठे जमीनदार) हे ठाकर या आदिवासी जमातीचा, माना ही कुणबी जात गोंड माना या आदिवासी जमातीचा व मच्छीमारी कोळी हे महादेव कोळी व मल्हार कोळी ह्या आदिवासी जमातीच्या नावानी प्रमाणपत्र मिळवून गैरफायदा घेत आहेत. हे गैरप्रकार थांबविण्यासाठी संविधानामधील कलम नं. ४६ अन्वये संरक्षण देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी लागेल व आदिवासी जमातींची यादीही दुरुस्त करून घ्यावी लागेल.

आदिवासींना मिळणाऱ्या सवलतींचा अनेक लोकांना हेवा वाटतो. ते म्हणतात, 'आम्हाला अशा सवलती का नकोत ?' त्या मिळविण्यासाठी आज अनेक जाती जमाती आदिवासी जमातीच्या यादीत समाविष्ट करवून घेण्याचे प्रयत्न करत आहेत. तीस वर्षांत ही प्रवृती कमी होण्याऐवजी वाढीला लागली आहे. मागासलेपणा, मागासलेल्या जाती आणि सवलतीच्या संबंधात जाती आणि सवलतीवर अधिक भर दिला जातो. संविधानात समाविष्ट नसलेल्या जातींना

स्थापन करून भरून काढता येईल. वायको किंवा नवरा सहज बदलण्याच्या परंपरागत प्रथेत पुनर्विवाह बंदीच्या कायद्याद्वारा हळूहळू बदल घडघून आणता येईल. सामाजिकतेमधील आणखीन एक महत्त्वाची बाब म्हणजे लग्नात होणारा खर्च. आदिवासी जमातीत लग्नकार्य करण्यासाठी कर्जाची जरूरी भासते. अनेक लोक कर्ज काढून लग्न करतात. 'जवळ असलेले पैसे खर्च करून लग्न केले तर लोक आपल्याला श्रीमंत समजतील व सावकारदेखील कर्ज देणार नाही; म्हणून पैसे असणारा आदिवासी देखील लग्नासाठी कर्ज काढतो.' आदिवासींच्या कर्ज बाजारात लग्नाच्या खर्चाने व कर्जाने जेवढी भर पडते तेवढी भर दुसऱ्या कोणत्याही कारणाने पडत नाही. कर्जामुळे आपण सावकाराचे गुलाम होतो; लाचार होतो; याची आदिवासीला जाणीव होत नाही. 'लग्न ही सामाजिक व शारीरिक गरज भागविणारी, सामाजिक इभ्रत आणि प्रतिष्ठा मिळवून देणारी संस्कारक्रिया आहे; ती पूर्ण केलीच पाहिजे,' असा त्यांच्यात अट्टाहास असतो. त्यामुळे लग्न करावयाचे म्हणजे कर्जही लागणार व खर्चही होणारच हे त्यांनी गृहीत धरलेले असते. 'लग्नाचा बस्ता, बोलाचा खर्च, दहेज, मानपान, जमातीची जेवणे' ह्या खर्चांनी आदिवासी संपूर्ण उघडा होतो. लग्नाचा खर्च जसा अवास्तव होतो तसे आणखीनही अवास्तव खर्च सर्व आदिवासी करत असतात. मुलाचा जन्म, जन्मानंतरचे काही धार्मिक व परंपरागत विधी, मृत्यूनंतरचे विधी, मांत्रिक व भगताचे विधी इत्यादी कार्यक्रमांत होणारे खर्च आदिवासींना अनावश्यक वाटत नाहीत. हे खर्च आपल्या गरीबीचे आणि दारिद्र्याचे मूळ आहेत हे पटण्याइतक्या पातळीवर त्यांना/आणण्याची आज खरी गरज आहे. आदिवासींमधील नव्या विचारांच्या लोकांनी पुढे येऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला तर असे करू इच्छिणाऱ्या अनेकांना आत्मविश्वास प्राप्त होईल. असे कार्य करू इच्छिणाऱ्या तरुणांना अर्थात यासाठी पार्श्वभूमी तयार करावी लागेल.

नकली आदिवासी

आदिवासी, दलिताचा मागासलेपणा कमी करण्यासाठी संविधानाने जाहीर केलेल्या सवलतींचा हेवा अन्यजनांना वाटणे स्वभाविक आहे. अज्ञान आणि विषमतेच्या दरीत आडकलेल्या मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतींचा इतरांना हेवा का वाटावा ? खरं म्हणजे तसे वाटायला नको. मागासमान्यता व सवलती यांचा जातीशी संबंध असतो. यातून मागासलेपणाचे पोषण, वर्धन वाढत आहे व त्यातून मागासवर्गीयांची यादी दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे दृष्टीआड करून चालणार नाही. कारण आज अपात्र सवलतदारांच्या पाठीशी राजकीय शक्ती उभ्या आहेत असा अनुभव येत आहे. त्यामुळे संविधानाने जाहीर केलेल्या सुपात्र

सवलतदारांना, बनावट मागासलेले किंवा मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले, नकली मागासलेले लोक सतत दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात. परिणामी खऱ्या मागासलेल्या सवलतदारांना नोकरी धंद्यात, शैक्षणिक सवलतीत आज मागे रहावे लागत आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर 'हलबा' आदिवासी जमातीच्या नावावर 'कोष्टी' व 'हलवा कोष्टी', तर महादेवकोळी किंवा डोंगरकोळी या आदिवासी जमातीच्या नावावर 'सूर्यवंशी कोळी, कोळी, पानभरे कोळी, मच्छिमारी कोळी, सोनकोळी' ह्या जमाती सध्या राजरोसपणे फायदा उठवत आहेत हे उदाहरण देता येईल. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ह्या कृत्यांना राजकीय हेतूपोटी पाठीशी घालून खऱ्या आदिवासींवर अन्याय केला जातो व खोटचांना भ्रष्टाचार करण्यास प्रवृत करतात. त्यामुळे सामाजिक प्रश्नांची सोडवणूक होण्याऐवजी त्यातून गुंतागुंतच अधिक वाढत आहे. नागपूर, विदर्भ विभागात जातीच्या खोटचा दाखल्यावर मागावसर्गीय सामाजाची शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हजारोने आहे. खऱ्या अर्थाने दलितांना व आदिवासींना यांच्यापासूनच मोठा धोका आहे.

अनुसूचित जमातीच्या परिशिष्टामधील पुष्कळशा जमाती अशा आहेत की राज्यात त्यांची संख्या अत्यल्प आहे. परंतु परिशिष्टात अशांचा उल्लेख असल्यामुळे समशब्द साधर्म्य असणाऱ्या जमाती त्याचा गैरफायदा घेत आहेत. उदा. धनगर जातीचे लोक धनवार या जमातीचा, हलबा कोष्टी जात हलबा जमातीचा, उत्तर प्रदेश व मध्यप्रदेशातील ठाकूर (मोठे जमीनदार) हे ठाकर या आदिवासी जमातीचा, माना ही कुणबी जात गोंड माना या आदिवासी जमातीचा व मच्छीमारी कोळी हे महादेव कोळी व मल्हार कोळी ह्या आदिवासी जमातीच्या नावानी प्रमाणपत्र मिळवून गैरफायदा घेत आहेत. हे गैरप्रकार थांबविण्यासाठी संविधानामधील कलम नं. ४६ अन्वये संरक्षण देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी लागेल व आदिवासी जमातींची यादीही दुरुस्त करून घ्यावी लागेल.

आदिवासींना मिळणाऱ्या सवलतींचा अनेक लोकांना हेवा वाटतो. ते म्हणतात, 'आम्हाला अशा सवलती का नकोत ?' त्या मिळविण्यासाठी आज अनेक जाती जमाती आदिवासी जमातीच्या यादीत समाविष्ट करवून घेण्याचे प्रयत्न करत आहेत. तीस वर्षांत ही प्रवृती कमी होण्याऐवजी वाढीला लागली आहे. मागासलेपणा, मागासलेल्या जाती आणि सवलतीच्या संबंधात जाती आणि सवलतीवर अधिक भर दिला जातो. संविधानात समाविष्ट नसलेल्या जातींना

मगासजातीत समाविष्ठ करताना त्या जाती जमातीची मुख्यतः आर्थिक स्थिती सामाजिक मागासलेपणा, सांस्कृतिक वेगळेपणा, प्राचीन संस्कृति वैशिष्ट्ये, भौगोलिक आलगता लक्षात घेणे जरूरीचे आहे. केवळ राजकीय हेतुसाठी कोणा एक जाती जमातीचा मागास वर्गाच्या यादीत समावेश करणे हा खऱ्या मागास वर्गीयावर 'अन्याय' म्हणावा लागेल.

सामाजिक दोष आणि मागासलेपणा

आदिवासीचा खऱ्या अर्थाने मागासपणा घालवायचा तर मागासलेपणाची कारणे शोधून ती दूर केली पाहिजेत. अलग व निरक्षर राहिल्यामुळे मागासपणा उद्भवला असो की बुजरेपणा व निरक्षरता हा मागासपणाचा परिपाक असो; ह्यांचे साहचर्य सर्वत्र दिसते. हलक्या प्रतीची जमीन, पाण्याचे दुर्भिक्ष्य, उपद्रवी कायदे, सावकार व व्यापारी करीत असलेली पिळवणूक, रोगराई, दारिद्र्य, वहातुकीच्या साधनाचा, तसेच प्रचलित शिक्षणाचा व एकंदरीत आधुनिक सुखसोयीचा अभाव हे परिस्थितीजन्य दोष व संकोची व बुजरी वृत्ती, आळस, दूरदृष्टीचा अभाव इत्यादी स्वभावजन्य दोष आदिवासीच्या जीवनाशी निगडित असलेले आढळतात. सरकार परिस्थितिजन्य दोष दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिकारशक्ती वाढेल तसा बुजरेपणा कमी होईल. आपल्या कष्टाचे फळ दुसरेच लुबाडतात हे पाहून माणूस आळशी बनतो, निरुत्साही होतो. तसेच आदिवासीचे झालेले आहे. हाहि दोष प्रतिकारशक्ती व प्रतिष्ठा वाढेल तसा कमी होईल. 'मापटाभर दाणा आणि भिल्ल उताणा' ह्या म्हणीत त्याचा आळस व दूरदृष्टीचा अभाव दिसत असला तरी 'कशाला उद्याची वात' असे म्हणणारी बेफिकीर वृत्तीही त्यातून प्रगट होते. आपण दूरदृष्टी म्हणतो ती बरेचदा दूरदृष्टी नसून समोरच्या गोष्टीचे महत्त्वमापन करण्याची आगळी दृष्टी असते. पाश्चिमात्य देशात बेकार भत्त्यावर जगणाऱ्या काही बायका आठवड्यातून एक दिवस उपाशी राहून वाचवलेला पैसा सौंदर्यसाधनासाठी खर्च करतात. त्यांना विचारले तर त्या म्हणतात, 'मग आम्ही काय नुसते जेवतच बसू ?' 'हंडित आहे तोवर लांडीला झोप नाही.' अशी ठाकरी म्हण आहे. कणग्यांत धान्य आहे तोवर बायका खर्च करीत राहणार. तिला हटकले तर ती म्हणेल, 'आम्ही काय नुसत्या कणग्यांकडेच बघत बसू.' कारण समोरच्या परिस्थितीचे ती सतत मूल्यमापन करत असते.

: ४ :

आर्थिक जीवनाचे प्रश्न

पार्श्वभूमी :

आदिवासी समाजाच्या आर्थिक जीवनाची माहिती देताना महाराष्ट्र राज्यातील शेतकरीवर्गाची गेल्या शंभर वर्षांत काय परिस्थिती होती, ती कशी बदलत गेली याची थोडक्यात माहिती करून घेणे इष्ट ठरेल.

कै. प्रा. राधाकमल मुकर्जी 'द लँड प्रॉबलेम इन इंडिया' या आपल्या पुस्तकात म्हणतात, 'भारतातील जमीन ही सर्व जमातींची किंवा जमातींच्या एका विभागाची, गाव-समाजाची किंवा गावात असलेल्या एका विशिष्ट गोत्राची किंवा घराण्याची समजली जात असे. सरंजामशाही किंवा साम्राज्यशाही अर्थव्यवस्थेतही प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकरी वर्गाव्यतिरिक्त जमिनीवर अन्य कोणाचीही मालकी असल्याची कल्पना आढळून येत नाही.' ब्रिटिश राजवटीत ही व्यवस्था कोलमडून पडली व प्रबळ अशा वर्गाकडे जमिनीची मालकी गेली. आदिवासी लोकांच्याही जमिनी याच वेळी मध्यम व ऐतखाऊ वर्गाकडे गेल्या. हे स्थित्यांतर प्रामुख्याने खालील कारणांनी घडून आले.

१. मुंबई राज्यात रयतवारी पद्धती होती तरी आदिवासींच्या आज्ञानामुळे व गरीबीमुळे त्यांचे प्रतिनिधित्व ऐतखाऊ वर्गच करत होता. हळूहळू या वर्गांनी त्यांच्या जमिनी हस्तगत केल्या.

२. यंत्रोत्पादित पक्का माल परदेशांतून हिंदुस्थानच्या बाजारपेठेत येऊ लागला. कच्च्या मालाची हिंदुस्थानातून निर्यात वाढली. देशातील अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला. ग्रामव्यवस्था कोलमडली व देशातील संपत्तीचा ओघ शहराकडे वळला. शोषकवर्गाची देवाणघेवाण वाढली व गरजेसाठी उत्पादन थांबले. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणारांचे शोषण ही नित्याची बाब झाली. हळूहळू आदिवासी जमातींकडे असलेल्या जमिनी गैरहजर मालकाकडे जाऊ लागल्या. १८९२ मध्ये Deccan Agriculture Relief Act च्या परिणामकारकतेबाबत चौकशी करण्यास नेमलेल्या कमिशनने या प्रक्रियेचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

३. १८६१ च्या District Survey Land and Record च्या नोंदीवरून ८०–९० वर्षांपुर्वी बहुतांश जमीनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या असे दिसून येईल. सर सेमिग्टन यांच्या रिपोर्टातही तसा स्पष्ट उल्लेख सापडतो. पण पुढे या विभागांत व्यापाराच्या निमित्ताने अगर अन्य कारणांनी दुकानदार, व्यापारी, मारवाडी, मुसलमान, ठेकेदार लोकांची पुष्कळ खरेदी-विक्री सुरू झाली. खरेदी-विक्रीच्या काळात आदिवासींच्या आज्ञानाचा फायदा घेऊन मामुली कर्जाच्या पोटी ही मंडळी जमिनीचे मालक बनली.

४) १८९९ च्या दुष्काळाच्या कहरामुळे हजारो आदिवासींनी मुलाबाळांना वाचवण्यासाठी सावकारांना जमिनी लिहून दिल्या व पुढे त्या सावकारांच्याच झाल्या.

५. १९३० ते १९३५ या काळातील जगातील मंदीच्या लाटेमुळे खेडचांत व आदिवासी विभागांत त्याचा फार मोठा परिणाम झाला. सरकारी सारा भरणे, खंड देणे, इत्यादी बाबी कठीण झाल्यामुळे बऱ्याच जमिनी जमिनदार व सावकारांच्या ताब्यात गेल्या.

शेतकऱ्यांची स्थिती

वरील ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली तर आदिवासींच्या हल्लीच्या जमीनविषयक परिस्थितीची कल्पना येण्यास मदत होईल. आदिवासी लोकांच्या उपजीवीकेचे मुख्य साधन शेती आहे. त्यात स्वतःची शेती कसणारे, दुसऱ्याची शेती खंडाने करणारे व दुसऱ्याच्या शेतीवर मजूरी करणारे असे तीन प्रकार मुख्यतः आढळतात. महाराष्ट्रातील आदिवासींत सुमारे ९० टक्के लोक शेतीवर जगणारे आहेत. ५० टक्के स्वतः शेतकरी असून ४० टक्के शेतमजूर आहेत. महाराष्ट्रात कूळकायदा येण्यापूर्वी शेतमजूरांची संख्या मोठी होती. त्यानंतर अनेक शेतमजूरांना व कुळांना ते कसत असलेल्या जमिनी मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची टक्केवारी वाढली आहे.

शेतकरी असणाऱ्यपैंकी ७० टक्के शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनी आहेत. तर २५ टक्के लोक दुसऱ्याच्या जमिनी करतात व राहिलेले खंडाने किंवा भागीदारीने शेती करतात. शेती करीत असलेल्या ८० टक्के आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ लहान आहे. पश्चिम महाराष्ट्रात गांधी स्मारक निधीमार्फत केलेल्या पाहणीत हे प्रमाण दर कुटुंबी सरासरी ३.७८ एकर असल्याचे आढळून आले आहे. गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेने व स्वतः लेखकाने नाशिक जिल्हचांतील आदिवासींची जी पाहाणी केली, त्यानुसार ३५ टक्के आदिवासी शेतकऱ्यांची जमीन ५ एकरापेक्षा कमी व ५५ टक्के आदिवासी शेतकऱ्याची जमिन ५ ते १० एकर असल्याचे आढळून आले. वरवर पाहता ही जमीनधारणा

समाधानकारक वाटण्याची शक्यता आहे. पण आदिवासी भागातील भौगोलिक स्थिती, जमिनीचा मगदूर, कस, पावसाचा अनियमितपणा विचारात घेता व प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राचा विचार करता हे प्रमाण विभागानुसार २.६४ एकरापासून ३.५५ एकरापर्यंत असल्याचे आढळून आले. यावरून आदिवासींच्या शेत जमीनीची ढोबळ मानाने कल्पना करता येईल.

आदिवासीच्या शेतजमीनीच्या प्रमाणाचाच केवळ विचार करून चालणार नाही. परंपरागत शेतीपद्धतीत काही सुधारणा झाल्या आहेत किंवा नाही हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने विचार करता बव्हंशी जमातींतील शेतकरी अजूनही परंपरागत पद्धतीनेच शेती करतात. जुनीच अवजारे, जुनीच वहिवाट, जुनीच पीकपद्धती आजही चालू आहे. डोंगरउतारावरील जंगलतोड करून तेथे शेती करण्याची परंपरागत पद्धत, बदलत्या शेतीची रावपद्धत, 'दली-पद्धत, स्थलांतरित शेती पद्धत' आज माडिया गोंड, वारली, कातकरी, ठाकर, महादेवकोळी व सह्याद्री सातपुड्याच्या घाटमाथ्याला राहणारा आदिवासी करीत आहे. जुनाट व परंपरागत पद्धतीमुळे व एकूण आदिवासींची सारीच जमीन डोंगरउतारावर, दऱ्याखोऱ्यांत असल्यामुळे व ती पावसाळी पाण्यावर अवलंबून असल्या कारणाने त्या विभागातील जमिनीत फक्त पावसाळी पिके येतात. तीही कोणती पिके तर भात, वरी, नाचणी, सावा, कोदो, कुडकी, राळे, भादली इत्यादी तृणधान्ये. हिवाळी पिके (उदा. गहू, ज्वारी) फक्त काही भागांतच होतात. त्यांचे प्रमाण अर्थात फारच अल्प आहे. आदिवासी भागातील उत्पादनाचे प्रमाण दर एकरी १६ रुपयांपासून, जास्तीत जास्त १५० रुपयांपर्यंत आहे. यावरून आदिवासीला शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची साधारण कल्पना येईल. महाराष्ट्रातील कोणत्याही आदिवासी जमातीत शेतीचे उत्पन्न सरासरी एक हजार रुपयापेक्षा अधिक असल्याचे आढळून येत नाही. या उत्पन्नाव्यतिरिक्त जंगलतोड, वाहतूकमजुरी, शेतमजूरी, हळी, बिगार इत्यादी जोडधंद्यांपासून त्याला काही दिवस मजुरी व त्या मजुरीतून मामुली उत्पन्न मिळते. या साऱ्या उत्पन्नातून शेतीसाठी लागणारा खर्च, सारा, सरकारी कर्ज, दुकानदाराची देणी, जत्रा, सण समारंभ, लग्नकार्य, विधी इत्यादींचा खर्च भागवावा लागतो. त्यामुळे त्यांच्या वर्षाच्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा ताळमेळ कधीच बसत नाही. पावसाळ्याचे तीन चार महिने त्यांना जीवन अगदी नकोसे होते. धान्य, कपडा, मीठ, मिरची, तेल, रॉकेल इत्यादी साऱ्या जीवनावश्यक बाबींची त्याला तरतूद करून ठेवावी लागते. परंतु हातात पैसा नसल्यामुळे सावकाराचे उंबरठे झिजवावे लागतात. पावसाळ्यात कित्येक कुटुंबांना अनेक दिवस उपासपोटी किंवा आंबील पिऊन किंवा कडू कंदमुळे खाऊन रहावे लागते. अशा पडत्या काळात फक्त एकवेळ जेवणारांची

टक्केवारी गोंड, वारली, कातकरी, भिल्ल, ठाकर, तडवी, महादेवकोळी, कोकणा या जमातींत सुमारे ५० टक्क्यांहून जास्त असल्याचे आढळून आले आहे. अशा प्रकारच्या कठीण परिस्थितीमुळे बहुतेक आदिवासींना दरवर्षी कर्जबाजारी व्हावे लागते.

मूळतः शेतीचे उत्पन्न कमी, जोडधंद्यांचा अभाव व अपुरा रोजगार, बाजार भावाचे अज्ञान, सावकारांचे शोषण, उत्पादनाच्या साधनाकरिता लागणारा पैसा व कुशलता यांचा अभाव इत्यादी आदिवासीच्या गरीबीची कारणे सांगता येतील. ह्या सर्वांवर मात करून आदिवासीची आर्थिक सुधारणा करावयाची म्हणजे त्याच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेती यातच मूलभूत सुधारणा केली पाहिजे.

आदिवासीची शेती लहान जमीनधारकांत मोडते. म्हणून लहान जमीनधारकाच्या विकासाची तत्त्वे मुख्यतः स्वीकारावी लागतील. इतर लहान जमीनधारक व आदिवासी जमीनधारक यांतील मूलभूत फरक असा आहे की, बिगर आदिवासी लहान जमीनधारक तुलनेने सुशिक्षित असल्यामुळे त्यांना उत्पादनाची साधने पुरविली की ते जलद गतीने प्रगती करू शकतात. पण आदिवासींच्या बाबतीत तशी अपेक्षा करता येणार नाही. त्यांना उत्पादनाच्या साधनांबरोबर उत्पादनवाढीचे शिक्षणही द्यावे लागेल. आदिवासींच्या जमीनसुधारणेच्या कार्यक्रमात जलसिंचनाच्या कार्याला प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी पाझर तलाव, टेरेसिंग, बंडिग, मध्यम व लहान पाटबंधारे, तळी, विहिरी, नालाबंडिंग, गावतळ्याची दुरुस्ती, लिफ्ट योजना इत्यादींना प्राधान्य द्यावे लागेल. सध्याची त्यांची एकपिकी जमीन त्यामुळे दुपार पिकाखाली आणता येईल. शिवाय शाश्वत पाण्याच्या पुरवठ्यामुळे त्याला चांगल्या जातीच्या पिकांची लागवड करता येईल. आदिवासी शेतकरी स्वतःच्या पायावर उभा राहून स्वतःची उत्पादनसाधने निर्माण करू शकत नाही. त्या साधनांसाठी लागणारे भांडवल उभारण्याची त्याची आर्थिक स्थिती नाही. तो वाटा शासनाने उचलला पाहिजे. आदिवासींच्या शेती सुधारणेची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया आहे हे लक्षात घेऊन त्यांच्या शेतीविषयक प्रशिक्षणाचा कार्यक्रम अधिक कार्यक्षम केला पाहिजे.

शेतमजुरांची आर्थिक स्थिती

शेतमजूर हा आदिवासीच्या अर्थव्यवस्थेत सर्वांत दुबळा आणि उपेक्षित असा घटक आहे. आदिवासी भागातील ९८ टक्क्यांहून अधिक शेती कोरडवाहू आहे. त्या जमिनीत भात, नाचणी, वरई, सावा, उडीद, कुलीथ, ज्वारी आणि कापूस इत्यादी पिके घेतली जातात. अशा प्रकारच्या कोरडवाहू शेतीवर काम करणाऱ्या मजुरांना वर्षभर रोजगार मिळत नाही. उलट वर्षातील कित्येक महिने त्यांना बेकारीत दिवस काढावे लागतात.

महाराष्ट्रामध्ये शेतमजुरांची संख्या ५३ लक्ष ९८ हजार १३८ इतकी असून एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येशी त्याचे प्रमाण ३० टक्के आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकांत हेच प्रमाण ६० टक्के आहे. यावरून महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या तुलनेने आदिवासींमध्ये शेतमजूराचे प्रमाण दुप्पट आहे हे दिसून येईल.

शेतमजुरांचे प्रकार

आपली शेती परंपरागत पद्धतीने चालत आल्यामुळे नांगरणीपासून ते कापणीपर्यंतची विविध कामे शेतमजुराकडून रोजगारावर करून घेतली जातात. शिवाय आपल्या शेतीच्या पद्धतीत मजुरांच्या कामाचे वैशिष्ट्यीकरण (specialisation) झालेले नाही. एकाच मजुराला एका दिवसात निरनिराळी कामे देखील करावी लागतात. फरक येवढाच की, नांगरणी, जड ओझ्याची वहातूक यांसारखी अधिक कष्टाची कामे पुरुष मजूर करतात. तर लावणी, सोंगणी, भागलण, वेचणी यांसारखी हलकी कामे स्त्रिया करतात. आदिवासी शेतमजूरांत ढोबळ मानाने खालील प्रकार आढळतात.

(१) **रोजंदार :** प्रत्येक शेतात रोजंदारीवर नांगरट, लावणी, कापणी करणारे मजूर. ७५ टक्क्यांहून अधिक आदिवासी शेतमजूर रोजंदारीवर काम करतात. त्यांना हंगामात फक्त काम मिळते. बाकीचे दिवस त्यांना बेकार किंवा अर्धबेकार म्हणून रहावे लागते.

(२) **सालदार :** वर्षाच्या कराराने पैशाच्या आणि धान्याच्या स्वरूपात मजूरी ठरवून दुसऱ्यांच्या शेतात काम करणारे मजूर सालदार किंवा घरगडी असतात. या मजूरांना आपल्या मालकाकडे घरची व शेतीविषयक कामे करावी लागतात, शेणगोठा करणे, जनावरांना पाणी पाजणे, शेतीवर जाणे, घरची अंथरुणे घालणे. वगैरे सर्व कामे सालदाराकडून करून घेण्यात येतात. ही प्रथा धुळे, ठाणे, जळगाव नासिक, चंद्रपूर आणि कुलाबा या जिल्ह्यांच्या आदिवासी भागांत विशेष स्वरूपात आढळते. इतर भागात अशा कराराने काम करणारांची संख्या तुलनेने कमी आहे.

(३) **लग्नाचे गडी :** लग्नप्रसंगी आदिवासींना पैशाची गरज लागली की, त्यांना जमीनमालकाकडे धाव घेण्याखेरीज गत्यंतर नसते. हे कर्ज पैशाच्या किंवा धान्याच्या रूपाने फेडावे लागते. अशा वेळी सावकाराकडे किंवा जमीनमालकाकडे काम करून पैशाची फेड करावी लागते. ही पद्धत ठाणे जिल्ह्यातील आदिवासींमध्ये फार मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. हे कर्ज बहुधा लग्नासाठी दिलेले असते. कर्जापोटी सावकार किंवा जमीनदाराकडे आदिवासी स्त्री–पुरुषाला ५ वर्षांपासून २० वर्षांपर्यंत किंवा जन्मभर गुलामासारखे राबवून घेणारी ही पद्धत.१००-२००

रुपये कर्ज फेडण्यासाठी नवरा-बायका सावकराकडे रोज १०–१२ तास काम करून सुद्धा अनेक वर्षे त्यांचे कर्ज फिटत नाही.

(४) **वेठबिगर :** जमीनमालक, सावकार आणि धनिक लोकदेखील आदिवासींना आपल्या घरी, शेतावर, मळ्यात किंवा इतर ठिकाणी कामासाठी राबवून घेत असतात. हे श्रम आदिवासीकडून विनमोबदल्याने किंवा अगदीच अल्प मोबदल्यात काही वर्षे किंवा कर्ज फिटेपर्यंत वांधून घेतले जातात. जमीनमालकाने आदिवासी कुळाला कुठली तरी जमीन दिली की, त्या कुळाने मालकाच्या स्वतःच्या जमिनीवर वर्षातले काही दिवसतरी फुकट काम केले पाहिजे असा दंडकही काही भागात दिसून येतो. या श्रमाबद्दल त्याने कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा करता कामा नये अशी जमीनमालक, पाटील, तलाठी, फॉरेस्टर, पोलीस, दुकानदार व धनिक नोकर यांची इच्छा असते.

याशिवाय वर्षातील काही दिवस जंगलतोड, कोळसा पाडणे, गवत कापणे असे अनेक जोडधंदे आदिवासी भागांत चालतात. याही धंद्यांत आदिवासी मजुरांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. पावसाळ्याच्या अगोदर ठेकेदार, जमीनदार आणि सावकार आदिवासींना पुढील कामाच्यापोटी पैसे वाटतात. व दिवाळीनंतर त्या पैशाच्या मोबदल्यात काम करून घेतात. अगोदर पैसे घेतल्यामुळे दुसरीकडे कामासाठी जाता येत नाही व आपली मजूरीही वाढवून मागता येत नाही. याशिवाय 'घरगडीपद्धत, घरजावईपद्धत, लमझाना पद्धत, जलाटपद्धत, पालेमोड पद्धत, हळीपद्धत, जंगलवेठ' अशा अनेक प्रकारांनी आदिवासी मजुरांना कोंडीत पकडून त्याच्याकडून अल्प मजुरीत प्रसंगी त्यांचा अनन्वित छळ करून भरपूर कामे करून घेतली जातात.

कामाचे दिवस : शेतमजूराला वर्षातील किती दिवस काम मिळते याचा आढावा खाली दिला आहे.

६६ टक्के मजुरांना ५ ते ७ महिने काम मिळते तर फक्त २५ टक्के मजुरांना ८ ते १० महिने काम मिळते. वहुसंख्य मजुरांना ५ महिने बेकारच रहावे लागते. जुलै ते नोव्हेंबर या ५ महिन्यांच्या काळात शेतीची बरीच कामे चालू असतात. त्यामुळे शेतमजुरांना काम मिळते. पण डिसेंबर ते जून या सात महिन्यांच्या काळात मजुरांना रोजगाराविना दिवस काढावे लागतात. या काळात रोजंदारी मिळाली, काम मिळाले तरी ते अनेकवेळा अर्ध दिवसाचे असते. अर्ध वेळ कामामुळे मजुरांना मामुली मजुरीवर काम करावे लागते. आदिवासी मजुराला वर्षातून सरासरी किती दिवस काम मिळते याचा मध्य (mean) काढला तर तो १८३ दिवस येतो. म्हणजे आदिवासी शेतमजूराला वर्षातले फक्त ६ महिने काम मिळते आणि ६ महिने त्याला बिनरोजगार राहावे लागते, असे चित्र दिसते.

कामाचे सर्व प्रकार एकत्र धरून पुरुष शेतमजुराला वर्षातले १८० दिवस, स्त्रीला ११० दिवस व मुलांना ७६ दिवस काम मिळते. त्यात निंदणी, भाजणी, शेतीतील किरकोळ कामे यासाठी मजुरीचे दर सामान्यपणे कमी असतात किंवा ही कामे अर्धा दिवसच करावी लागतात.

१४ वर्षांखालील मुलांचाही शेतीचे कामासाठी उपयोग केला जातो. अशा मुलांचे प्रमाण सालदार किंवा घरगडी या प्रकारात अधिक आढळून येते. महाराष्ट्र राज्यातील एकूण घरगड्यांपैकी १५ टक्के घरगडी १४ वर्षांखालील मुले आहेत. ठाणे आणि धुळे जिल्ह्याच्या आदिवासी भागात घरगड्यांची (सालदार) एक विशिष्ट परंपरा आढळून येते. त्यामुळे या भागात घरगड्याचे प्रमाण अधिक आढळते. सारांश, आदिवासी भागात घरगड्यांचे प्रमाण अधिक आहे. कर्ज फेडण्यासाठी शेतमजूर पिढ्यान्‌पिढ्या शेतकऱ्याकडे आणि सावकारकडे राबत असतात. कित्येकवेळा बापाचे कर्ज फेडण्यासाठी मुलाला लहानपणापासून राबावे लागते. परिणामी आदिवासी भागात १४ वर्षांखालील सालदाराचे प्रमाण जास्त आढळून येते.

शेतमजूर आणि उत्पन्न

शेतमजुराच्या कुटुंबात सरासरी ४ ते ५ माणसे आढळतात. दर कुटुंबात त्यांपैकी काम करणाऱ्यांचे प्रमाण (लहान मुले धरून) २ ते ३ इतके असते. मुलांचे व स्त्रियांचे रोजंदारीचे दर अत्यंत कमी असतात. मजुरी लक्षात घेता शेतमजुराच्या घरात २ माणसे देखील कमवणारी आहेत असे म्हणता येणार नाही. आदिवासी भागात मजूरी रोख न देता धान्य रूपाने दिली जाते. एका दिवसाला मजूराला १ आधोली किंवा २ शेर धान्य किंवा २ आठवे (२ किलो धान्य) किंवा २ ते ३ रुपये, दुपारचे जेवण, बिडी आणि तंबाखू असा मजूरीचा दर असतो. एका कुटुंबात सामान्यपणे १ पुरुष, १ स्त्री व १ मुलगा काम करणारा असेल आणि सामान्यपणे वर्षातून त्यांना सरासरी १८०, ११० व ७५ दिवस काम मिळते, असे गृहीत धरल्यास त्यांची एकूण मजूरी ७३२ किलो एवढी होते. धान्यरूपाने दिली जाणारी मजूरी भात आणि नागली या धान्यात दिली जाते. तेथील भावाप्रमाणे या धान्यांची किंमत काढल्यास ती सामान्यपणे ४०० ते ५०० रुपयांपर्यंत होते. यावरून भूमिहीन शेतमजूराच्या वर्षाच्या उत्पन्नाची कल्पना येईल.

: ५ :

कर्जबाजारीपणा आणि आर्थिक शोषण

आदिवासींमधील एक परंपरागत प्रवृत्ती म्हणजे कर्ज घेण्याची. आदिवासींची ही प्रवृत्ती परिस्थितीमुळे स्वाभाविक बनली आहे, हे त्यांच्या आर्थिक स्थितीच्या विवेचनांवरून सहज लक्षात येईल. आदिवासींच्या कर्जबाजारीपणाचा विचार करत असताना ही समस्या समजावून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील कर्जबाजारीपणाचे प्रमाण काय आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेने, ब लेखकाने जमविलेल्या माहिती वरून हे प्रमाण दर कुटुंबात सरासरी ४७१ रु. ५९ पैसे व ९६ किलो धान्य इतके असल्याचे आढळून आले. विचार करता कर्ज व त्यावरील दिडी-दुपटीचे व्याज वजा जाता आदिवासींच्या वार्षिक उत्पन्नाचा किती भाग शिल्लक राहात असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी. आदिवासींच्या पहाणीत ज्या आदिवासी कुटुंबाकडे जमिनी आहेत त्यांच्यात स्वाभाविकपणे कर्जाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. त्याचे कारण जेथे तारणास जमीन आहे तेथे सावकार, व्यापारी, जमीनदार व कर्ज देणाऱ्या संस्था सढळ हाताने कर्ज देतात. तारण नसणाऱ्या गरीब आदिवासींना कर्जापोटी जवळ जवळ आर्थिक गुलामगिरीच पत्करावी लागते. कर्ज घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जमातीनुसारही भिन्न आढळते. कर्जाच्या रकमेतही असाच फरक आढळतो. कर्ज फेडण्याची व तारणाची ताकद, प्रत्येक जमातीच्या जीवनावश्यक गरजा, शेतीत येणारे पीक यांवर प्रामुख्याने हे प्रमाण अवलंबून असल्याचे आढळून येते. आदिवासींना कर्ज पुरविणाऱ्या संस्थांसंबंधी विचार केला असता अलीकडे निरनिराळ्या योजनांद्वारे मिळणाऱ्या कर्जामुळे सरकारी कर्जाचे प्रमाण वाढलेले दिसते. धनिक, जमिनदार व सावकाराच्या कर्जाचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत असल्याचे पहाणीत नमूद झाले आहे. सावकाराचे कर्ज सांगण्यास आदिवासी प्रथमतः तयार नसतो व त्याने कर्ज सांगितलेच तर आहे त्यापेक्षा तो फारच कमी कर्ज सांगतो. या प्रवृत्तीमुळे सावकार, धनिकाचे कर्जप्रमाण केवळ ५० टक्क्यांपर्यंत दिसते. वस्तुतः हे प्रमाण अधिक आहे यात शंका नाही.

कर्ज घेण्यामागील आदिवासींची आर्थिक, सामाजिक स्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. तसेच त्यांची मनोभूमिकाही नीट समजावून घेतली पाहिजे. साव-

काराचे कर्ज चुकते करणे, देणी फेडणे हे एक पवित्र कार्य आहे अशी त्यांची श्रद्धा आहे. सावकाराच्या दानतीवर त्यांचा विश्वास आहे. एक वेळ सहकारी सोसायटचांचे देणी ते वेळेवर देणार नाहीत पण सावकाराचे कर्ज मात्र न चुकता वेळेवर दिले जाते. इतकेच नव्हेतर पित्याचे कर्ज फेडणे मुलाला मान्य होते. पित्याचे कर्ज सावकार सांगेल तसे मान्य करावे लागते. पिढ्यान्‌पिढ्या कर्ज घ्यावयाची आणि ती फेडत राहावयाची साखळी त्यामुळे अव्याहत चालू असते. 'आदिवासी कर्जात जन्मतो, कर्जातच वाढतो आणि कर्जातच मरतो.' आदिवासींच्या कर्जांचा विचार करताना त्याच्या सामाजिक गरजा, लग्न, मृत्यू, विधी, आदरसत्कार, सण समारंभ यासाठी त्याला कर्ज घ्यावे लागते. सावकार सांगेल ते व्याज व देईल ती रक्कम स्वीकारून कर्ज निमूटपणे अव्याहत फेडत राहणे तो आपले प्रामाणिक कर्तव्य मानतो. सावकारावर त्याची नितांत श्रद्धा असते. त्याचे कारण सावकार हा गरजेच्या वेळी अगदी अल्प तारणावर किंवा शब्दावर कर्ज देतो. तो पिढीजात सावकार असतो. सावकार आणि कुळे ही पिढ्यान् पिढ्याची साखळी असते. 'पिढी, जातकुळे आणि पिढीजात सावकार' असे त्यांत सूत्र असते. कधी कधी सावकार त्यात धोका स्वीकारतो असे वाटले तरी आदिवासींची मनोभूमिका माहीत असलेला कोणीही सूज्ञ माणूस त्यात धोका आहे असे मानत नाही. 'आदिवासींची प्रामाणिकपणे कर्ज फेडण्याची प्रवृत्ती' हेच सावकाराचे खरे तारण असते. सरकारी यंत्रणा अल्प मुदतीत, अल्प तारणावर किंवा तारणविरहीत कर्ज देत नाही. उलटे आदिवासी सावकाराच्या घरी केव्हाही जातो अगणि कर्ज घेऊन येतो. ही परंपरागत पद्धती आहे. खेडचात अनेक कुटुंबे एक किंवा अनेक सावकारांच्या कर्जाखाली दबलेली असतात. सावकरांचो अलिखित संघटना असते, नियम असतात. ते एकमेकांचे हित पाहतात. एका सावकाराची कुळे दुसऱ्या सावकाराकडे गेली तर तो त्यांना कधीही कर्ज देत नाही. वंशपरंपरेने ज्या सावकाराकडे वाडवडील कूळ होते त्याचेकडेच कर्ज घ्यावे लागते. त्याच्याकडेच सतत कर्ज घेत असल्यामुळे कौटुंबिक धागेदोरे व अन्य संबंध त्यात प्रस्थापित झालेले असतात, गुंतलेले असतात. याच सावकाराने त्या आदिवासीला अनेक प्रसंगी हर प्रकारे मदत केलेली असते. 'लग्न जमविण्यात तो पुढारी असतो. भांडण–तंटा सोडविण्यात त्याचा शब्द अखेरचा मानला जातो. वेळी अवेळी बैल, गाई, शेळी, कपडे, किराणा तोच घेऊन देतो.' साऱ्या महत्वाच्या प्रसंगांना सावकार आदिवासींचा साथीदार असतो. मग त्याच्यावरील त्यांची श्रद्धा कशी कमी होणार ? सावकाराचे प्रभुत्व व उपकाराचे ओझे इतके असते की आदिवासी त्यातून बाहेर पडूच शकत नाही. सुशिक्षित आदिवासी, तथाकथित आदिवासी पुढारी, शोषणाच्या ह्या अपप्रवृत्तीची जाणीव निर्माण झालेले आदिवासी हे देखील या दुष्टचक्रातून अद्याप बाहेर आलेले

नाहीत. अद्यापही ते त्याचेच बटीक आहेत. आदिवासी आमदार, खासदारांच्या भोवती तालुक्यांच्या गावी आदिवासी शोषकांचेच कोंडाळे असते. आदिवासी बिचारे दूर कुठेतरी भेदरलेल्या चेहऱ्यांनी उभे असतात. असे नेतृत्व आदिवासींचे कल्याण काय करणार ? जमीनदारी, सावकारी, शोषणाविरुद्धचा आवाज त्यामुळे संघटित चळवळीचे रूप घेऊ शकत नाही. या उलट त्याला बोटचेप्याचे स्वरूप आले आहे. एकूण त्यामुळे कर्जबाजार समस्या अधिक बिकट झालेली आहे. सावकाराच्या बाबतीत दुसरे असे की, तो कर्जफेड कोणत्याही स्वरूपात स्वीकारतो. तो त्याची मेहनत घेऊ शकतो. धान्य घेऊ शकतो. गवत, लाकूडफाटा घेऊ शकतो व प्रसंगी कर्ज माफही करतो. अर्थात व्याजांत मुद्दलाची वसुली झाल्यावर.

आदिवासींच्या दुःखाचे मूळ मुख्यतः आर्थित शोषणात आहे. ही पिळवणूक विगर-आदिवासी समाज कोणी सावकार, धनिकाच्या रूपाने, कोणी जमीनदाराच्या रूपाने, तर कोणी जंगल ठेकेदाराच्या रूपाने, तर कोणी सेवेचे व्रत घेऊन पुढारी बनून चालली आहे. प्रत्येकजण आदिवासीच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा फायदा घेण्यासाठी मिळेल त्या मार्गाने, संधी मिळेल तेथे सतत प्रयत्न करीत असतो. सावकार, व्यापारी, जमीनदार, दुकानदार, बडे शेतकरी यांचे आदिवासी कायमचे भक्ष्य झाले आहेत. आदिवासी आडचणीत आहेत असे पाहून त्यांच्याकडून अधिक फायदा उपटण्यासाठी 'जलाप पद्धतीने, पालेमोड पद्धतीने व दिडी-दुपटीच्या पद्धतीने' खरेदीचे व्यवहार सर्रास होतात. आदिवासी विभागात प्रख्यात असलेली 'लग्नगडी व पालेमोड' पद्धत म्हणजे आदिवासींचे शोषण करणारी राक्षसी प्रथाच आहे. बाजारात भाव काहीही असो, आदिवासीचे पीक शेतात उभे राहण्यापूर्वी येणाऱ्या पिकाच्या तारणावर त्याला कर्ज द्यायचे व येणाऱ्या पिकाचा भाव ठरवून त्याची खरेदी करावयाची. लेखी काही नसते. व्यवहार सर्व तोंडीच. ही पद्धत वर्षानुवर्षे आदिवासी भागात चालू आहे. कधी कधी कर्जापोटी सावकार कर्जरोखे लिहून घेतात. पीक येताच पूर्वी ठरलेल्या भावाने पीक तर घेतातच. पण दामदुपटीचे व्याजही घेतात व पूर्वीचे राहिलेले कर्जही वसूल करतात. अशा तहेरी पिळवणुकीने आदिवासी रिकामा होतो व पुन्हा सावकाराच्या दाराची वट त्याला धरावी लागते.

आर्थिक शोषणाचा दुसरा एक मोठा प्रकार म्हणजे भाताची कापणी संपल्याकर आदिवासी गवत कापण्यासाठी लांब-दूर जातो. गवताची राने, जंगले धनिकांनी घेतलेली असतात. अशा वेळी त्यांच्या गरीबीचा, अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना कामाचे पैसे वेळेवर न देणे, अपुरा हिशोब देणे, गवताची मोजणी चुकविणें, अगोदर दिलेल्या पैशापोटी दामाच्या दुप्पट काम करून घेणे इत्यादी

प्रकार होतात. काही सावकार, जमीनदार मंडळी गरीब आदिवासींचा वापर घरकामासाठी, गुरे सांभाळण्यासाठी, सरपण फोडण्यासाठी करतात पण कामाचा मोबदला मात्र दिला जात नाही.

आदिवासींच्या पोटल्या किंवा गाठोडे विशिष्ट पद्धतीने खरेदी करणे हा शोषणाचा आणखी एक प्रकार आहे. घरात लागणाऱ्या दैनंदिन वस्तू उदा. कापड, मीठ, तेल, गूळ वगैरे खरेदी करण्यासाठी त्याच्याजवळ पैसा नसतो, त्यासाठी त्याला जवळचे धान्य अगर वस्तू विकाव्या लागतात. त्या वस्तूंच्या पोटल्या डोक्यावर घेऊन हे आदिवासी बाजाराच्या ठिकाणी विकावयास आणतात. ज्या ठिकाणी मोक्याचे रस्ते गावात शिरतात तेथे छोटे व्यापारी आपला अड्डा जमवून बसतात व जे कोणी आदिवासी धान्याची गाठोडी बाजारात आणतात त्यांना शक्य ती कमी किंमत देऊन खोट्या मापाने मालाची मोजणी करून, खोटी मापे वापरून त्यांचा माल खरेदी करतात. पुष्कळ वेळा व्यापारी त्यांची गाठोडी हिसकावून घेतात व मोजण्याचे सोंग करून कमीत कमी पैसे त्याच्या हातावर ठेवतात. हिशोबात गफलत करणे तर त्याच्या रक्तातच भिनलेले असते.

शोषणाचा आणखीन एक प्रकार म्हणजे अधिक मोलाची वस्तू घेऊन हलक्या किमतीची वस्तू देणे. आदिवासीकडून पायलीभर भात किंवा तांदूळ घेऊन ३–४ पायली मीठ अगर कांदे व थोडीसी सुकी मासळी दिली जाते. म्हणजे ४–५ रु. किंमतीचा आदिवासीचा माल घेऊन व्यापारी त्याच्या पदरात रुपया–दोन रुपयाचा माल घालतो. वस्तूचे वजन न करणे, वाटे मांडून मोघम पद्धतीने विक्री करून आदिवासींना फसविण्याचे प्रकार बाजारात सर्रास होतात.

शोषणाचा दुसरा एक प्रकार म्हणजे गहाण ठेवलेली वस्तू खरेदी केली असे समजून वागणे. आदिवासी एखादी वस्तू सावकाराकडे गहाण ठेवतो. पुढे गहाण रक्कम फेड केली तरी ती वस्तू त्याला परत मिळत नाही. भाव चांगला आला तर सावकार ती विकून टाकतो व कमी भावाने आदिवासीला पैसे देतो. आणीबाणीचे काळांत यावर जी बंधने आली ती आदिवासींच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाची होती.

शोषणाचा याहीपेक्षा वेगळा प्रकार म्हणजे गरीब आदिवासी बाजाराला आला म्हणजे त्याच्याकडून भांडी घासून घेणे, जनावरे धुऊन घेणे, कपडे धुऊन घेणे, घर साफ करून घेणे वगैरे कामे करून घेतली जातात. जमीनदार, सावकाराच्या या कामात त्यांनी नकार दर्शविला तर त्याला शिवीगाळ ऐकावी लागते व प्रसंगी मारही खावा लागतो. येवढे करूनही कर्ज फिटले नाही तर सावकार, जमीनदार त्या आदिवासीला स्वतःच्या घरी घरकामासाठी ठेवून घेतो. गुलामा-

सारखें जीवन त्याला जगावे लागते. त्यातही सावकाराचे कर्ज संपले नाही तर ते आदिवासी कुटुंब सावकाराच्या वेठीला लावले जाते. नवरा, बायको, मुले रात्रंदिवस सावकाराच्या, जमीनदाराच्या घरी राबत असतात. काही सावकार, जमीनदार आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आदिवासींचे गवत व झाडोरा स्वस्त दरात खरेदी करतात. आदिवासीजवळ झाडोऱ्याची फी भरण्यासाठी वेळेवर पैसे नसतात. त्याचा फायदा घेऊन ठेकेदार, व्यापारी बऱ्याच आदिवासींना हाताशी धरून त्यांच्या झाडोऱ्याची फी स्वतःच भरतात व त्याची चांगली किंमती सागाची झाडे खरदी करतात.

सावकारी आणि आर्थिक शोषणाच्या संदर्भात कधी कधी आदिवासींना कर्जासाठी मुलगा किंवा मुलगी तारण म्हणून सावकाराच्या, जमीनदाराच्या घरी काम करण्यासाठी ठेवावी लागते. हे कर्ज फिटत आले की हयाच मुला-मुलींच्या लग्नासाठी पुन्हा आदिवासीला कर्ज घ्यावे लागते. मग हे नवविवाहित जोडपे पुन्हा कर्ज फेडण्यासाठी सावकाराच्या, जमीनदाराच्या घरीच राबते. अशा प्रकारे पिढ्यान् पिढ्या जीवन जगत असलेली अनेक कुटुंबे आदिवासी विभागात आढळतात. विवाहाचा खर्च भागविण्यासाठी आदिवासीला स्वतःला गहाण ठेऊन पैसे काढावे लागतात. लग्न झाले तरी हा नवविवाहित आदिवासी पैसे फिटेपर्यंत सावकाराकडे काम करीत राहतो. त्यामुळे त्याची आणि त्याच्या नवपरिणितेची कित्येक दिवस गाठ-भेट होत नाही. त्यांना संसार थाटता येत नाही. अनेक वेळा कर्ज फिटून आदिवासी मोकळा होतो पण तोपर्यंत त्याची बायको लग्नगाठ सोडून दुसऱ्याचा हात धरून गेलेली असते. असे आहे आदिवासीच्या जीवनाचे विदारक चित्र.

थोडक्यात आदिवासीचे शोषण व पिळवणूक मुख्यतः दोन मार्गाने होते असे म्हणतात येईल. आदिवासी लोक आपल्या शेतातील अगर जंगलातील जो माल बाजारात आणतात त्याचे वजन बरोबर केले जात नाही 'झटका देणे, पाय मारणे, खोटे माप करणे' हे प्रकार त्यात होतात. अशा प्रकारे वजनात त्यांना फसविले जाते. त्याच्या मालाला रास्त भावही मिळत नाही. शिवाय हिशेबात घोळ करणे, किरकोळ पैसे न देणे, किलोपेक्षा माल कमी असेल त्याचा हिशोब न करणे व एकवेळ पैसे न देता हप्त्याहप्त्याने पैसे देणे, अनेकवेळा त्याला हेलपाटे मारावयास लावणे, पैशाच्या मोबदल्यात त्याच्या पदरात दुकानातील माल बांधणे असे अनेक प्रकार केले जातात. त्यात आदिवासींची अतोनात फसवणूक होते.

दुसरा प्रकार पावसाळ्यापूर्वी आदिवासीच्या घरी जेव्हा खाण्यासाठी धान्य नसते, त्याला पावसाळ्याच्या सोयीसाठी विशेषतः तेल, मीठ, मिरची कपडा घेण्यासाठी पैशाची जरूरी असते अशावेळी सावकार किंवा व्यापाऱ्याशिवाय

पैसे देणाऱ्याचा त्याला आधार नसतो. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन व्यापारी धनिक आदिवासीच्या शेतात पुढे येणाऱ्या मालाचा भाव अगाऊ ठरवून कर्जाच्या मोबदल्यात त्याचे धान्य खरेदी करण्याचा सौदा करतात. व्याज मुद्दलातून प्रथम वजा करून आदिवासीच्या हातावर पैसे ठेवले जातात. यामुळे ३० ते ४० रुपयांच्या कर्जासाठी आदिवासीला १०० ते १५० रुपयाचा माल व्यापाराला द्यावा लागतो. या व्यवहारात आदिवासींची पिळवणूक अधिक होते. हे अघोरी प्रकार थांबविण्यासाठी एकतर आदिवासी भागातील व्यापाऱ्यांवर बंदी घालणे जरूरीचे आहे किंवा आदिवासीची शेती व जंगलमाल शासनाने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आदिवासीचे आर्थिक शोषण थांबण्याची शक्यता नाही.

❋ ❋ ❋

: ६ :

आदिवासी भागातील आर्थिक विकास व शिक्षणाची दिशा :

आदिवासींचा आर्थिक विकास व्हायचा असेल तर त्यासंबंधीची त्यांची जाणीवही विकसित होणे अत्यावश्यक आहे. आदिवासींच्या सामाजिक परिस्थितीचे अपरिहार्य दडपण त्यांच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमावर येते. आदिवासी माणसात सामाजिक जाण निर्माण व्हायला हवी आहे आणि शिक्षण त्याकरिता अतिशय गरजेची बाब होऊन बसते. परंतु आदिवासी भागातील आजचे शिक्षण हे जीवनाशी फारकत झालेले आहे, फारकत करणारे आहे. ही फारकत टाळून जीवननिष्ठा जगता येतात याचा साक्षात्कार घडविणाऱ्या शिक्षणाचा शोध घेतला पाहिजे.

आदिवासी भागात गावोगावी शाळांच्या इमारती असूनही त्या बंद असतात. तिथे अमाप दारिद्र्य आहे. उपासमार नित्याची आहे. फारसा रोजगार उपलब्ध नाही. लहान लहान शेती हेच उपजिवीकेमध्ये प्रमुख साधन आहे. बहुधा शेती नुकसानीतच असते. शेती कामाकरिता पैशाची गरज असते. ते सावकाराकडून कर्ज म्हणूनच यावे लागतात. कर्ज फेडण्याची कुवत फारशी नसल्यामुळे कर्जही अगदी अल्प

सारखें जीवन त्याला जगावे लागते. त्यातही सावकाराचे कर्ज संपले नाही तर ते आदिवासी कुटुंब सावकाराच्या वेठीला लावले जाते. नवरा, बायको, मुले रात्रंदिवस सावकाराच्या, जमीनदाराच्या घरी राबत असतात. काही सावकार, जमीनदार आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आदिवासींचे गवत व झाडोरा स्वस्त दरात खरेदी करतात. आदिवासीजवळ झाडोऱ्याची फी भरण्यासाठी वेळेवर पैसे नसतात. त्याचा फायदा घेऊन ठेकेदार, व्यापारी बऱ्याच आदिवासींना हाताशी धरून त्यांच्या झाडोऱ्याची फी स्वतःच भरतात व त्याची चांगली किंमती सागाची झाडे खरदी करतात.

सावकारी आणि आर्थिक शोषणाच्या संदर्भात कधी कधी आदिवासींना कर्जासाठी मुलगा किंवा मुलगी तारण म्हणून सावकाराच्या, जमीनदाराच्या घरी काम करण्यासाठी ठेवावी लागते. हे कर्ज फिटत आले की हयाच मुला-मुलींच्या लग्नासाठी पुन्हा आदिवासीला कर्ज घ्यावे लागते. मग हे नवविवाहित जोडपे पुन्हा कर्ज फेडण्यासाठी सावकाराच्या, जमीनदाराच्या घरीच राबते. अशा प्रकारे पिढ्यान् पिढ्या जीवन जगत असलेली अनेक कुटुंबे आदिवासी विभागात आढळतात. विवाहाचा खर्च भागविण्यासाठी आदिवासीला स्वतःला गहाण ठेऊन पैसे काढावे लागतात. लग्न झाले तरी हा नवविवाहित आदिवासी पैसे फिटेपर्यंत सावकाराकडे काम करीत राहतो. त्यामुळे त्याची आणि त्याच्या नवपरिणितेची कित्येक दिवस गाठ-भेट होत नाही. त्यांना संसार थाटता येत नाही. अनेक वेळा कर्ज फिटून आदिवासी मोकळा होतो पण तोपर्यंत त्याची बायको लग्नगाठ सोडून दुसऱ्याचा हात धरून गेलेली असते. असे आहे आदिवासीच्या जीवनाचे विदारक चित्र.

थोडक्यात आदिवासीचे शोषण व पिळवणूक मुख्यतः दोन मार्गाने होते असे म्हणतात येईल. आदिवासी लोक आपल्या शेतातील अगर जंगलातील जो माल बाजारात आणतात त्याचे वजन बरोबर केले जात नाही 'झटका देणे, पाय मारणे, खोटे माप करणे' हे प्रकार त्यात होतात.) अशा प्रकारे वजनात त्यांना फसविले जाते. त्याच्या मालाला रास्त भावही मिळत नाही. शिवाय हिशेबात घोळ करणे, किरकोळ पैसे न देणे, किलोपेक्षा माल कमी असेल त्याचा हिशोब न करणे व एकवेळ पैसे न देता हप्त्याहप्त्याने पैसे देणे, अनेकवेळा त्याला हेलपाटे मारावयास लावणे, पैशाच्या मोबदल्यात त्याच्या पदरात दुकानातील माल बांधणे असे अनेक प्रकार केले जातात. त्यात आदिवासींची अतोनात फसवणूक होते.

दुसरा प्रकार पावसाळ्यापूर्वी आदिवासीच्या घरी जेव्हा खाण्यासाठी धान्य नसते, त्याला पावसाळ्याच्या सोयीसाठी विशेषतः तेल, मीठ, मिरची कपडा घेण्यासाठी पैशाची जरूरी असते अशावेळी सावकार किंवा व्यापाऱ्याशिवाय

पैसे देणाऱ्याचा त्याला आधार नसतो. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन व्यापारी धनिक आदिवासीच्या शेतात पुढे येणाऱ्या मालाचा भाव अगाऊ ठरवून कर्जाच्या मोबदल्यात त्याचे धान्य खरेदी करण्याचा सौदा करतात. व्याज मुद्दलातून प्रथम वजा करून आदिवासीच्या हातावर पैसे ठेवले जातात. यामुळे ३० ते ४० रुपयांच्या कर्जासाठी आदिवासीला १०० ते १५० रुपयाचा माल व्यापाराला द्यावा लागतो. या व्यवहारात आदिवासींची पिळवणूक अधिक होते. हे अघोरी प्रकार थांबविण्यासाठी एकतर आदिवासी भागातील व्यापाऱ्यांवर बंदी घालणे जरूरीचे आहे किंवा आदिवासीची शेती व जंगलमाल शासनाने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आदिवासीचे आर्थिक शोषण थांबण्याची शक्यता नाही.

❋ ❋ ❋

: ६ :

आदिवासी भागातील आर्थिक विकास व शिक्षणाची दिशा :

आदिवासींचा आर्थिक विकास व्हायचा असेल तर त्यासंबंधीची त्यांची जाणीवही विकसित होणे अत्यावश्यक आहे. आदिवासींच्या सामाजिक परिस्थितीचे अपरिहार्य दडपण त्यांच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमावर येते. आदिवासी माणसात सामाजिक जाण निर्माण व्हायला हवी आहे आणि शिक्षण त्याकरिता अतिशय गरजेची बाब होऊन बसते. परंतु आदिवासी भागातील आजचे शिक्षण हे जीवनाशी फारकत झालेले आहे, फारकत करणारे आहे. ही फारकत टाळून जीवननिष्ठा जगता येतात याचा साक्षात्कार घडविणाऱ्या शिक्षणाचा शोध घेतला पाहिजे.

आदिवासी भागात गावोगावी शाळांच्या इमारती असूनही त्या बंद असतात. तिथे अमाप दारिद्र्य आहे. उपासमार नित्याची आहे. फारसा रोजगार उपलब्ध नाही. लहान लहान शेती हेच उपजिवीकेमध्ये प्रमुख साधन आहे. बहुधा शेती नुकसानीतच असते. शेती कामाकरिता पैशाची गरज असते. ते सावकाराकडून कर्ज म्हणूनच यावे लागतात. कर्ज फेडण्याची कुवत फारशी नसल्यामुळे कर्जही अगदी अल्प

प्रमाणात मिळते. त्याचा व्याजाचा दर दरसाल दर शेकडा २०० ते ८०० रु. पर्यंत पडतो. १० रु. कर्जाकरिता ४० ते ५० रु. किंमतीचे. एक मण भात ३ महिन्यानंतर परत फेडीसाठी द्यावे लागते. एवढचा व्याजाचे मुद्दल कधीही फिटत नाही आणि येथील माणूस सदैव कर्जातच बुडालेला असतो. त्यांच्या नशिबी गुलामगिरीचे जीवनच असते.

आदिवासींचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा आणि उपासमार टळावी म्हणून त्यांच्या शेतीतून शास्त्रीय पद्धतीने अधिक उत्पादन काढण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्याची जरूरी आहे. आदिवासी भागात भातशेतीमध्ये पूर्वी जेथे जेमतेम ३०० ते ४०० किलो एकरी भाताचे उत्पादन येत असे त्या जागी अलीकडे एकरी १००० किलो भात काढण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. परंतु या विभागात दारूचा प्रभाव भयावह आहे. भविष्यकाळाबद्दलची बेसुमार बेदरकारी आहे. माणसांचा भविष्यकाळ हरवलेला आहे. त्यामुळे चांगले जीवन जगणे, बचत करणे वगैरे गोष्टी त्यांच्या समजुतीपलीकडच्या आहेत. त्यामुळे हाती आलेला पैसा असातसाच खर्च केला जातो. त्यातच अंधरूढींचा पगडा जबरदस्त आहे. मर्तिक व लग्न या दोन बाबींवर खर्च करायलाच हवा असे रूढींचे जणू बंधनच आहे. या सर्व परिस्थितीत नुसते आर्थिक उत्पादन वाढवून कार्यभाग होण्यासारखा नाही.

आदिवासी भागातील माणूस समजून त्याची सामाजिक जाण वाढविणारे शिक्षण त्याला मिळणे आवश्यक आहे. स्वाभाविक येथील कामाच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचे कार्य साध्य करायला हवे. अर्थात हचाची रूपरेषा नजरेसमोर स्पष्ट होऊ लागते, येथील शिक्षणाने किमान काय घडवायला हवे ?

१. औदासिन्य कमी करून आदिवासींना कार्यप्रवृत्त करणे.

२. जीवनाबद्दलची त्यांच्यात आकांक्षा निर्माण करणे.

३. श्रम करून माणूस स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो हा विश्वास निर्माण करणे.

४. उपयोगात न आणलेली व पडून राहिलेली अशी जी श्रमशक्ती आहे तिचा उपयोग करून भांडवलनिर्मिती करणे.

५. शिक्षण संपविल्यावर शिक्षित माणूस हचाच विभागात राहील एवढा बदल त्यांच्यात निर्माण करणे.

औदासिन्य नष्ट करणे, कार्यप्रवृत्ती वाढविणे या दोन गोष्टी एकमेकांना पूरक अशाच आहेत. आदिवासी भागात एक जबरदस्त औदासिन्याचा थर समाजजीवनावर साकळलेला आहे. वर्षानुवर्षांच्या पिळवणुकीतून व शोषणातून तेथील माणसावर इतका काही औदासिन्याचा प्रभाव आहे की त्यातून बाहेर येऊन

कोणी काही करू शकेल हा विश्वासच जणू नष्ट झाला आहे. शेती हाच येथील प्रमुख धंदा किंवा उपजीविकेचे साधन. पण तीसुद्धा कशीतरी रखडत होत असते. कारण साधनांचा सदैव तुटवडा. त्यामुळे वर्षातून एकदा भाताचे अगर अन्य धनधान्यांचे पीक घेतले की जमीन रिकामीच असते. दुसरे पीक घेण्याचा आदिवासी प्रयत्न करत नाही. उत्तम गव्हाचे पीक, उत्तम ज्वारी किंवा बाजरीचे पीक घेऊन त्यांच्याच शेतात प्रात्यक्षिक करून दाखविण्याच्या प्रयोगशाळा सुरू करण्याची खरोखर नितांत गरज आहे.

आदिवासींची शेती सुधारण्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत काही अडचणी आहेत आणि त्या दूर करणे बरेच कठीण आहे. त्या अडचणी मानव-निर्मित किंवा मानवाशी संबंधित आहेत. आदिवासी विभागांत शेतकऱ्याला भातशेती व कडधान्ये करण्यापलीकडे फारसे ज्ञान नाही, संवय नाही. भातशेती ते करतात; तर मग ज्वारी, गहू यांची शेती ते करतील ही आपण गृहीत धरलेली गोष्ट तितकीशी खरी नाही. येथे जी काही एक अधुरी अपुरी अशी संस्कृती निर्माण झालेली आहे, त्यात भात–तांदळाला अत्यंत जिव्हाळ्याचे व पवित्र स्थान आहे. कोणीही कोठे बसलेले असेल तर सहजपणे केरकचऱ्यातून भाताचे दाणे निवडून काढतील. वेचणी करायला लागले तर भाताचे रोप उपटणार नाहीत. कणसरी म्हणजे भाताची लोंबी ती हातात घेऊन शपथ घेतली तर त्या शपथेला मोठा अर्थ प्राप्त होतो. भाताचा दाणा, रोपटे यांना जीवनात, संस्कृतीत एक आगळेच स्थान प्राप्त झालेले आहे. माणसे पावसाळ्यात भाताच्या लागवडीच्या वेळी मनापासून काम करीत असताना दिसतात. खायला धान्य कर्जाऊ आणलेले असते. त्यावेळी घरात धान्य असते. तेव्हा काम कशाला करायचे असे कोणी म्हणायचे ठरविले तर अशक्य नाही पण आळशातला आळशी माणूससुद्धा भात लागवडीत गुंतलेला असतो. याचा अर्थ घरात खायला आहे म्हणून येथील सर्वसाधारण माणूस काम करीत नाही असे आपण जे मानतो त्याला हा अपवाद आहे. खरे म्हणजे भात पिकल्यावर त्याला तो भात १–२ महिनेच पुरेल हे माहीत असते. त्याने जर रबी लागवडी-मध्ये उत्साहाने भाग घेतला तर त्याला काम मिळून त्याची उपासमार कमी होऊ शकेल. पण तो रबी लागवडीबाबत उदासीन असतो. ह्या उलट पावसाळ्यात जेमतेम २ महिने पुरेल एवढेच धान्य त्याने कर्जाऊ आणलेले असते. आणि तो भातशेतीची कामे उत्साहाने करतो. तेव्हा घरात खायला नसले म्हणजेच तो काम करतो एवढे स्पष्टीकरण भातशेतीच्या संदर्भात अपुरे पडते. ही एक प्रकारची संस्कृतीच निर्माण झालेली आहे की, भातशेती हे दैवत आहे. भाताचे काम करायचे म्हणूनच पाऊस पडला की मोकाट गुरे बंद आ...३

होतात. शेतात भात आहे तोवर गावाचा एक अलिखित असा कायदा असतो कोणीही गुरे सोडायची नाहीत. ह्यातही भातशेतीला संरक्षण दिलेले आहे. 'भात' कणसरी भोवती आणखीही जीवनांतील बरेच प्रसंग गुंफलेले आहेत. अक्षदा वापरणे, खळ्याच्या देवांची पूजा करणे, लग्नाचे चौक भरणे, गाव दिवाळीला घरोघरचे तांदूळ जमविणे, भगताने तांदूळ चाळणे वगैरे गोष्टी तांदळाशी निगडित आहेत.

गव्हाची लागवड सुरू करण्यात ही मानसिक अडचण आहे. त्यावेळी भात कापणी पूर्ण होऊन उडवी रचलेली असतात. झोडणी न करता गहू लागवडीच्या कार्यक्रमाला जोरात लागायला हवे. पण त्यावेळी माणसे काम करण्याच्या मनःस्थितीत नसतात. तुम्ही बोलावलेत तरी कामाला येणार नाहीत. तेव्हा दुसरे पीक काढण्याची गरज, विहिरीची गरज, नदीचे पाणी वापरण्याची गरज वगैरे गोष्टी लहानपणापासून येथील शिक्षणात घालाव्या लागतील. येथील पुस्तके त्यादृष्टीने लिहावी लागतील. त्यात हे लहान मुलांना नव्याने शिकवावे लागेल. त्यासाठी नवे अभ्यासक्रम तयार करावे लागतील. लहानपणापासूनच शिक्षणातून मुलांच्या मनावर संस्कार घडवून जीवनाबद्दलचे औदासिन्य दूर करण्याचा मुद्दाम प्रयत्न करण्याची जरूरी आहे. तसेच कार्यप्रवृत्त करणारा अभ्यासक्रम आखावा लागणार आहे. त्यांना समजणारी भाषा बोलायला हवी. गवतातला 'ग' त्यांना समजू शकेल. पण कमळातला 'क' समजू शकणार नाही. एकूण त्यांची संस्कृती कणसरी, भाताच्या लोंबीभोवती गुंफलेली आहे. आदिवासीचे वर्ग शेतावरच भरावे लागतील. शिक्षणाचा एक वेगळाच प्रयोग करावा लागेल. त्याविना आदिवासी भागांत नवचैतन्य आणता येणार नाही.

तेथील दारिद्र्य कमी करायचे तर आपल्याला अगदी सहज, सोप्या, सरळ वाटणाऱ्या गोष्टी करण्याबद्दल औदासिन्य आहे ते घालविले पाहिजे. नदीचे पाणी दुथडी भरून वहात असते. त्याचा उपयोग करून उत्पादन वाढ करण्याची प्रेरणा त्यांच्यात आली पाहिजे. काहींना हे औदासिन्य पाहून कमालीचा उद्वेग येतो, नैराश्य येते. त्यांना अगदी प्रामाणिकपणाने वाटते की, ह्या लोकांची मानसिक तयारी झाल्याशिवाय आर्थिक विकासाची कामे करू नयेत.

गरीब देशाच्या ज्या प्रमुख गरजा असतात त्यात अन्नधान्यपुरवठा ही प्रमुख गरज. भांडवलपुरवठा किंवा भांडवलनिर्मिती ही आणखी एक महत्त्वाची गरज. पण भांडवल कसे उभे करायचे ह्या आपल्या सारख्या

गरीब देशात ? आपल्या जवळच्या साधनसामुग्रीचा भांडवलनिर्मितीच्या दृष्टीने उपयोग करणे हा एक उपाय आहे. आपल्या जवळ न वापरलेली, पडून राहिलेली अशी साधनसामुग्री भांडवल निर्मितीसाठी वापरता येईल.

हे व असेच प्रश्न व समस्या हचा विभागाच्या आहेत. हचा सर्व समस्या व प्रश्न आर्थिक विकासाशी निगडित आहेत. बाहेरून कोणीतरी येऊन यक्षिणीची कांडी फिरवून चमत्कार करून हा विकास घडवू शकणार नाही. आदिवासी माणसाने स्वतःच्या हिमतीवर, आत्मविश्वासावर उभे राहून तो घडवून आणावयाचा आहे. आणि आज आदिवासी माणूस तर कणा मोडल्यासारखा वाटतो आहे. तर मग हे घडावे कसे ?

त्याकरिता शिक्षणापासून सुरुवात करावी लागेल आणि येथील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाशीं आश्रमशाळाचा संबंध व समन्वय सुरू करावा लागेल. आदिवासी विभागात सुमारे ४०० आश्रमशाळा आहेत. बरीच वर्षे त्या चालू आहेत. परंतु समाजजीवनावर परिणाम घडविण्याच्या दृष्टीने आणि आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनण्याच्या दृष्टीने त्या फारशा प्रभावी झालेल्या नाहीत. या गोष्टीची दखल घेऊन येथील आश्रमशाळाचा अभ्यासक्रम व उपक्रमशीलता असावी ही आदिवासींची गरज आहे. येथे भाताची रोपे करण्यासाठी जागा भाजून घेण्याचा रिवाज आहे. त्याला राब म्हणतात. ही रावाची जागा तयार करण्याकरिता वर्षभर माणसे शेण गोळा करीत असतात. गुरे मोकाट सोडलेली असतात. त्यांचे जे शेण शेतात किंवा माळरानावर पडलेले असेल ते दिवसभरात एक बाई टोपली दोन टोपली गोळा करते. तिच्या मजुरीचा हिशोब करण्याचा प्रश्नच नसतो. ते जाळण्यासाठी किंवा राब पद्धतीने जाळण्यासाठी झाडांचे फारच नुकसान होते. हिवाळचात पानझड होते. मोठाली टोपली डोक्यावर घेऊन सुकलेली पाने रावावर जाळण्यासाठी सकाळ संध्याकाळ असंख्य माणसे हा उद्योग करीत असतात. त्याऐवजी हचा पालापाचोळचाचे कंपोस्ट खत करून ते वापरले तर जमिनीचा पोत सुधारण्याच्या दृष्टीने व उत्पादनक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने किती तरी पटीने फलदायी होऊ शकेल. हे सर्व प्रात्यक्षिक शिक्षणातून मुलांपर्यंत व नंतर त्यांच्या शेतीपर्यंत पोचवले पाहिजे.

दुसरे उदाहरण आहे उनाड, मोकळचा, सुटचा गुरांचे. भाताची कामे सुरू झाली की गुरे बांधली जातात. बाकीचे दिवस ती मोकाट सुटलेली असतात. गुरे सर्वांच्या शेतात जमिनी उजाड करीत असतात. त्यामुळे कुंपणाचा खर्च अतोनात वाढतो. सर्वांना दरवर्षी कुंपण करावेच लागते. किती तरी वेळ व मजुरी त्यात वाया जात असते. शिवाय दुसरे पीक हचा गुरांच्या उपद्रवामुळे घेता येत नाही. त्यामुळे दारिद्र्य कायम राहते. हे सर्व बंद करायचे तर लहानपणापासूनच शिक्षणातून हे संस्कार घडवायला हवेत.

आदिवासी भागांत शेतकऱ्याजवळ खायला असे फारसे नसते. म्हणून त्याला दसऱ्याच्या अगोदर पिकेल असे भात हवे असते. त्याला हळवे भात म्हणतात. कुडई, महाडी, हारी, सावी, पांढरी साळ, तांबकुडी हया भाताच्याजाती ६० ते ९० दिवसात पिकतात. त्यांचे उत्पन्न फारच कमी म्हणजे जेमतेम एकरी २०० ते ४०० किलो येते. स्वाभाविक ते पिकवलेले भात फारच कमी दिवस टिकते. परंतु आता कमी दिवसांत पिकणाऱ्या भाताच्या जातीवर संशोधन सुरू आहे. पावसाळ्यात हया जातीची दोन पिके घेणे शक्य होणार आहे. त्यामुळे एका एकारातून वर्षभर खायला पुरून उरेल एवढे उत्पादन वाढविता येण्याजोगे आहे. हे शिक्षणातून मुलांना समजायला हवे. आधीच संवेदनक्षमता जीर्ण झालेल्या येथील शेतकऱ्यांवर नुसत्या प्रात्यक्षिकांचादेखील फारसा परिणाम होत नाही. तो परिणाम शाळेच्या शिक्षणातून जीवनाचा एक भाग बनायला हवा आहे.

आदिवासी जीवनाचा वेध घेताना मनुष्य स्वभावाचे दर्शन घडते. त्यातून आर्थिक विकास व सामाजिक विकास हे परस्परावलंबी कसे आहेत हे प्रकर्षाने जाणवते. दोन्हीही विकास एकाच वेळी एकमेकांचा तोल सांभाळून करण्याची गरज जाणवते. त्याकरिता शिक्षण जीवनाभिमुख करण्याची गरज आहे. सुदैवाने हया घडीला शिक्षणातील तोकडेपणा व त्रुटी यांची जाणीव फार मोठ्या प्रमाणात शिक्षणतज्ञांना व हया प्रश्नाशी संबंधीत व्यक्तींना जाणवू लागली आहे. अशा वेळी परिस्थितीनुरूप शिक्षण हे शाळेच्या चार भिंतीच्या खोलीत कोंडून न ठेवता त्याला बाहेर मोकळे करून जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करण्याची गरज निर्माण झालेली आहे.



ग्रंथ संग्रहालय ठाणे
2690
दि. 23...
शाखा (स्थळ प्रत)

: ७ :

खाजगी वन-जमिनी, जंगल जमिनी आणि वनविषयक प्रश्न

आदिवासी सुधारणेसाठी जे काही प्रयत्न झाले (सरकारतर्फे व विधायक कार्य करणाऱ्या संस्थांकडून) त्यात आदिवासी विभागात ठिकठिकाणी जंगल-कामगार सहकारी सोसायटचा काढण्यास सरकारने जो पुढाकार घेतला व जी मदत दिली तिचा उल्लेख केला पाहिजे..

जंगल तोडीच्या व्यवसायात खाजगी ठेकेदार आदिवासींची आर्थिक व सामाजिक पिळवणूक तर करीतच, पण त्याबरोबर आदिवासीं समाजाला भ्रष्ट करीत./ही होणारी पिळवणूक किती भयंकर स्वरूपाची होती याचे स्पष्ट दिग्दर्शन सर सेमिंग्टन यांनी मुंबई सरकारला सादर केलेल्या अहवालावरून स्पष्ट होते. या शोषणाची व पिळवणुकीची परिणती पुढे वारली लोकांनी बंड करण्यात झाली याचा उल्लेख मागे आलाच आहे. पुढे त्यानंतर असाही परिणाम झाला की, जंगलातून खाजगी ठेकेदार दूर केला पाहिजे या विचाराला त्या वेळच्या मंत्रि-मंडळाने एकमताने चालना दिली. खाजगी ठेकेदाराकडून हा धंदा काढून घेऊन तो जंगल कामगार सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्या ताब्यात द्यावा असे तत्व मान्य करण्यात आले. जंगल कामगारांची ही जी चळवळ सुरू झाली तिच-मुख्य उद्देश होता, "खाजगी जंगल ठेकेदारांना सनदशीर मार्गाने दूर करून जंगल कामगार सहकारी सोसायटचा मार्फत आदिवासी मजुरांना योग्य मजुरी मिळवून देणे. आदिवासींना सहकारी संस्था चालविण्याचे शिक्षण देणे व त्यांचा सर्वांगीण विकास साधणे." जंगल कामगार सोसायटचा निरनिराळचा आदिवासी सेवा मंडळातर्फे व सर्वोदय मंडळाद्वारे स्थापन करण्यात आल्या.\ हचा चळवळीला सुरुवात होऊन पाव शतक पूर्ण होऊन गेले आहे. महाराष्ट्रात सुमारे ४०० जंगल कामगार सोसायटचा स्थापन झाल्या आहेत. विदर्भाचा काही भाग सोडला तर ८५ टक्के जंगल विभागा-तून व सोसायटचांच्या कार्यक्षेत्रातून जंगल कंत्राटदारांचे उच्चाटन झाले आहे. ही चळवळ म्हणजे पिळल्या जाणाऱ्या गरीब आदिवासींच्या आत्मोन्नती-साठी त्यांना सुदृढ पायावर उभे करणारे ते एक महत्त्वाचे पाऊल होतो पूर्वी दुसऱ्या तिसऱ्या पिढीत आदिवासीला दिलेल्या कर्जाची फेड सावकार कंत्राटदाराच्या दारी तीन पिढचा राबून देखील पूर्ण होत नव्हती आणि

त्या विरुद्ध ब्र काढण्याचे धैर्य त्याला नव्हते. अशा वेळी कंत्राटदाराच्या हिता-विरुद्ध मनाने पिचलेल्या, दडपलेल्या आदिवासींना स्वतंत्रपणे जंगलकुपाचे काम चालवायला देण्याचे सामर्थ्य व त्यांच्या विकासाचा मार्ग आपल्या अवसानाच्या कक्षेत असल्याची जाणीव देण्याचे बिकट कार्य जंगल कामगार संस्थांनी केले आहे.

या कार्याबरोबरच शिक्षणादी क्षेत्रांत देखील संस्थांनी आदिवासींत आस निर्माण केली आहे. विधायक दृष्टिकोन असलेल्या कर्तृत्ववान आदिवासी तरुणाची व नेतृत्वाची जी नवी पिढी महाराष्ट्रात दिसत आहे तिचे बरेच श्रेय जंगल कामगार चळवळीला द्यावे लागेल. सावकार व जंगल अधिकारी या दोघांच्याही जुलुमापासून आदिवासी पूर्णतः मुक्त झाला नसला तरी पूर्वीची स्थिती आज राहिलीं नाही. याचे बरेच मोठे श्रेय या चळवळीला द्यावे लागेल. जंगल कामगार सोसायटचांद्वारे आदिवासी निर्भय बनला. सोसायटचांच्या व्यवस्थापनात त्याने लक्ष घातले. त्याद्वारे त्यांच्यातून नवे नेतृत्व उदयास आले.

जंगल कामगार संस्थांत काही अपप्रवृती शिरल्या आहेत. सुरवातीच्या काळात आदिवासीला सोसायटचाच्या कामकाजासंबंधी काही समजत नव्हते. पण आज तो पुढे येत असताना ह्या अपप्रवृत्तींचा बंदोबस्त केला पाहिजे. आदि-वासी जंगल कामगार सोसायटचांचा विधायक विकासाकडे उपयोग करून घेण्यात आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक प्रबोधनाला बळकटी येईल असा विश्वास वाटतो. जंगल कामगार सोसायटचा बिगर आदिवासींच्या हातातील साधन बनल्या आहेत. आदिवासी केवळ मजूर अशीच त्यांची अवस्था आहे. जंगल कामगार क्षेत्रातील आदिवासीला अहितकारक ठरणारे नियम, सोसायटचांची सध्याची कामकाजपद्धती, अकार्यक्षम झालेली राज्य जंगल कामगार सहकारी फेडरेशन, त्यातील व्यवहारांचे घोळ आणि हितसंबंधीतांचे स्वार्थी राजकारण, वनखात्याची या संघटनेकडे पाहण्याची वक्रदृष्टी यातून ही चळवळ आता मृत्यूघंटेची वाट पहात आहे.

आदिवासींचे आर्थिक' सामाजिक आणि भौतिक हित मोठ्या प्रमाणात वनांवर अवलंबून आहे. आणि म्हणून वनविकासाच्या धोरणाचा आदि-वासींच्या जीवनावर खोल परिणाम झालेला आहे. राष्ट्रीय वन संपत्तीचे संवर्धन व रक्षण आणि वनविभागात राहणाऱ्या आदिवासींचे कल्याण ह्या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. म्हणून वनात, वनाशेजारी राह-णाऱ्या व वनावर आधारित आर्थिक जीवन जगणाऱ्यांसाठी योजना करणे

व आदिवासींच्या आर्थिक उन्नत्तीच्या कोणत्याही कार्यक्रमात वनावर आधारित असलेल्यांना जास्तीत जास्त लाभ पोहोचेल अशा वनविकास पद्धतीचा समावेश करणे आदिवासी परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. पण तसे उपक्रम आज कुठे दिसत नाहीत. १९५२ सालच्या वननीतिविषयक ठरावात स्पष्ट म्हटले आहे की, " वननियंत्रण, वनशिक्षण व वनविषयक संशोधन या तीन सूत्रांवरच वनव्यवस्थापन सुस्थिर रहाणारे असले तरी वन विभागातील जनतेचे कल्याण आणि त्यामुळे वननियंत्रण, वनशिक्षण, वनविषयक संशोधन या तीन सूत्रावर वनव्यवस्थापनाला शाश्वत आधार मिळणार आहे. कितीही शास्त्रशुद्ध व उत्तम वननीती बनविली तरी ती आदिवासींच्या सक्रीय पाठिंब्याशिवाय व सहकार्याअभावी यशस्वी होणार नाही. त्यांना वनोपजाच्या कार्यक्रमांत गोडी वाटेल अशी परिस्थिती निर्माण करण्याची गरज आहे. थोडक्यात रानावनातून पसरलेला वनवासी समाज आणि वने यांचे संबंध परस्परपूरक व अतूट आहेत. दोघांच्याही विकासाचा मेळ न राहिला तर वनाचे संरक्षण होणार नाही व सामाजिक न्यायही प्रस्थापित होणार नाही.

खाजगी वनजमिनी

महाराष्ट्रातील वनांची तोड होऊ नये म्हणून त्यावर निर्बंध बसविण्यासाठी राखीव वनांपासून १ ते २ मैलांपर्यंत मालकी जमिनीवरील झाडांच्या तोडीस निर्बंध घालणारे कलम ३५ सन १९५५ साली लावून या क्षेत्रात येणाऱ्या मालकीच्या खाजगी जमिनीवरील झाडेतोडीवर निर्बंध घालून वनाला संरक्षण देण्यात आले.

हे कलम लावताना त्यावेळी असलेल्या जमीनमालांकना शासकीय नोटीसा देण्यात आल्या. राज्यात कुळकायद्यामुळे गेल्या काही वर्षात बदल होऊन त्या वेळची कुळे आज त्या त्या जमिनीचे मालक बनले. मोठा खातेदार जाऊन आता अनेक लहान खातेदार झाले आहेत. परंतु १९७५ च्या खाजगी वने संपादन कायद्याप्रमाणे खाजगी वने ताब्यात घेताना सन १९५४ साली ३५ सेक्शन लावलेल्या जमिनीवरील पिकाखालील जमीन सोडून बाकी जमिनी या कायद्याने खाजगी वने म्हणून शासनाचे ताब्यात आल्या असे समजून या व पूर्वी दितेल्या नोटीसा कायदेशीर धरून अनेक लहान खातेदारांच्या पिकाखालील जमीन वगळता बाकी सर्व जमीनी ताब्यात घेण्यास सुरुवात झाली. त्यामुळे लहान शेतकऱ्यांवर अन्याय झाला. कलम ३५ लावलेला भाग हा राखीव वनाच्या आसपासचा असल्यामुळे व या भागात बहुसंख्य शेतकरी आदिवासी असल्याने कुळकायद्याप्रमाणे नुकतीच मिळालेली जमीन या कायद्याने

परत घेतली गेली. त्यामुळे या कायद्याने आदिवासी व लहान शेतकऱ्यांवर अन्याय झाला. एका बाजूस कुळकायद्यातील व सिलिंगच्या जमीनी आदिवासींना देण्याचा कार्यक्रम तर दुसऱ्या बाजूस आदिवासी शेतकऱ्यांनी राब करणे; बैल चारणे व नागली, वरी या पिकासाठी ठेवलेल्या जमिनी काढून घेणे हे धोरण विसंगत असेच आहे. महाराष्ट्रात मोठमोठी खाजगी वने ताब्यात घेण्याच्या उद्देशाने हा कायदा केला आहे. परंतु लहान व गरीब शेतकऱ्यांना तो लागू केला जात आहे. म्हणून लहान शेतकरी व सिलिंग पर्यंतच्या शेतकऱ्यांच्या जमिनीस हा कायदा लागू करणे योग्य ठरणार नाही. जिथे खास वने राखून ठेवलेली असतात अशाच खाजगी वनास हा कायदा लागू करणे उचित ठरेल.

विस्थापित आदिवासींचे उद्ध्वस्त जीवन आणि हरित क्रांती

सह्याद्री–सातपुड्याच्या घाटमाथ्यावरील व घाटपायथ्याखालील प्रदेशाचे भौगोलिक स्थान लक्षात घेण्यासारखे आहे. हा प्रदेश मोठमोठ्या दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला आहे. पश्चिमेला सह्याद्रीपर्वत, उत्तर दक्षिण डोंगराच्या उंच रांगा आणि पूर्वेचा भाग मोकळा अशी या मोठमोठ्या दऱ्यांची भौगोलिक रचना आहे. पूर्वेकडील डोंगराची तोंडे साधली की मोठा 'कॅचमेन्ट एरिया' तयार होतो. अशा जागा धरणांसाठी फारच सोयीच्या आणि उपयुक्त असतात. जे भूभाग सह्याद्री, सातपुड्यात आहेत त्यामध्ये अनादीकालापासून आदिवासी जमातीचे लोक रहात आहेत. या भागात मोठे धरण प्रकल्प उभे करावयाचे म्हणजे येथील आदिवासींना विस्थापित करून पुन्हा त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. असे अनेक प्रकल्प सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, घाटपायथ्याला आणि पठारी प्रदेशात सुरू झालेले आहेत व पुढेही काही होणारे आहेत. त्यातून आदिवासींच्या पुनर्वसनाची समस्या निर्माण झाली आहे.

शासनाने स्वीकृत केलेल्या मोठ्या आणि मध्यम पाटबंधारे, वीज आणि इतर प्रकल्पांपुढे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनाबाबतच्या तत्त्वानुसार प्रकल्पविस्थापितांच्या जमिनी प्रकल्पाच्या कामाकरिता ताब्यात घेण्यापूर्वी त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य हाती घ्यायला हवे. प्रकल्पविस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसनाशी निगडीत असलेल्या मुख्य दोन बाबी म्हणजे–

(१) प्रकल्पाच्या कामाकरिता ज्या प्रकल्पविस्थापित खातेदारांच्या जमिनी जातात त्यांना त्यांच्या पूर्वीच्या उद्योगाशी सुसंगत असा शेतीव्यवसाय उपलब्ध करून देण्यासाठी सममूल्य तत्त्वानुसार पर्यायी शेतजमिनी मिळवून देणे.

(२) ज्या प्रकल्पविस्थापित लोकांची घरे प्रकल्पाखाली जातात अशांना नवीन घरांच्या पुर्नबांधणीसाठी नवीन गावठाणांत निवासासाठी भूखंड (प्लॉटस्) उपलब्ध करून देणे व पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी, शाळा, रस्ते, समाजमंदिरे यांसारख्या आवश्यक नागरी सुखसोयी उपलब्ध करून देणे, प्रकल्पविस्थापित लोकांना पर्यायी शेतजमिनी व राहण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देणे ही जबाबदारी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवलेली आहे. जे प्रकल्पविस्थापित लोक खाजगीरित्या पर्यायी शेतजमिनी खरेदी करून स्वतः पुनर्वसन करून घेतील त्यांना त्यांच्या जमिनीचा व घराचा मोबदला देण्यात येतो. त्यासंबंधी इतरही अनेक सवलती शासनाने जाहीर केलेल्या आहेत. आदिवासी प्रकल्पविस्थापितांना यापेक्षा वेगळ्या सवलती नाहीत. वर नमूद केलेल्या धोरणानुसार त्यांचेही पुनर्वसन करण्याचे धोरण आहे. मोठ्या पाटबंधारे, वीज व इतर प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आणि ज्यांना प्रकल्पाच्या पाण्याखाली गेलेल्या त्यांच्या जमिनीच्या बदल्यात पर्यायी जमिनी देण्यात आलेल्या आहेत अशा विस्थापित झालेल्या आदिवासी लोकांसंबंधींची काही जिल्ह्यांची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यावरून आदिवासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न व जमीन वाटपाचे धोरण याचा संबंध लक्षांत येईल.

आदिवासी लोकांच्या वुडीत जमिनीचे जेवढे क्षेत्र आहे त्याच्या निम्म्या क्षेत्राएवढी देखील जमीन आदिवासींना पुनर्वसनासाठी अद्याप मिळालेली नाही. मिळालेली जमीन हलक्या दर्जाची आहे. जिथे आदिवासींचे पुनर्वसन झालेले आहे तेथील स्थितीही विदारक आहे. गरीबांचे हाल करून श्रीमंत शेतकऱ्यांचे पोषण कसे होत आहे, हे त्यातून दिसते.

पुनर्वसनासाठी प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सरासरी १.८० एकर जमीन वाटण्यात आली आहे. विस्थापित झालेल्या कुटुंबापैकी आजपर्यंत फक्त एक तृतीयांश कुटुंबाचे पुनर्वसन झाले व त्यांना पूर्वीच्या त्यांच्या जमिनीच्या मानाने १/४ देखील जमीन मिळालेली नाही, मिळालेली जमीन चांगली असेलच याची शक्यता कमी. त्यामुळे अशा जमिनीवर शेती करून पोट भरणे केव्हाही कठीण. सारांश " ना शेतकरी ना भूमिहिन " अशी आदिवासींची स्थिति झाल्यामुळे व विस्थापित झालेल्या कुटुंबांची सोय न केल्यामुळे ती उद्ध्वस्त झालेली आहेत. यापुढे उद्ध्वस्तांची संख्या वाढेल व त्यातून आदिवासी भटके होण्याची समस्या निर्माण होईल असे चित्र दिसते.

परत घेतली गेली. त्यामुळे या कायद्याने आदिवासी व लहान शेतकऱ्यांवर अन्याय झाला. एका बाजूस कुळकायद्यातील व सिलिंगच्या जमीनी आदिवासींना देण्याचा कार्यक्रम तर दुसऱ्या बाजूस आदिवासी शेतकऱ्यांनी राब करणे; बैल चारणे व नागली, वरी या पिकासाठी ठेवलेल्या जमिनी काढून घेणे हे धोरण विसंगत असेच आहे. महाराष्ट्रात मोठमोठी खाजगी वने ताब्यात घेण्याच्या उद्देशाने हा कायदा केला आहे. परंतु लहान व गरीब शेतकऱ्यांना तो लागू केला जात आहे. म्हणून लहान शेतकरी व सिलिंग पर्यंतच्या शेतकऱ्यांच्या जमिनीस हा कायदा लागू करणे योग्य ठरणार नाही. जिथे खास वने राखून ठेवलेली असतात अशाच खाजगी वनास हा कायदा लागू करणे उचित ठरेल.

विस्थापित आदिवासींचे उध्वस्त जीवन आणि हरित क्रांती

सह्याद्री–सातपुडाच्या घाटमाथ्यावरील व घाटपायथ्याखालील प्रदेशाचे भौगोलिक स्थान लक्षात घेण्यासारखे आहे. हा प्रदेश मोठमोठ्या दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला आहे. पश्चिमेला सह्याद्रीपर्वत, उत्तर दक्षिण डोंगराच्या उंच रांगा आणि पूर्वेचा भाग मोकळा अशी या मोठमोठ्या दऱ्यांची भौगोलिक रचना आहे. पूर्वेकडील डोंगराची तोंडे साधली की मोठा 'कॅचमेन्ट एरिया' तयार होतो. अशा जागा धरणांसाठी फारच सोयीच्या आणि उपयुक्त असतात. जे भूभाग सह्याद्री, सातपुडात आहेत त्यामध्ये अनादीकालापासून आदिवासी जमातीचे लोक रहात आहेत. या भागात मोठे धरण प्रकल्प उभे करावयाचे म्हणजे येथील आदिवासींना विस्थापित करून पुन्हा त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. असे अनेक प्रकल्प सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, घाटपायथ्याला आणि पठारी प्रदेशात सुरू झालेले आहेत व पुढेही काही होणारे आहेत. त्यातून आदिवासींच्या पुनर्वसनाची समस्या निर्माण झाली आहे.

शासनाने स्वीकृत केलेल्या मोठ्या आणि मध्यम पाटबंधारे, वीज आणि इतर प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनासंबंधीचा तत्त्वानुसार प्रकल्पविस्थापितांच्या जमिनी प्रकल्पाच्या कामाकरिता ताब्यात घेण्यापूर्वी त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य हाती घ्यायला हवे. प्रकल्पविस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसनाशी निगडीत असलेल्या मुख्य दोन बाबी म्हणजे–

(१) प्रकल्पाच्या कामाकरिता ज्या प्रकल्पविस्थापित खातेदारांच्या जमिनी जातात त्यांना त्यांच्या पूर्वीच्या उद्योगाशी सुसंगत असा शेतीव्यवसाय उपलब्ध करून देण्यासाठी सममूल्य तत्त्वानुसार पर्यायी शेतजमिनी मिळवून देणे.

(२) ज्या प्रकल्पविस्थापित लोकांची घरे प्रकल्पाखाली जातात अशांना नवीन घरांच्या पुर्नबांधणीसाठी नवीन गावठाणांत निवासासाठी भूखंड (प्लॉटस्) उपलब्ध करून देणे व पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी, शाळा, रस्ते, समाजमंदिरे यांसारख्या आवश्यक नागरी सुखसोयी उपलब्ध करून देणे, प्रकल्पविस्थापित लोकांना पर्यायी शेतजमिनी व राहण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देणे ही जबाबदारी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवलेली आहे. जे प्रकल्पविस्थापित लोक खाजगीरित्या पर्यायी शेतजमिनी खरेदी करून स्वतः पुनर्वसन करून घेतील त्यांना त्यांच्या जमिनीचा व घराचा मोबदला देण्यात येतो. त्यासंबंधी इतरही अनेक सवलती शासनाने जाहीर केलेल्या आहेत. आदिवासी प्रकल्पविस्थापितांना यापेक्षा वेगळ्या सवलती नाहीत. वर नमूद केलेल्या धोरणानुसार त्यांचेही पुनर्वसन करण्याचे धोरण आहे. मोठ्या पाटबंधारे, वीज व इतर प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आणि ज्यांना प्रकल्पाच्या पाण्याखाली गेलेल्या त्यांच्या जमिनीच्या बदल्यात पर्यायी जमिनी देण्यात आलेल्या आहेत अशा विस्थापित झालेल्या आदिवासी लोकांसंबंधींची काही जिल्ह्यांची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यावरून आदिवासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न व जमीन वाटपाचे धोरण याचा संबंध लक्षांत येईल.


आदिवासी लोकांच्या वुडीत जमिनीचे जेवढे क्षेत्र आहे त्याच्या निम्म्या क्षेत्राएवढी देखील जमीन आदिवासींना पुनर्वसनासाठी अद्याप मिळालेली नाही. मिळालेली जमीन हलक्या दर्जाची आहे. जिथे आदिवासींचे पुनर्वसन झालेले आहे तेथील स्थितीही विदारक आहे. गरीबांचे हाल करून श्रीमंत शेतकऱ्यांचे पोषण कसे होत आहे, हे त्यातून दिसते.

पुनर्वसनासाठी प्रत्येक आदिवासी कुटुंबाला सरासरी १.८० एकर जमीन वाटण्यात आली आहे. विस्थापित झालेल्या कुटुंबापैकी आजपर्यंत फक्त एक तृतीयांश कुटुंबाचे पुनर्वसन झाले व त्यांना पूर्वीच्या त्यांच्या जमिनीच्या मानाने १/४ देखील जमीन मिळालेली नाही, मिळालेली जमीन चांगली असेलच याची शक्यता कमी. त्यामुळे अशा जमिनीवर शेती करून पोट भरणे केव्हाही कठीण. सारांश " ना शेतकरी ना भूमिहिन " अशी आदिवासींची स्थिति झाल्यामुळे व विस्थापित झालेल्या कुटुंबांची सोय न केल्यामुळे ती उद्ध्वस्त झालेली आहेत. यापुढे उद्ध्वस्तांची संख्या वाढेल व त्यातून आदिवासी भटके होण्याची समस्या निर्माण होईल असे चित्र दिसते.

भावी काळात महाराष्ट्रात जे प्रकल्प उभे राहणार आहेत ते बव्हंशी आदिवासी भागाशी निगडीत आहेत. कुकडी-प्रकल्पाखाली होणाऱ्या पाच धरणांपैकी तीन धरणे (डिंबे,माणिकडोह,चासकमान) जुन्नर व आंबेगाव तालुक्यांतील आदिवासी भागांत होत आहेत. आदिवासींची अंदाजे शंभर ते दीडशे गावे त्यात विस्थापित होणार आहेत. इगतपुरी तालुक्यातील संरक्षणप्रकल्पाखाली अशीच ३०-४० गावे बुडणार आहेत. त्याशिवाय मिग विमानाच्या प्रकल्पाखाली, दापचरी दूध-प्रकल्पाखाली, उकाई धरणाखाली व ठाणे जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाखाली,नासिक जिल्ह्यातील हरणबारी, वाघद, पूनद, प्रकल्पांखाली आदिवासींच्या हजारो एकर जमिनी जाणार आहेत. ज्यांच्या जमिनी जाणार आहेत व ज्यांच्या जमिनी अशा प्रकल्पाखाली गेलेल्या आहेत त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्यापही समाधानकारक पद्धतीने सुटलेला नाही. हा प्रश्न केवळ धरण ग्रस्तांचाच नव्हे तर मुळात दैन्यावस्थेत जगणाऱ्या गरीब आदिवासी जनतेचा प्रश्न आहे. व्यापक अर्थाने तो सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. त्यादृष्टीने या प्रश्नाची सोडवणूक करण्याची गरज आहे. बलदंड लोक दुर्बलांना सुखाने जगू देत नाहीत. आदिवासींच्या उद्ध्वस्त जीवनातून बलदंड लोक हिरवी क्रांती आणत आहेत. विकासाच्या नावाखाली कधीही भरून न निघणारी नवी विषमता त्यातून निर्माण होत आहे. "मोठा मासा लहान माश्याला खातो." या नियमाप्रमाणे बिगर आदिवासी लोक आदिवासींच्या जमिनी कालांतराने निरनिराळ्याकारणासाठी हस्तगत करून त्यांचे जीवन विस्कळित करतील.

"सामाजिक न्यायाला वंचित झालेला माणूस देखील दुसऱ्याला न्याय देण्यात प्रतिगामीच असतो." हे अनेक प्रकारे सिद्ध झालेले तत्त्व आहे. म्हणून प्रकल्पग्रस्त आदिवासींना मिळालेल्या जमिनीदेखील त्यांनाच विनधोकपणे कसता येतील, हे कोणी सांगावे ? सबलांनी दुर्बलांकडे पाहण्याचा आणि त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. म्हणून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा कायदा करण्याची गरज आहे. असे झाले नाही तर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यात अनेक अडचणी निर्माण होतील आणि आदिवासीसारखा दुर्बल समाज इतरांचे भक्ष्य बनेल. हिरवी क्रांती येईल पण ती दुर्बलांचे संसार उद्ध्वस्त करून ! समाज विकासात याचे भान ठेवले पाहिजे.





: ८ :

आदिवासी विकासाच्या योजना आणि काही मूलभूत प्रश्न

संविधानाच्या दोनशे पंचाहत्तराव्या अनुच्छेदातील तरतुदीनुसार आदिवासींचे जीवनमान अन्य समाजाच्या जीवनमानाइतके उंचावण्यासाठी कार्यक्रम करण्याकरिता आणि देशाच्या शेषभागाच्या राजव्यवस्थेच्या बरोबरीने अनुसूचित क्षेत्रातील राज्यकारभार सुधारण्यासाठी पंचवार्षिक योजनांमध्ये निधीची व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये जमातींच्या कल्याणाबावतचे सुविहित कार्यक्रम विकसित झाले नव्हते आणि फक्त पंचवीस कोटी रुपयांची रक्कम नियत केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मात्र जमातीच्या कल्याणविषयक सूत्रबद्ध कार्यक्रमाचा विकास झाला आणि पन्नास कोटी रुपयांची रक्कम नियत केली गेली. दोन पंचवार्षिक योजनांच्या काळातील मिळालेल्या अनुभवाच्या आधारावर सापेक्षतः सुविहित कार्यक्रम आखला गेला आणि साठ कोटी रुपये वाटून दिले. चौथ्या पंजवार्षिक योजनेमध्ये योजनेनंतर अंदाजपत्रकात दाखल केलेल्या तीस कोटी रुपयांशिवाय मागासलेल्या वर्गाच्या कल्याणासाठी एकशेपस्तीस कोटी रुपयांची रक्कम अधिक नेमून देण्यात आली. याशिवाय निरनिराळी राज्य सरकारे दरवर्षी सुमारे तीस कोटी रुपये त्यांच्या त्यांच्या योजनेनंतर अंदाजपत्रकातून मागास वर्गांच्या कल्याणासाठी खर्च करीत आली. पांचव्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी उपयोजनेसाठी तरतूद करण्यात आली. त्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध करण्यांत आला होता.

आदिवासी जमातीच्या कल्याणाचे कार्यक्रम मुख्यतः तीन प्रकारांत येतात. (१) केंद्रांने चालविलेले कार्यक्रम, (२) केंद्राने पुरस्कारिलेले कार्यक्रम आणि (३) राज्य सरकारचे कार्यक्रम. केंद्राने चालविलेले कार्यक्रम नियोजित करणे आणि पार पाडणे ही जबाबदारी सर्वस्वी भारत शासनाच्या गृह विभागाच्या मागासवर्ग महासंचालकाची असते. या प्रकारातील कार्यक्रमामध्ये ज्यांना सर्व देशभर सर्वांत उच्च अग्रक्रम आहे अशा किंवा ज्यांच्यासाठी दीर्घकालापर्यंत सधन उपाय योजण्याची आवश्यकता आहे अशा खास उणिवांचा समावेश होतो. राज्य सरकारच्या कार्यक्रमातील कल्याणविषयक कार्य हे राज्य सरकारच्या विकास योजनेमध्ये अंतर्भूत असते.

आदिवासीच्या विकासासाठी शैक्षणिक, आर्थिक, गृह व वनविषयक, शेतीसंवर्धन, आरोग्य व सहकारविषयक अनेकविध योजना राबविल्या जातात. व त्यांत आदिवासींना खास काही सवलतीही देण्यात येतात.

महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी निरनिराळ्या योजना व सवलती चालू आहेत.

आदिवासींचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा घालविण्यासाठी व त्याचे होणारे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी अशा योजनांना सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु ह्या योजना प्रत्यक्षात आणण्यात ज्या अडचणी आहेत त्यावर कार्यक्षम उपाययोजना करणे ही खरी गरज आहे. दप्तर दिरंगाई, तांत्रिक अडचणींचा बागलबुवा, आदिवासीबद्दल आत्मियतेचा अभाव इत्यादी दोषांमुळे योजना पुरोगामी असून देखील त्यात पाहिजे तसे यश संपादन करता आले नाही. विकास योजनांचा दुसराही एक परिणाम लक्षात घेण्यासारखा आहे आणि तो म्हणजे रस्ते बांधणी, घरबांधणी सहाय्य, कर्जात आडकलेल्यांना मदत, वकीलाचे सहाय्य, बांधीव विहिरींची सोय, रानगावी दवाखान्यांची स्थापना, सहकारी संस्थांची स्थापना, मोफत शिक्षणाची सोय अशा विविध आधुनिक सुधारणांमुळे आदिवासीच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग सुकर झाला आहे. तथापि आदिवासींमधील पुढारलेले लोकच अशा योजनांचा अधिक फायदा घेतात व खऱ्या मागासलेल्यांच्या पदरांत काही पडत नाही हा सर्वत्र अनुभव आहे. यातून गरिबांच्या उन्नतीसाठी मार्ग काढणे जरूरीचे आहे. आदिवासींमधील शेवटच्या माणसाला योजनेचा फायदा मिळाला पाहिजे असा विचार व त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम पुढे येणे जरूरीचे आहे.

आदिवासीकरिता जमीन हस्तांतराचे कायदे झालेले आहेत. केला. त्यानुसार सन १९७४ पासून ज्या प्रकरणांचेअंतिम निर्णय झालेले आहेत त्या त्या प्रकरणामध्ये गैर आदिवासींकडून आदिवासींना जमिनीचा तावा देण्यात दिरंगाई होत आहे व त्यामुळे आदिवासी समाजास कायदेशीर संरक्षण मिळूनही अधिकार व हक्क प्राप्त होत नाहीत.यामुळे निराशजनक वातावरण निर्माण झालेले आहे. शिवाय बरीचशी प्रकरणे प्रांत ऑफिसर, रेव्हेन्यू ट्रेब्युनल यांचेकडे निकालार्थी पडलेली आहेत. वारंवार तारखेला जाणे येणे करण्यात खर्चाच्या दृष्टीने आदिवासी हतबल झालेला असतो. दिरंगाई टाळण्याच्या दृष्टीने टाईम बॉण्ड प्रोग्रॅम अंमलात आणावा लागेल. त्याशिवाय या कायद्यांचा आदिवासींना अधिक फायदा होणार नाही.

या कायद्यांमुळे आजपर्यंत आदिवासींना मिळालेल्या व त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनी लक्षात घेता कायद्यांची अंमलबजावणी संथ आहे यात मतभेद होणार

नाहीत. आदिवासी योजनेअंतर्गत कार्यक्रमात आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळवून देणे या बाबीला अधिक प्राधान्य दिले पाहिजे.

आदिवासींच्या हितार्थ भारत सरकारने देऊ केलेल्या रकमांचा विनियोग बरेचदा होऊ शकत नाही. मध्यवर्ती शासनाने देऊ केलेल्या रकमा खर्च करण्यासाठी अनेक वेळा योजना तयार नसतात. सह्याद्री आणि सातपुडचावरील अनेक पठारे आदिवासींनी व्यापलेली आहेत. तथापि पठारांच्या विकासाचा कोणी विचार केलेला नाही. डोंगर-दऱ्यांत शेतीची सुधारणा करताना, उद्योग-धंदे काढताना स्थानिक परिस्थितीबरोबर स्थानिक लोकांच्या आवडीनिवडी, गुणदोष, कल, हचाचाही विचार व्हावा. आदिवासींची घरे पक्की करण्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. त्यायोगे जंगलाची तोड कमी होईल. प्रतिवर्षी घर शेकारण्याचा खर्च वाचेल. वस्तीला स्थैर्य प्राप्त होईल. योजनेत अशा कार्यक्रमांना प्राधान्य असावयास पाहिजे.

❋ ❋ ❋

: ९ :

घटनात्मक तरतूदी, सवलती आणि काही प्रश्न

आदिवासींच्या हितार्थ इंग्रज सरकारने भारतातील काही भाग सन १९१९ साली 'राखीव विभाग व सन १९३५ साली काही विभाग 'अंशतः राखीव विभाग' जाहीर करून त्या विभागाच्या कारभाराची जबाबदारी गव्हर्नर-वर सोपविली होती. स्वातंत्र्योत्तर काळी ही व्यवस्था अशीच चालू राहिली. भारतातील एकूण आठ राज्यांत असे राखीव व अंशतः राखीव विभाग आहेत. त्यांपैकी महाराष्ट्र राज्य हे एक आहे. अनुसूचित विभागांच्या यादीत फेरफार करण्याचे, नवीन विभाग त्यात समाविष्ट करण्याचे व असलेले काढून टाकण्याचे अधिकार घटनेने राष्ट्राध्यक्षांना दिलेले आहेत. १९५० च्या भारत सरकारच्या हुकुमान्वये ठाणे जिल्ह्यातील जव्हार, डहाणू, तलासरी, मोरवाडा व शहापूर हे पाच तालुके, नाशिकमधील कळवण, पेठ व सुरगाणा हे तीन तालुके, धुळे जिल्ह्यातील अक्कलकुवा, अक्राणी व नवापूर हे तीन तालुके व अमरावती जिल्ह्यातील मेलघाट तालुका असे वारा तालुके व जळगाव जिल्ह्यामधील चोपडा, रावेर, यावल, चंद्रपूर जिल्ह्यातील गडचिरोली, राजुरा, सिरोंचा व नांदेड जिल्ह्यातील किनवट अशा सात तालुक्यातील विशिष्ट विभाग अनुसूचित

विभाग म्हणून जाहीर करण्यात आलेले आहेत. ह्या विशिष्ट भागात आदिवासींची वस्ती एकवटलेली आहे.

महाराष्ट्रात सध्या या खास विभागांचा कारभार अन्य विभागांप्रमाणेच चालतो. भारताच्या व राज्य सरकारच्या कायदे मंडळांनी केलेले कायदे या विभागाला लागू न करण्याचा खास अधिकार घटनेने राज्यपालांना दिला आहे. मात्र अशा बदलास राष्ट्राध्यक्षांची मान्यता आवश्यक आहे. या खास अधिकार क्षेत्रात अनुसूचित विभागातील बिगर अनुसूचित प्रजाजनही येतात. महाराष्ट्र सरकारच्या मागास जाती-जमातींना सवलती देण्यासंबंधीच्या प्रागतिक धोरणामुळे राज्यपाल व राष्ट्राध्यक्ष यांना आपले खास अधिकार वापरण्याचा प्रसंग आजवर आलेला नाही. आदिवासींच्या हस्तांतरीत जमिनीचे कायदे व एकाधिकार धान्य खरेदी संबंधीची महाराष्ट्र शासनाची योजना त्यादृष्टीने क्रांतीकारक व अधिकारांचा विशेष वापर करणारी आहे असे वाटते.

अनुसूचित जमाती व अनुसूचित विभाग ह्यांच्यासाठी राज्यात सल्लागार समिती असते. महाराष्ट्र राज्यात अशी सल्लागार समिती १९५२ पासून अस्तित्वात आलेली आहे. अनुसूचित विभाग असलेल्या राज्यात घटनेप्रमाणे ती असावयास हवी. अन्य राज्यात राष्ट्राध्यक्ष अशी समिती नेमण्याचा हुकूम देऊ शकतात. अशा समितीत कमीत कमी वीस सभासद असतात व त्यांपैकी तीन चतुर्थांस सदस्य त्या राज्याच्या कायदेमंडळातील अनुसूचित जमातीचे असतात. कायदे मंडळात अनुसूचित जमातीचे तेवढे सदस्य नसल्यास अनुसूचित जमातीच्या बाहेरचे लोक राज्यपाल नेमू शकतात. राज्यपाल राज्यातील अनुसूचित जमातीचे हितविषयक जे प्रश्न समितीकडे धाडतील त्यावर सल्ला देणे हे या समितीचे महत्त्वाचे काम आहे. कार्यपद्धती राज्यपाल ठरवितात. ही समिती घटनात्मक स्वरूपाची असल्याकारणाने समितीचे ठराव राज्यशासनाने कार्यवाहीत करावयाचे असतात. महाराष्ट्र राज्यातील या समितीचे गेल्या दहा पंधरा वर्षांतील कामकाज समाधानकारक आहे. समितीने मान्य केलेल्या काही ठरावांची राज्यशासनाकडून अंमलबजावणी झालेली आहे. या समितीचा घटनात्मक दर्जा लक्षात घेता ही समिती आदिवासींच्या विकासकार्याचे धोरण ठरवू शकते व राज्यशासनाला आदिवासी विकासात अधिक गतिमान करू शकते.

अनूसूचित विभागाचा वार्षिक अहवाल

घटनेच्या कलम २४४ (आय) पाचवे परिशिष्टानुसार अनुसूचित विभागाच्या कारभाराविषयी राज्यपालांना राष्ट्राध्याक्षांकडे दरवर्षी अहवाल सादर करावयाचा असतो. गेल्या काही वर्षांचे महाराष्ट्र राज्याती.ल या विभागाविषयीचे अहवाल व

त्यात समाविष्ट केलेली माहिती, आदिवासी विकासाचा त्यात घेतलेला आढावा पाहिल्यानंतर संविधानातील तरतुदींवर चांगलाच प्रकाश पडतो. त्यात बदल करण्याची व आदिवासी विकासाचे सुस्पष्ट चित्र मांडण्याची अधिक जरूरी आहे आदिवासी-कल्याण-विभागाव्यतिरिक्त इतर काही विभाग आदिवासी विकासातील जबाबदारी टाळतात व ही बांधिलकी आमची नाही असे प्रतिपादन करतात. विकसित होणाऱ्या राष्ट्राचे हे दुर्दैव म्हणावे लागेल. सर्व विभागांनी आदिवासी विकासाच्या संदर्भात सामुदायिक जबाबदारी मान्य करणे जरूरीचे आहे. १९६२ मध्ये नेमलेल्या ढेबरभाई कमिशनने (श्री. ढेबरभाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या) हा अहवाल अधिक उपयुक्त होण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या सूचना केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांपैकी अनेक सूचना कार्यान्वित केलेल्या आहेत.

वर सूचित केल्याप्रमाणे भारतीय संविधान कलम नंबर २४४ (आय) पाचव्या परिशिष्टान्वये राज्यातील अनुसूचित क्षेत्राचे प्रशासन करण्याची व त्या क्षेत्रामध्ये विकास घडवून आणण्याची जबाबदारी राज्यपालांची असते. प्रत्येक राज्यातील अनुसूचित क्षेत्र पुन्हा वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे हे विचारांती निश्चित ठरवावे लागेल. महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्राचा विस्तार करून आदिवासींचे संख्याधिक्य असणाऱ्या क्षेत्रास अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केले तर अविकसित भागाला त्याचा अधिक लाभ होईल असे वाटते.

घटनेने सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत. त्यायोगे मागासलेल्यातील न्यूनगंड नाहीसा होण्यास सहाय्य होते. समान हक्काची तरतूद मागासलेल्या वर्गांना सवलती देण्याआड येऊ नये अशीही व्यवस्था घटनेने केली आहे. अनुसूचित जमातींच्या व विभागाच्या कल्याणार्थ राज्यसरकारांना भारत सरकारतर्फे आर्थिक सहाय्य मिळण्याविषयी घटनेत तरतूद केली आहे. शैक्षणिक व सरकारी नोकरी बाबतही अनुसूचित जमातींच्या हिताकडे लक्ष देण्याची तरतूद घटनेने केली आहे. सरकारी आदेशानुसार अनुसूचित जमातीकरिता ७ टक्के जागा राखून ठेवल्या आहेत. याचा अर्थ राखून ठेवलेल्या जागांपेक्षा अधिक जागा आदिवासी अगर दलितांना दिल्या जावू नयेत असे नाही. वर्गक्रमांक १ व २ मधील आदिवासींच्या भरतीचे प्रमाण एक टक्का देखील नाही. वर्गक्रमांक ३ व ४ मधे देखील आदिवासींची भरती ७ टक्क्यांपर्यंत झालेली नाही. यावरून शासकीय नोकरीत आदिवासींसाठी खास जागा असल्यातरी त्यांची भरती करण्यात आलेली नाही. त्यामुळे आदिवासींसाठी ठेवलेल्या खातेनिहाय बऱ्याच राखीव जागा रिकाम्या आहेत.

घटनेने अनुसूचित जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कायदे-मंडळासाठी राखीव जागा ठरविल्या आहेत. हया राखीव जागा ठेवण्याच्या तरतुदीला घटना अंमलात आल्यापासून तीस वर्षांची मर्यादा घातली होती. लोकसभा ही मुदत वाढवू शकते. त्याप्रमाणे ही मर्यादा १९९० पर्यन्त वाढविण्यात आलेली आहे. घटनेतील या तरतुदीप्रमाणे महाराष्ट्रात लोक-सभेच्या चार व राज्यविधानसभेच्या बावीस जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत, महाराष्ट्रातील जिल्हापरिषदेच्या एकूण सुमारे तेराशे जागांपैकी एकदशांश म्हणजे सुमारे १३० जागा आदिवासींसाठी राखीव आहेत.

बोंगिरवार समितीने मान्य केलेल्या शिफारसीप्रमाणे महाराष्ट्र शासनाने जिल्हापरिषद आणि पंचायत समिती अधिनियमामध्ये दुरुस्ती करून ज्या पंचायत समितीमध्ये आदिवासी लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे त्या पंचायत समितीचा सभापती आदिवासी राहील अशी तरतूद केलेली आहे. परंतु पंचायत समिती अंतर्गत आदिवासी, हरिजन राखीव जिल्हापरिषद निर्वाचन क्षेत्रातील पंचायत समितीचे निर्वाचन आता प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाचे आहे. बोंगिरवार समितीच्या मान्य केलेल्या शिफारशीप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा घोषित करण्याचे धोरण पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रासाठी मान्य झालेले नाही ही विसंगती आहे.

लोकसभा व राज्य विधानसभा यांमध्ये अनुसूचित जाती/जमातींना राखीव प्रतिनिधित्व देताना राज्यातील त्या त्या जाती / जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची घटनात्मक तरतूद करण्यात आलेली आहे. त्याच-प्रमाणे राज्यसभा व विधानपरिषदेमध्येसुद्धा तरतूद असावी. याबाबतीत आदिवासींचे हक्क डावलेले गेले आहेत. म्हणून घटनात्मक तरतूद होईतोपर्यंत उपेक्षितांना राज्यस्तरावर संरक्षण देण्याच्या उद्देशाने हया सवलती लागू करणे हिताचे होईल.

भारतीय संविधान कलम १६४ (आय) अन्वये फक्त बिहार, मध्यप्रदेश आणि ओरिसा प्रांतात आदिवासींच्या विकासाकरिता स्वतंत्र मंत्री असलाच पाहिजे अशी घटनात्मक व बंधनकारक तरतूद केलेली आहे. ही तरतूद उपरोक्त फक्त तीन प्रांतांकरिता मर्यादित न ठेवता आदिवासी जमातीची २० लक्षापेक्षा जास्त लोक-संख्या असणाऱ्या प्रांतात आदिवासींच्या विकासाकरिता स्वतंत्र विकास विभाग व त्या विभागाकरिता कॅबिनेट दर्जाचा स्वतंत्र मंत्री असावा, अशी होणे जरूरीचे आहे. महाराष्ट्र राज्यात त्यामुळे आदिवासी विकासाला आधिक गती देता येईल.

आदिवासी जमातींच्या हितार्थ घटनेत केलेल्या आणखी दोन तरतूदी म्हणजे अनुसूचित जातीजमातीसाठी खास अधिकाऱ्याच्या नेमणूकीची व्यवस्था आणि दुसरी म्हणजे अनुसूचित जमातींच्या कल्याणार्थ केलेल्या योजनेची व अनुसूचित विभागाचा कारभार यांची पाहणी करण्यासाठी खास कमिशनच्या नेमणुकीची व्यवस्था. हचा नेमणुका राष्ट्राध्यक्षांनी करावयाच्या असतात. घटनेप्रमाणे अनुसूचित जमातींना व अन्य मागासवर्गीयांना दिलेल्या सवलतींचा लाभ त्यांना मिळतो किंवा नाही हे पाहून अहवाल राष्ट्राध्याक्षांना सादर करण्याची कामगिरी या खास अधिकाऱ्यावर सोपविलेली आहे. हा अहवाल लोकसभेपुढे ठेवतात. कमिशनही आपला अहवाल राष्ट्राध्याक्षाना सादर करते. जनजाती-जमाती आयुक्तांचे व स्वतंत्र कमिशनचे अहवालातील सूचनांची कार्यवाही करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

महाराष्ट्रात शासकीय, निमशासकीय विभागांसाठी निरनिराळ्या समित्या महामंडळे आहेत. गेल्या ३० वर्षांत आदिवासी समाज सेवकांना अशा विविध समित्यावर व महामंडळावर प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न शासनाकडून होत आहे.

❊ ❊ ❊

: १० :

आदिवासी सेवा कार्याची दिशा

सेवेची प्रेरणा घेऊन ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यासाठी अनेक मिशनरी आपआपले देश सोडून जंगल दऱ्याखोऱ्यात येऊन राहिले. धर्मांतराच्या संकुचित हेतूसाठी का होईना, पण भिन्न वर्णियांची, धार्मियांची सेवा त्यांनीआरंभली.आदिवासी विभागात जे सेवाकार्य त्यांनी आरंभिले त्यात शिक्षण प्रसार आणि रुग्णसेवा या दोन गोष्टीवर प्रामुख्याने भर होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या आरंभिला त्यांचे सेवाकार्य आदिवासी विभागात सुरू झाले. प्रथम दवाखाने व त्यानंतर शैक्षणिक सुधारणेसाठी वसतिगृह, शाळा व आश्रम काढण्यास सुरुवात झाली. आदिवासींच्या सेवेची प्रेरणा ख्रिस्ती मिशनरी लोकांनीच प्रथम भारतीयांच्या मनात निर्माण केली. हिंदी समाज सेवकांचे लक्ष आपल्या वन्य बांधवाकडे त्यापूर्वी कधीच गेलेले नव्हते. इतक्या लांबवरच्या देशातून येऊन आणि

अनंत अडचणीवर मात करून, डोंगर-दऱ्यात जाऊन त्यांनी सेवाकार्य सुरू केले. खरोखर मानवतेच्या दृष्टीकोणातून पाहिले तर त्याला तोड नाही. मिशनऱ्यांच्या कार्यानंतर कर्तव्याची जाणीव व मिशनऱ्यांचे अनुकरण सुरू झाले. ना. गोखले यांच्या 'भारतसेवक समाज' या संस्थेच्या प्रेरणेने ठक्कर बाप्पासारखे देशसेवक आदिवासी भागात जाऊन त्यांनी आदिवासींसाठी सेवाकार्य सुरू केले. महाराष्ट्रात त्यानंतर काकासाहेब वर्वे, बाबासाहेब दांडेकर, आचार्य भिसे, डॉ. मोरे, भाऊसाहेब हिरे, शंकरराव ठकार ह्या पुढारलेल्या वर्गातील मंडळींनी व श्री. जयवंतराव नटावदकर, श्री. ऊइके, भाई महादेव गोपाळ कडू, भाऊसाहेब राऊत, ए. टी. पवार, दादासाहेब सौदाणे, अंबरसिंग सुरतवंती, बाबुराव मडावी ह्या आदिवासी व मागासवर्गीय लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी आदिवासी सेवा मंडळांची स्थापना करून आदिवासी विभागात कार्य सुरू केले. बिगर-आदिवासी मंडळीच्या कार्यात उपकारांची, सेवेची, संतपणाची भावना अधिक होती. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात आदिवासींवर होत असलेल्या अत्याचाराच्या प्रतिकाराची चाहूल त्यात दिसून येत नव्हती. किंबहुना अन्यायाची चीड या समाजसेवकांना नव्हती. थोडक्यात त्यांच्या प्रयत्नांत बुद्धिवादाचा अभाव होता कारण त्यांना मिळालेल्या प्रेरणेचे उगमस्थान गांधीजींच्या भूतदयावादी तत्त्वज्ञानांत होते. स्वत: गांधीजींनी मुळी आदिवासींचा प्रश्न भूतदयावादी भूमिकेवरून हाताळला असल्यामुळे त्यांच्या अनुयायांनीही त्यांचाच कित्ता गिरवावा व त्यात बौद्धिक बैठकीचा अभाव आढळावा हे स्वाभाविक होते. साहजिकच ह्या सेवकांना आदिवासींच्या दु:खाचे जिवंत चित्र जनतेसमोर उभे करता आले नाही. त्यामुळे आदिवासींचे नेतृत्व त्यांच्याकडे न जाता ते फक्तत्याच्या सहानुभुतीला पात्र ठरले. सरकारी मदत व सर्वोदयाद्वारे चालविल्या जाणाऱ्या योजना हा त्यांच्या प्रारंभीच्या समाज सेवेचा दुवा होता. स्वतंत्र प्रेरणेने आदिवासींची अस्मिता जागी करून, त्यांच्यात सामाजिक – आर्थिक दु:खाची जाणीव निर्माण करून त्याविरुद्ध लढण्याची जिद्द व त्याद्वारे समाजांत मूलगामी परिवर्तन करण्याचे कार्य ह्या समाजसेवकांनी केले नाही. त्यांनी जे कार्य केले त्याला गती नव्हती. ते आदिवासींत चैतन्य निर्माण करू शकले नव्हते. त्यांचे हे कार्य अर्थात आज वाटते तेवढे सोपे नव्हते हेही दृष्टीआड करता येणार नाही.

सुरूवातीस म्हणल्याप्रमाणे आदिवासींच्या सामाजिक प्रश्नाचे स्वरूप दुहेरी आहे. आदिवासीकडे पाहण्याची पांढरपेशाची दृष्टी बदलली पाहिजे हे एक आणि आदिवासींमधील जाणत्या व सज्जन मंडळीकडे सामाजिक सुधारणेचे नेतृत्व दिले पाहिजे ही दुसरी गोष्ट. त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्या जुन्या

चालीरिती. आरोग्याच्या व स्वच्छतेच्या कल्पना, अघोरी कर्मे, देवभोळेपणा, लग्न, सणासमारंभात होणारा अवास्तव खर्च बंद करून त्यांच्यात नव्या प्रथा निर्माण करण्यासाठी त्यांच्यातून समाज सुधारणेचे सकस व निर्मळ नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. आदिवासींतून आज जे नेतृत्व निर्माण होत आहे त्यात सामाजिक सुधारणेच्या प्रेरणेपेक्षा राजकीय प्रेरणाच अधिक आहेत. सुशिक्षितांनी सामाजिक सुधारणेचे नेतृत्व करण्याऐवजी ते समाजापासून दूर जात आहेत.शिकलेली जी थोडीफार माणसे आदिवासी विभागात वावरतात त्यांच्यावर निरनिराळ्या राजकीय पक्षांचा पगडा आहे. आदिवासींच्या सर्वांगीण हितापेक्षा राजकीय नेतृत्व सत्ता आणि त्याद्वारे मिळणारे स्वउन्नतीचे फायदे याकडे त्यांचे लक्ष अधिक आहे. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व अशाचा इतर प्रतिनिधिक मंडळावर आदिवासी प्रतिनिधी पाठविले जातात. त्यामुळे होतकरू सुशिक्षित तरुणांमध्ये राजकीय प्रेरणा व सत्तास्पर्धा वाढीस लागली आहे. एका गोष्टीचा मात्र त्यामुळे फायदा झाला आहे आणि ती म्हणजे त्यांचा स्वाभिमान वाढला आहे. देशाच्या राजकारणात व विकासात आपण कार्य करू शकतो, भाग घेऊ शकतो अशी उमेद त्यांच्यात निर्माण झाली आहे व त्याद्वारे त्यांना समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे. २१ वर्षांवरील स्त्री–पुरुषांना प्रौढ मतदानाचा हक्क प्राप्त झाल्यामुळे निवडणुकीत मत मागण्यासाठी मोठे पुढारी, मंत्री, संस्थानिक आदिवासीच्या झोपडीपर्यंत जातात, फाटक्या घोंगडीवर बसतात व गरीब, अज्ञानी, अशिक्षित माणसाकडे मताची याचना करतात. त्यायोगे आदिवासींची अस्मिता वाढली आहे व त्याचा उपयोग सामाजिक, आर्थिक भेद मोडण्यासाठी होत आहे.

शासनाच्या विविध पातळीवर आज आदिवासीचे प्रतिनिधी आहेत. ते आदिवासींच्या दुःखाबद्दल व अडचणीबद्दल आवाज उठविण्यास फारच कमी पडतात किंवहुना ते आवाज उठवीत नाहीत. आदिवासींना काही सवलती मिळतात तीही मेहेरबानी समजली जाते. त्यामुळे देणारात अहंता व घेणारात लाचारी दिसून येते.

आदिवासी समाजात नव्या नेतृत्वाचा व कार्यकर्त्यांचा उदय होत आहे. पण ते कार्यकर्ते शासनाच्या आश्रयाने पुढे येत आहेत. त्यामुळे त्याच्या नेतृत्वात आदिवासींच्या दुःखाची चीड नाही. ते पुरेसे तेजस्वी नाहीत. वसतीगृहे, शाळा, आश्रमशाळा, जंगल सोसायटया व इतर अनुदानालंबी कार्यावर अनेक आदिवासी नेते, कार्यकर्ते आपली उपजीवीकाही चालवितात. त्यामुळे त्यांची सारी शक्ती सत्ताधाऱ्यांना खूष ठेवण्यात जाते. आदिवासीचे आणखी दुर्दैव

म्हणजे ते संघटित होऊ शकत नाहीत. पहिली गोष्ट म्हणजे, ते विखुरलेले आहेत. दुसरी गोष्ट ते अनेक बोली भाषा बोलतात. त्यांच्या अनेक जमाती आहेत. त्यामुळे ते विभागलेले आहेत. आपापसातील त्याचे संबंधही कमी आहेत. त्यातून काही लोक प्रयत्न करतात पण त्यांचे प्रयत्न अपुरे आणि तोकडे पडतात. जमाती-गणिक त्यांच्या प्रश्नाचे स्वरूपही बदलते. त्यामुळे एकत्र येऊन हक्कासाठी प्रभावीपणे ते लढा देऊ शकत नाहीत. त्यांची उपेक्षा करून भागात असताना त्यांचा कैदार कोण घेणार? मग पुढे काय, असा प्रश्न येतोच. सर्वसामान्य आदिवासींना आकर्षित करील असे प्रगल्भ, लढाऊ आणि विधायक नेतृत्व त्यांच्या-तून निर्माण झाल्याशिवाय प्रबोधनाच्या कार्यांची गती वाढणार नाही. अन्यायाची आदिवासींना चीड येईल व अन्यायाच्या प्रतिकारार्थ जेव्हा ते उभे टाकतील तेव्हाच आदिवासी परिवर्तनाला मार्ग सापडेल. आर्थिक आणि सामाजिकविषमतेची लढाई निव्वळ सभा, बैठका, समोपचार अथवा समन्वय यातून जिंकता येणार नाही. विषमतेची लढाई संघर्ष, लढे आणि चळवळीतून सुरू होते. तो लढा जिंकण्यासाठी देखील कसदार बौद्धिक विचाराचे व तत्त्वाचे पाठबळ व अधिष्ठान असावे लागते. आदिवासी विकासाच्या मुळाशी हिच गोष्ट नेमकी नसल्यामुळे आज ते इतरांच्या तुलनेने अनेक वर्षे मागे आहेत.



: ११ :

आदिवासींच्या ऐतिहासिक लढ्यांची दिशा

१८७४ मध्ये अनुसूचित जिल्ह्याबाबतचा कायदा अंमलांत आल्यापासून १९७४ सालापर्यंत एका शतकाच्या दीर्घ कालावधीत आदिवासींच्या जागृतीच्या दृष्टीने पुष्कळ पावले पडली आहेत. या घटनेमागे आदिवासींनी उपभोगलेल्या उपासमारीचा, शोषणाचा, छोट्यामोठ्या लढ्यांचा आणि ढाळलेल्या अश्रूंचा इतिहास उभा आहे.

भारतातील वेगवेगळ्या जमातींनी १७७२ ते १८९९ या कालखंडात इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध बरेच लढे केले. ईस्ट इंडिया कंपनीने बंगालमध्ये आपले बस्तान बसविण्यास सुरूवात केल्यावर १७८२ मध्ये राजमहल टेकड्यांवरील आदिवासींनी बंड केले. त्यामुळे तो संबंध प्रदेश कायद्याच्या कक्षेतून वगळला. त्यासाठी स्वतंत्र कायदा करून त्याप्रमाणे या भागाचा कारभार चालवावा असे ठरले. नंतर १०० वर्षांच्या काळात कंपनी सरकारने हिंदुस्थानातील एक एक प्रांत

हस्तगत केला. त्या प्रांतातील आदिवासींनी त्यावेळी भिन्न भिन्न कारणासाठी बंडाळी केली. १८१९ मध्ये ओरिसातील कोल्हान विभागातील आदिवासींनी बंड केले. या जमातीच्या बंडखोरीशी 'छोटा नागपूर' भागातील जमातींनी देखील त्याचवेळी साथ दिली. त्यामुळे या विभागासाठी सरकारला स्वतंत्र कायदा करावा लागला. या प्रदेशाप्रमाणेच १८६६ मध्ये संथाळ परगण्यांत देखील आदिवासींनी मोठे बंड उभारले.

आदिवासींचा असा असंतोष जुन्या मुंबई राज्यातही अनेक आदिवासी जमातीमध्ये पसरला होता. महाराष्ट्रापुरताच विचार करावयाचा तर गोंड, भिल्ल, महादेव कोळी या जमाती मुळातच लढवय्या व राज्यकर्त्या. आता आतापर्यंत त्यांची राज्ये, संस्थाने होती. गोंड राणी दुर्गावती इतिहासात प्रसिद्ध आहे. कवार, ढाणक, हलबा ह्या जमाती व्यवसायाने सैनिक. कोल या जमात नामाचा अर्थच मुळात योद्धा असा आहे. अशा वृत्तीच्या लोकांनी आपली राज्य गेल्यावर लुटारू, दरोडेखोर, बंडखोर बनावे यात नवल नाही. १८१८ मध्ये सातपुड्याच्या परिघात भिल्ल बंडखोराच्या ५० टोळ्या होत्या. दरेक टोळीचे खातेनिहाय अधिकारीही असत अशी माहिती जुन्या ग्रंथातून मिळते. ब्रिटीश अव्वल अमदानीत 'तंट्या भिल्ल, भागुजी नाईक, राघोजी भांगरा' ह्यांची बंडे गाजली. १८३० च्या सुमाराला भिल्लांच्या व महादेव कोळ्यांच्या टोळ्यांनी ठाणे, नगर, नाशिक, धुळे व पुणे जिल्ह्यांत बरीच बंडाळी माजविली. इ.स. १८५० ते १८६० च्या दरम्यान इंग्रजांच्या लष्करात 'भिल्ल पलटण व महादेव कोळी पलटण' अशा नावाच्या दोन लढाऊ पलटणी निर्माण केल्या होत्या. ह्या पलटणींशी लढा देण्यासाठी बंडखोर आदिवासींनी त्यांच्याही स्वतंत्र पलटणी उभ्या केल्या होत्या. १८५७ च्या युद्धात महादेव कोळी, भिल्ल, नायकडा ह्या जमाती सामीलही झाल्या होत्या. मेवासी इस्टेट, खानदेश, पंचमहाल, पुणे, व अहमदनगर जिल्ह्यात त्यावेळी भिल्ल व महादेव कोळी जमातींमध्ये इंग्रजाच्या विरुद्ध फार मोठा असंतोष निर्माण झाला होता. पुढे असे असंतोषाचे प्रकार आदिवासी विभागात वाढल्यामुळे सन १८७४ मध्ये 'अनुसूचित जिल्ह्याचा कायदा' सरकारला करावा लागला. त्या नंतरच्या काळातही मधून मधून आदिवासींचा असंतोष प्रगट होत राहिला. पण त्याचे स्वरुप तितके गंभीर नसल्या कारणाने सरकारने त्याची दखल घेतली नाही.

हिंदुस्थानातील आदिवासी जमातींना सनदशीर संरक्षण देण्याचे प्रयत्न चालू असता दुसरीकडे राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य प्राप्तीच्या चळवळीलाही जोर चढला होता. स्वातंत्र्यासाठी चाललेल्या सत्याग्रहांचे लोण खेड्यापाड्यापर्यंत गेले होते. काही प्रमाणात आदिवासी विभागातही त्याचे लोण

पोहोचले होते. 'सायमन कमिशन' च्या निषेधार्थ जी लाट उठली तिचे पर्यवसान सत्याग्रहाच्या लढ्यात होऊ लागले. १९३० साली राष्ट्रीय काँग्रेसने कायदेभंग करण्याच्या उद्देशाने अहिंसा चळवळीचा आदेश दिला. त्यावेळी आदिवासींनी ठिकठिकाणी या चळवळीत भाग घेऊन सर्वत्र जंगल सत्याग्रह घडवून आणले. नाशिक जिल्ह्यातील बागलाण, कळवण, सुरगाणा तालुक्यात जंगल सत्याग्रहाने भयानक रूप धारण केले होते. पुणे, नगर, ठाणे याही जिल्ह्यांच्या आदिवासी भागात जंगल सत्याग्रहांत हजारो आदिवासींनी भाग घेऊन तुरुंगवास पत्करला. 'वनचराई देऊ नये, सरकारी नोकरांना पगार देऊ नये. जंगल जमिनी लागवडी साठी द्याव्यात.' वगैरे मागण्या आदिवासी लोकांनी केल्या. आदिवासी भागातील चणकापूरचा व आंबेगावचा सत्याग्रह त्यावेळी प्रसिद्धीला आला. त्या नंतरच्या काळात सरकारने आदिवासी विभागासाठी नवे नवे कायदे केले व कायद्याच्या कक्षेतून 'संपूर्णतः वगळलेला प्रदेश' जाहीर करण्यात साले. आदिवासींच्या हिताकडे लक्ष देण्यासाठी १९३५ च्या कायद्याच्या ५२ (इ) व ९२ या कलमान्वये सरकारने ही जबाबदारी स्वीकारली.

वर उल्लेख केलेल्या दोन्हीही चळवळी ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध होत्या. पहिली चळवळ ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध देशव्यापी स्वातंत्र्य संग्रामाचा एक भाग होता व तिचे स्वरुप सशस्त्र बंडाचे होते. दुसरी चळवळ महात्माजींच्या अहिंसात्मक चळवळीचा एक भाग होता. त्यानंतर आदिवासीत मोठी चळवळ झाली. ती म्हणजे १९४५–४६ चे वारल्याचे बंड. ठाणे जिल्ह्यातील वारली, कातकरी जुमाती सावकार, जंगल ठेकेदार, जमीन मालक, व्यापारी यांच्या आर्थिक व सामाजिक शोषणामुळे अत्यंत हलाखीत दिवस काढीत होत्या. या परिस्थितींमुळे त्या विभागात फार मोठा असंतोष धुमसत होता. या असंतोषाला संघटित करून व्यापक प्रमाणावर चळवळ उभारण्याचे काम साम्यवादी पक्षांच्या लोकांनी केले. श्रीमती गोदाताई उर्फ गोदाराणी व श्यामराव परुळेकर पती–पत्नीनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सावकार, जंगल ठेकेदार, जमिनदार यांच्या विरुद्ध तुफान प्रचार करून सारे आदिवासी संघटित केले आणि आदिवासींच्या एकीचे राज्य स्थापन केले. या राज्याला राजा नव्हता म्हणून हे राज्य निर्माण करणारी गोदीताई हिलाच साऱ्या वारल्यांनी 'गोदाराणी' बनविले.

आदिवासीचे मन सहसा कोणताही बदल मान्य करीत नाही, परंतु त्यांच्या मनाने एकदा बदल मान्य केला की त्यांना कोणी बदलू शकत नाही. साम्यवादाच्या लढ्याने आदिवासींच्या मनात बदल घडून आला. कधी न बोलणारा वारली बोलू लागला. त्याचा स्वतःवरचा विश्वास वाढला. आतापर्यन्त दीन, दुबळा, लाचार व शेकडो वर्षे सावकाराच्या छळामुळे मुर्दाड बनलेला माणूस

जागा झाला. पोट खपोटी गेले असले तरी त्याची मान ताठ झाली. त्याची अस्मिता जागी झाली. महत्त्वाकांक्षा वाढली. देशातील राजकारण समजावून घेण्याची त्याला जिज्ञासा निर्माण झाली. त्याच्या जीवनातील शल्ये त्याला बोचू लागली. वारल्यांच्या या बंडाने काय साधले या प्रश्नाला हेच उत्तर आहे. कारण क्रांती करून वारल्यांना राज्य स्थापन करावयाचे नव्हते की विधायक कार्य करणाऱ्यांना त्यांचे तत्वज्ञान गुंडाळून ठेवा असेही सांगावयाचे नव्हते. त्यांच्या जीवनाची हाक त्यांना तुमच्या आमच्या कानापर्यंत पोहचवून आम्हीही माणसे आहोत, आम्हालाही जगण्याचा हक्क आहे, हे सांगावयाचे होते.

साम्यवादाच्या लढ्यानंतर तेथे शांतता प्रस्थापित झाली. आदिवासी माणूस जागा करण्याचे कार्य या लढ्याने निर्माण केले. पण आदिवासींचा आर्थिक, प्रश्न त्यातून सुटू शकला नाही. लाल बावटयाचे प्रेम आदिवासी अद्यापही विसरू शकले नाहीत. त्याचे प्रत्यंतर आजही त्या भागात आढळते. वारल्याच्या बंडामुळे विधायक सेवाकार्य करणारी अनेक माणसे आदिवासी भागांत 'आदिवासी सेवा-मंडळा' सारख्या संस्था स्थापन करून कार्य करू लागली. त्यापूर्वीही अनेक विधायक कार्यकर्ते असे कार्य करीत होते. पण या लढ्यामुळे सावकार किंवा जमीन मालकांची शोषणक्रिया थांबविण्यासाठी आदिवासींची अस्मिता जागी करून त्यांना संघटित करण्यात त्यांचे हे उपाय कसे तोकडे होते हे दिसून आले. अशा कार्याचा विस्तार पुष्कळच वाढत जात होता. तरी पण त्याला खोली नव्हती, धगधगत्या अंगाराची दाहकता नव्हती. कारण आदिवासी सेवा मंडळाच्या कार्याच्या पाठीमागे सदिच्छामूलक समाजसेवेच्या दृष्टिकोणाच्या व्यतिरिक्त दुसरे मूलगामी तत्त्वज्ञान नव्हते. साम्यवाद्यांच्या मागे एक शास्त्रीय दृष्टीकोन होता. त्यामुळे त्याला खोली होती, आदिवासींची मने त्यामुळे त्यांनी लवकर जिंकली. दुर्दैव हे की, विमुक्त झालेल्या त्या मानसिक शक्तींना रचनात्मक कार्यात गुंतवून त्याच्या विकासाला चिरस्थायी स्वरूप देण्याचे कार्य साम्यवाद्यांना करता आले नाही. कारण त्यांच्या कार्यपद्धतीत काही दोष होते. आदिवासींचा आर्थिक लढा त्यांच्या सामाजिक प्रबोधनाचा एक भाग आहे हे मानून आदिवासींच्या अंतर्गत अपप्रवृत्तींविरुद्ध लढा न दिल्यामुळे संघटनेत पुढे पुढे कमकुवतपणा निर्माण झाला. साम्यवाद्यांबद्दल आजही आदिवासींना प्रेम आहे. पण त्यांची संघटना त्यानंतर तेथे टिकली नाही. थोडक्यात, दोन्हींही कार्यपद्धती, विचारपद्धती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आदिवासींच्या संदर्भात अपुऱ्या पडल्या. म्हणून दोन्हींचा समन्वय साधेल अशी कार्यपद्धत येथे जास्त उपयुक्त ठरेल. त्याद्वारे आदिवासींमधील उदासिनता घालवून त्यांचा स्वाभिमान जागा करता येईल व संघटित शक्तीची जाणीव निर्माण करून त्या शक्तीला सामाजिक

प्रबोधनाच्या कार्याला लावण्याचे ध्येय साध्य करता येईल. धुळे जिल्ह्यातील शहाद्याच्या भूमिलढ्यातून ही कार्यपद्धती काही प्रमाणात मान्य झालेली आहे. संघर्षाबरोबर शिक्षण आणि शिक्षणाबरोबर विकास कार्यक्रमाची जोड हे सूत्र तिथे अवलंबिल्यामुळे 'अन्यायाविरुद्ध लढा उभारणे, हक्कासाठी चळवळ उभी करणे, तसेच मद्यपान बंदीसाठी, 'सड्की मडकी फोडा' अशी स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करणे असे कार्यक्रम शक्य झाले. अन्य ठिकाणी स्थानिक परिस्थितीचा विचार करून संघटितपणाने अशा प्रकारचे कार्यक्रम राबविण्याचे प्रयोग करता येतील.

अलीकडे कांही वर्षात आदिवासी समाजात एका नव्या विचाराची लाट पसरत आहे. हा विचार म्हणजे आदिवासींच्या वेगळेपणाचा व दुर्लक्षित झाल्यामुळे उत्पन्न झालेल्या प्रादेशिक स्वयत्तत्तेच्या मागणीचा. नागा, मिझो, गारो, खासी, जंतिया, मिकीर आणि उत्तर कचार या प्रदेशातील आदिवासी जमातींची स्वायत्ततेची मागणी मान्य झाल्यावर बऱ्याच राज्यांतून, बहुसंख्येने आदिवासी असलेल्या भागातून प्रादेशिक स्वायत्ततेची मागणी मूळ धरू लागली आहे. इतकेच काय, काही राज्यातून या विचारांनी चळवळीचे स्वरूप धारण केले आहे. या विचाराचे व चळवळीचे आजचे स्वरूप काही भागांत लक्षात घेण्याइतके महत्त्वाचे नसले तरी हा विचार फोफावला तर तो दाहक बनेल. आदिवासींपासून दूर असणाऱ्या लोकांना व विद्वानांना हा विचार मान्य होण्यासारखा नाही. हा विचार आदिवासींच्या अंतःप्रेरणेपासून, ते भोगीत असलेल्या कष्टाच्या आणि दुःखाच्या दाहकतेतून निर्माण झाला आहे. केवळ राजकीय भूमिका त्यात नाही. आदिवासी सुधारणेच्या व जागृतीच्या दृष्टिने हे महत्त्वाचे पाऊल आहे असे म्हणावे लागेल.

अन्य राज्यांत, विशेषतः मध्यप्रदेश, बिहार, ओरिसातून अशा मागणीला जोर आहे. या प्रकारची मागणी गुजरात व महाराष्ट्रातही करण्यात आली आहे. या मागणीचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे सांगता येईल– ठाणे, नगर, नाशिक, धुळे, कुलाबा, पुणे जिल्ह्यात आदिवासींचा एक सलग पट्टा असून त्याचे प्रादेशिक स्वायत्तता असलेले राज्य काही पक्ष मागत आहेत. त्यांच्या मते ही मागणी एकात्मतेविरुद्ध नाही. ठाणे, नाशिक धुळे, चंद्रपूर जिल्ह्यांतील काँग्रेस व बिगर काँग्रेस आदिवासी पुढाऱ्यांनीही स्वतंत्र आदिवासी जिल्ह्याची मागणी केली आहे. ही मागणी करताना आमच्या विभागाकडे दुर्लक्ष होते, असे कारण देण्यात आले आहे. हीच तक्रार महाराष्ट्रातील अन्य आदिवासी भागाचीही आहे. या धर्तीवर गुजरातमधील आदिवासी पुढाऱ्यांनी स्वायत्त राज्य मिळविण्यासाठी 'डांगी आदिवासी सेना' उभारून 'दक्षिण गुजरात आदिवासी स्वायत्त राज्य युनियन' नावाची बिगर राजकीय संघटना स्थापन केली आहे. आदिवासींची आर्थिक पिळवणूक थांबवावी

शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उन्नति करण्याची संधी त्यांना मिळावी हे त्या स्वायत्त राज्याच्या मागणीचे उद्धिष्ट आहे. याचा अर्थ इतकाच की गेल्या पंचवीस वर्षात आदिवासीची दुःखे कमी झाली नाहीत. त्यांच्या अपेक्षाही दिवसेदिवस वाढत आहेत. त्यामुळे त्याच्यात वैफल्याची भावना निर्माण होत आहे. काळाच्या ओघात ती वाढण्याची शक्यता नाकरता येणार नाही. आदिवासीत जागृती निर्माण होऊन त्याच्या मुलभूत दुःखाची त्यांना जाणीव होत चालली आहे आणि हीच जाणीव वैफल्यांच्या पोटी त्यांच्या वेगळेपणाच्या व प्रादेशिक स्वायत्ततेच्या आघाडीचा स्थायी भाव होत आहे. महाराष्ट्र राज्यात आदिवासीसाठी गोडवन व सह्याद्री विभाग निर्माण करता येतील. या विभागात ६० टक्के आदिवासींची वस्ती आंहे. हे दोन विभाग आदिवासी जिल्हे म्हणून जाहिर झाले तर सध्या जिल्हा परिषदाकडून व जिल्हा नियोजन मंडळाकडून आदिवासी विभागाकडे जे दुर्लक्ष होते, असे असे म्हणतात ते दूर करता येईल व आदिवासी विभागाच्या विकासाची संधी आदिवासींना प्राप्त करून देता येईल. धुळे, नाशिक, ठाणे व चंद्रपूर या जिल्हयामधील निम्म्यापेक्षा अधिक तालुके आदिवासी लोकसख्येचे आहेत. त्यातून छोट छोटे आदिवासी जिल्हे निर्माण करून अविकासित आदिवासी विभागाला अधिक न्याय देता येईल. आदिवासी विकासाचा परिणामकारक मार्ग त्यातून मिळेल. आदिवासींची अस्मिता त्यातून वाढीस लागेल.



: १२ :
सामाजिक परिवर्तनाची दिशा

पंचवीस तीस वर्षांच्या कालावधींत महाराष्ट्रातील जनतेशी आदिवासींचा बराच संपर्क आलेला आहे. विचारांची, देवाणघेवाणही त्यामुळे होऊ लागली आहे. आदिवासी व बिगर आदिवासी ह्यांच्यामध्ये जिथे तीव्र सामाजिक मतभेद होते ते आज निवळलेले आहेत. आजपर्यन्त सेवा कार्यासाठी निर्माण झालेल्या संस्थांनी केलेली कामे, नि:स्वार्थी आणि सेवाभावी कार्यकर्त्यांनी केलेले कार्य व शासनाने दिलेला सहकार्याचा हात यामुळे आदिवासी समाजात सामाजिक परिवर्तनाचे नवे दालन खुले झाले आहे. वेगवेगळ्या लोकांशी संबंध येऊ लागल्यामुळे आदिवासींची बुद्धी व्यापक होऊ लागली आहे. अन्याय, जुलूम, जबरदस्ती ह्यापासून दूर ठेवण्याऐवजी अन्यायाचा प्रतिकार करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होऊ लागली आहे. शेट सावकारांना, अधिकाऱ्यांना बिचकणाऱ्या आदिवासींचा बुजरेपणा, भेकडपणा गेल्या पंचवीस तीस वर्षात पुष्कळच कमी झाला आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींत होत असलेले हे परिवर्तन वा सामाजिक बदल सर्व जमातीत व सर्व ठिकाणी एकसारखा नाही. महादेव कोळी, कोकणा, राजगोंड आणि भिल्ल या जमातीत बदल झपाट्याने होत असल्याचे दिसते. तर माडिया गोंड, कोरकू, कोलम, कातकरी आणि वारली ह्या जमाती कमीअधिक प्रमाणात आपले पारंपारिक जीवन जगत आहेत. आदिवासींच्या सामाजिक बदलाचे समालोचन करणे तसे कठीण आहे. परिवर्तनाच्या मुळाशी असलेली एक गोष्ट मात्र निर्विवाद मान्य केली पाहिजे ती म्हणजे ज्या जमाती शेती मालक म्हणून स्थिर आहेत, ज्यांच्यात बाह्य समाजाशी संघर्ष करण्याचे धारिष्ट्य व मानसिक कुवत निर्माण झाली आहे व जिथे सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांनी जागृती आणि प्रेरणा निर्माण केली आहे त्या जमातीत सामाजिक आणि आर्थिक बदल जलद गतीने होऊ लागले आहेत. त्यांच्यात विकासाची प्रवृत्ती व लालसा वाढत आहे. शिक्षणाची गोडीही वाढत आहे.

आजपर्यंत विकासासाठी झालेला खर्च मुख्यत्वे वैयक्तिक स्वरूपाच्या योजना व यंत्रणेवर झाल्यामुळे समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाची गती मंद आहे. पालेमोड योजना, खावटी योजना, कर्ज वाटप योजना, सावकारी नियंत्रण कायदा, आदिवासींच्या आर्थिक विकासाचा कायदा, एकाधिकार धान्य खरेदी योजना असे अनेक उपाय योजूनही आदिवासीला आर्थिक स्थिरता अद्याप प्राप्ती होऊ शकली नाही. सावकारी नियंत्रणासारख्या कायद्यांचा आदिवासी भागात फार थोडा उपयोग झालेला आहे. पूर्वीसारखी उघड चालणारी सावकारी आता वेगवेगळ्या मार्गांनी आडपडदा ठेवून चालविली जात आहे. सावकारी शोषणाचे स्वरूप मात्र आहे तेच आहे व एकूण परिणामही तोच आहे. जागृत झालेला आदिवासी मात्र पूर्वीची सावकारी वहिवाट मोडत चालला आहे. शेतातील सर्व पीक दुकानदार, सावकाराकडे पोहोचवावयाचे, व वर्षभर लागेल ते धान्य, कपडालत्ता, किराणा माल त्याच्याकडून आणावयाचा, हिशेब दुकानदारानेच ठेवावयाचा अशी जी स्थिती होती, ते स्वरूप बदलून धान्याचे योग्य माप देणे, सध्याचा बाजार भाव काय आहे त्याची चौकशी करणे, पैशाचा हिशेब लगेच घेणे हे प्रकार वाढू लागले आहेत. पूर्वीच्या प्रकारात आपले नुकसान होत होते, शोषण होत होते, त्याची त्यांना जाणीव होत आहे. हंगामात धान्य स्वस्त भावाने घ्यायाचे व पावसाळ्यात दीडीदुपटीने द्यायचे. कायम कुळ पकडून ठेवण्यासाठी प्रसंगी किंवा नेहमीच काही रोख पैसा द्यावयाचा. शहामत अशी की, त्याच्याकडून व्याज घ्यावयाचे नाही, पण आपल्या मालावर भरपूर नफा घ्यावयाचा, किंवा हंगामात त्याचा माल पडत्या भावाने विकत घेऊन त्यावर चांगला नफा कमवावयाचा. अशी ही परंपरागत चालत आलेली व अजगरासारखे विळख्यावर विळखे

घालणारी पक्कड ढिली होत चालली आहे. आदिवासींच्या आर्थिक सामाजिक परिवर्तनासाठी व विकासासाठी शासनाने कार्यांवीत केलेल्या योजनाचा, कायद्याचा व नियमाचाही त्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. सर्वसाधारण शिक्षणाचा प्रसार व प्रचार, राजकीय जागृती, काटकसर, शेती सुधारणा व बदलती शेती सोडून कायम पद्धतीची शेती करण्याची प्रवृत्ती, उपक्रमशीलता हिशेबीवृत्ती, भविष्यकाळाची विचार व वाढत्या गरजाची निर्मिती त्यामुळे वाढत चालली आहे.

आदिवासींच्या सामाजिक जीवनासंबंधी म्हणवायाचे तर त्यांच्या एकंदर राहणीमानात फरक पडू लागला आहे. त्यांच्या पारंपारिक जीवनात आता खूप बदल झाल्याचे आढळून येतात. पुढील गोष्टी त्याला मुख्यतः कारणीभूत ठरलेल्या आहेत. कर्जनिवारण विषयक व जमीन सुधारणा विषयक कायदे, आदिवासींच्या विकासासाठी खास प्रकारच्या योजना, आदिवासी विकास गट, पालेमोड योजना, क्षेत्रविकास योजना, आदिवासी विकास महामंडळ, शासकीय पातळीवरील आर्थिक नियोजन, पंचवार्षिक योजनांतर्गत कुटुंबनियोजन, आरोग्य सुधारणा, पाणी पुरवठा, सहकारी शेती, पत पुरवठा, जंगल कामगार सहकारी संस्था, सर्वोदय योजनांतर्गत हाती घेण्यात आलेले कार्यक्रम, पंचायती राज्य, आश्रम शाळा, शेतीशाळा, शैक्षणिक संस्था, वसतीगृहे, प्रवास व दळणवळणाच्या साधनात झालेली वाढ, नव्याने स्थापन करण्यात आलेले उद्योग, व्यवसाय केंद्रे, भोवतालच्या प्रदेशाचे झपाट्याने होत चाललेले नागरीकरण, राजकीय पक्ष व सामाजिक कार्यकर्ते इत्यादींचा नित्य व वाढता संचार यामुळे आदिवासींचे पारंपारिक जीवन बदलत चालले आहे.

हे बदल मुख्यतः अन्न व वेषभूषाविषयी त्यांच्या संवयी, रूढी. नितीमूल्ये, प्रतिष्ठामूल्ये, अंतर्गत संघर्ष मिटविण्याची व दोषी व्यक्तींना शिक्षा करण्याची पद्धती, स्त्री-पुरुष विवाह व संबंध विषयक कल्पना, धार्मिकविधी, भूतपिशाच्च विषयक कल्पना, आरोग्य विषयक संवयी, नागरी समाज व सर्व साधारण बाह्य जागा या विषयी यांच्या कल्पना इत्यादींच्या बाबतीत निश्चितपणे घडून येत आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टया पुढील चार बाबीतील बदल आदिवासी समाज-जीवनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे वाटतात.

आदिवासी समाजातील सामाजिक नियंत्रण ठेवणारी पारंपारिक पद्धती आता बहुंताशी निकामी बनली आहे. प्रत्येक जमातीत पूर्वी त्याची स्वतंत्र जमात पंचायत (Tribal Council) होती. या पंचायतीचा आपापसात होणारे वाद मिटविण्यासाठी, गुन्हेगार व्यक्तींना शिक्षा करण्यासाठी व व्यापक अर्थाने समाजाचे नियंत्रण करण्यासाठी उपयोग केला जाई. त्यांच्यात शिक्षेचे व गुन्ह्याचे स्वरूपही

: १३ :

एकसंघ समाजजीवनाच्या दिशेने

गेल्या दीडशे वर्षात अनेक सामाजिक भेदाना मूठमाती देणारी सामाजिक मूल्ये प्रस्तापित झाली आहेत. त्यामुळे दुबळचा आणि मागासलेस्या लोकांत सामाजिक दृष्टीने सुधारणा होऊ लागल्या आहेत. आदिवासी लोकांच्या दृष्टीने ते मागासलेलेच आहेत. खरे पाहता त्यांची गणना उपेक्षित व शोषित वर्गांतच केली पाहिजे. त्यांच्या सामाजिक परीस्थितीविषयी किंवा सामाजिक सुधारणेसंबंधी विचार करताना भोवतालच्या व्यापक अशा बहुजन समाजाशी तुलना करून केला पाहिजे. कारण सामाजिक सुधारणेचा मूळ हेतू या सर्व जमातीना शेवटी आपल्याला राष्ट्रीय उन्नतीच्या व्यापक प्रवहांत सामील करून घ्यावयाचे आहे हा आहे. आदिवासी समाज सुधारणेच्या प्रवाहापासून फार दूर आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे शेकडो वर्षे दऱ्याखोऱ्यात व जंगलात राहिला गेल्यामुळे एकलकोंडा व आशाहीन झालेला आहे. त्यामुळे त्यांच्यात मागासलेपणा राहिला असल्यास नवल नाही. तशात या समाजाकडे पाहण्याची आपली दृष्टी तितकीशी विशुद्ध नाही. अगोदर आपला आदिवासींशी संबंध येत नव्हता. गेली काही वर्षे तो संबंध वाढत चालला आहे. पण त्यांच्याकडे पाहण्याचा आदिवासी तेरांचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. त्यांना कमी लेखण्याची, तुच्छतेची व दूरत्वाची भावना बदलली गेली पाहिजे. म्हणजेच आदिवासींच्या संदर्भात बाह्य समाजाच्या विचार–आचारातील विसंगती दूर झाल्याशिवाय आदिवासींच्या सामाजिक सुधारणेला खरा अशय प्राप्त होणार नाही. आज आदिवासींकडे ज्या वृत्तीने पाहिले जाते त्या विचार प्रवृत्तीचा एक नैसर्गिक परिणाम म्हणजे आदिवासीला आपण देखील कोणीतरी हीन, दुबळे, कमी प्रतीचे आहोत असे वाटायला लावणे हा होय. अशा प्रकारचां न्यूनगंड त्यांच्यात निर्माण झाल्यामुळे सर्व सामाजिक, आर्थिक व अन्य सुधारणाकडे आदिवासी अतिशय उदास वृत्तीने पाहतात. त्यांच्यातील ही उदासीनवृत्ती नाहीशी करून देशातील इतर नागरिकाप्रमाणे आपणही या देशाचे जबाबदार नागरिक आहोत अशी जाणीव निर्माण करून ग-वेगळचा पातळीवर त्यांना संघटित केले पाहिजे.

सारा आदिवासी समाज आज एका संक्रमणावस्थेतून जात आहे. त्याना आवडो अगर न आवडो बाहचजगाशी त्यांचे संबंध वाढू लागले आहेत. त्यामुळ

त्यांच्यात सामाजिक बदलाची प्रक्रिया वाढत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाज या बाबतीत बराच आघाडीवर आहे. सभोवतालच्या बहुजन समाजाशी तो एकरूप होऊ लागला आहे. म्हणून त्यांचे हे सामाजिक आणि सांस्कृतिक मीलन निरोगी, एकजिनसी व मानसिक दृष्टचा एककेकांना जवळ आणणारे होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे जरूरीचे आहे. तसेच सांस्कृति संगमाच्या या कार्यात काही समाज विध्वंसक दोष प्रवृत्ती वाढीस लागणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. संस्कृति संगमामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीची दखल न घेता तिच्याकडे दुर्लक्ष केले तर समाज प्रबोधनाच्या व राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने ती चूक होण्याची शक्यता आहे.

आदिवासींना विकासापासून दूर ठेवणे आता शक्य नाही. पण त्याचवेळी त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीचा विचारही लक्षात घेतला पाहिजे. आज ते दारिद्र्यात आहेत. त्यांची ही स्थिती सुधारून त्यांच्या सर्वांगीन विकासाची वाट मोकळी करून देणे, त्यांना व्यापक राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनात समाविष्ट करून घेणें हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. हे ध्येय साध्य करवयाचे तर आपण आदिवासींच्या जीवनाचा, त्यांच्या संस्कृतिचा, आर्थिक, सामाजिक समस्यांचा व लोकजीवनाचा सर्वांगीण विकास करून त्यांना समजावून घेतले पाहिजे. त्यांच्यातील व आपल्यातील मानसिक अंतर प्रथम दूर करून आदिवासी कोणीतरी वेगळे आहेत ही भावना नष्ट केली पाहिजे. आदिवासींना काय हवे ह्याचे निरीक्षण आणि चिंतन न करता समाज सुधारकांना समाज परिवर्तनांची घाई झालेली आहे. त्यामुळे कार्य आणि सेवा बाजूस राहून ही सारी मंडळी आपल्याला काहीतरी शिकविण्यासाठी आलेली आहेत, अशी परत्वाची भावना आदिवासींत निर्माण होते त्याची दखल घेतली गेली पाहिजे.

आदिवासी समाज हा भारतीय समाजात अभिन्नत्वाने मिसळून जावा हे उद्दिष्ट असले तरी ते कसे घडून आणावयाचे यासंबंधी काही कल्पना सुस्पष्ट केल्या पाहिजेत. भौतिक दृष्टीने प्राथमिक अवस्थेत असलेल्या आदिवासींच्या प्रश्नांचे स्वरूप व्यापक आणि मूलभूत स्वरुपाचे असल्यामुळे सर्व विचारसरणीच्या लोकांनी व त्यांनी केलेल्या प्रयत्नानीच त्यांची उकल स्पष्ट होण्याची शक्यता आहे. यासाठी काही निश्चित कार्यक्रमाची आखणी व योजना करावी लागेल. कोणत्याही विचारप्रणालीचा आग्रह धरणारा कार्यकर्ता असो, त्याला हे मान्य करावे लागेल की आदिवासींची जी काही मोडकी तोडकी संस्कृती आहे, तिचा जन्म दारिद्र्यात झालेला आहे. अशी संस्कृती ही एक विशिष्ट मर्यादेपलिकडे मनुष्याच्या विकासाला सहाय्यभूत होऊ शकत नाही. म्हणून

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या व सांस्कृतिक मिलनाच्या योजना आखताना प्रथम आदिवासींच्या जीवनांत भौतिक समृद्धी आणली पाहिजे आणि ही भौतिक समृद्धता त्यांच्यापुढील विकासाचा प्रस्थान विंदू मानला पाहिजे. समृद्धी यावयाची ती अर्थात प्रायः आदिवासींच्या प्रयत्नाने आली पाहिजे.

देशांत सारे लोक गरीब आहेत. पण आदिवासीची गरीबी त्याहून थोडी निराळी आहे. तेथे दारिद्र्याची परमावधी झालेली आहे. अशा दारिद्र्यातून त्यांची सुटका करावयाची तर सावकार, जमीनदार आणि धनिकांकडे गेलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परतमिळवून दिल्या पाहिजेत. पडीक जमिनीचे वाटप व जंगल विभागातील जमिनीचे वाटप करून सहकारी पद्धतीने शेती करण्याचे व त्यासाठी लागणारी सारी साधन-सामुग्री, बांध बंदिस्ती, पाणी पुरवठा वगैरेसंबंधीच्या योजनांना आदिवासी भागात अग्रक्रम देऊन या प्रश्नाची सोडवणूक केली पाहिजे. आदिवासी मजुरांना कामधंदा पुरविण्याच्या दृष्टीने जंगल उद्योग, जंगल लागवड, जंगल संवर्धन ही कामे आदिवासींकडून करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देता येईल. त्याबरोबर आदिवासींमधील काही विघातक बाबी उदा. कर्जबाजारीपणा, व्यासनाधीनता, काम न करण्याची प्रवृत्ती, धर्म विधीचे स्तोम, औषधोपचार करण्याची अनिच्छा इत्यादि गोष्टी दूर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत शिक्षण आणि आरोग्य हेही प्रश्न त्याबरोबरच महत्त्वाचे आहेत. बाह्यजगाच्या संपर्कासाठी पूर्वी दळणवळणाची साधने नव्हती. ती आता वाढत आहेत. आदिवासी विभागात उत्तरोत्तर त्याची वाढ झाल्यास आदिवासी समाज मानसिक व भौगोलिकदृष्टचा बाहय जगाच्या व शेजारील समाजाच्या जवळ येईल. हे सारे घडून यायचे तर आदिवासींच्या प्रश्नाचा देशाच्या व्यापक हिताच्या पार्श्वभूमीवर विचार करून समृद्धीच्या मार्गाकडे नेणारे नवे नेतृत्व त्यांच्यातून निर्माण केले पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजास जसे त्यांच्यात मूलभूत बदल घडविणारे नेतृत्व दिले तसे नेतृत्व जरी आदिवासीला प्राप्त होऊ शकले नाही तरी त्यांच्यातून सामुदायिक नेतृत्व निर्माण होण्याला परिस्थिती अनुकूल आहे. अशा वेळी आदिवासी कार्यकर्त्यांनी आपली संकुचित, स्वार्थी, आत्मसमाधानी वृत्ती सोडून चौकस बुद्धीने साऱ्या विचार प्रणालीचा अभ्यास करून पुढचे पाऊल टाकले म्हणजे आदिवासी समाजाला नेतृत्वाची व विकासाची योग्य दिशा मिळेल.

कोणत्याही समाजात बदल हा घडतच असतो, बदलणे हे समाजाचे नित्यासिद्ध अंग आहे. मानवेल, पचनी पडेल इतका वेग असे तो बदलाचे परिणाम जाणवत नाहीत. दोन्ही समाजात काहीच साम्य नसेल व बदल क्रांतीकारक असतील तर मात्र विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. वस्ती जास्त एकवटलेली

वे बिगर अनुसूचितापासून तुटक आहे तिथे अनुसूचित जमातींच्या वागण्या-राहण्यातील परिवर्तन संथपणे होत आहे. मिश्र वस्तीत अटळ असलेल्या देवाण-घेवाणीमुळ परिवर्तनाची गती वाढत आहे. सहजीवन सुखावह करून ऐक्य भावनेचा परिपोष करणे हा निकटवासियांच्या देवाण–घेवाणीतून निपजणाऱ्या परिवर्तनाचा स्वाभाविक परिपाक आहे. अस्मितेची भावना व जाणीव ही परिवर्तन विरोधी होणार नाही व अविवेकी अभिमानाला उत्तेजन देऊन ही अस्मिता प्रसंगी ऐक्यविघातक ठरणार नाही याची दक्षता नव्या समाजरचनेत घेतली पाहिजे. आदिवासींमध्ये पांढरपेशाच्या सहवासामुळे उत्पन्न झालेले दोष त्यांच्याच सहवासाने हळूहळू घालविले पाहिजेत. शेजाऱ्यांचे नीटनेटके कपडे पाहून तशी कपडे घालायला, स्वच्छ कपडे ठेवायला आदिवासी शिकेल. वेगवेगळचा लोकांचा संबंध आल्यावाचून दृष्टी व्यापक होत नाही. अन्याय, जुलूम, जबरदस्ती यापासून आदिवासींना दूर ठेवण्याऐवजी अन्यायाचा प्रतिकार करण्याची जिद् त्यांच्यात निर्माण करणे जास्त हितावह होय. वाघाला न घाबरणारा आदिवासी शेठ सावकाराला व अधिकाऱ्याला बिचकतो, घाबरतो. उन्मत्त व जुलमी लोकांना दूर ठेवण्याऐवजी त्यांना बहुसंख्य आदिवासींवर अन्याय, जुलूम, जबरदस्ती करण्याची छाती होऊ नये इतपत आदिवासीचे मन बळकट करता येणार नाही काय ? अशानेच आदिवासी आपल्या पायांवर उभा राहण्यास शिकेल. स्वातंत्र्योत्तर गेल्या ३० वर्षांत आपल्याला असा फरक दिसतो आहे. आज अनेक आदिवासींचा बुजरेपणा नष्ट झाला आहे. कोठे दिसलाच तर तो स्वार्थाच्या, असहाय्यतेच्या, अगतीकतेच्या पोटी निर्माण झालेला असतो. पूर्वीचा सच्चा आदिवासी आता लबाडी करू लागला म्हणजे लबाडीबद्दल खंत करण्यापेक्षा त्याची भिती नष्ट झाल्याचा आपण आनंद मानावयास हवा. गुणदोषाचा मक्ता पांढरपेशानेच घेतलेला नाही ! खोलीत नळ असणाऱ्या शहरी पांढरपेशाने कोसावरून पाणी आणणाऱ्या आदिवासींना त्रिकाळ स्नानावर व्याख्यान झोडणे कितपत योग्य होईल ! अन्य भारतीयांप्रमाणे आदिवासीचे जगही त्यांच्या जातीजमातीपुरते मर्यादित असते. परिस्थिती सुधारली, अन्य समाजांत मानाचे स्थान मिळू लागले व त्यांची आपल्या जगाची कल्पना विशाल झाली की आदिवासीही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या अन्य लोकांशी सरळपणाने व प्रेमाने वागू लागतात असा अनुभव आहे.

शिकलेल्या व सुधारलेल्या लोकांनी राष्ट्रकार्य समजून आदिवासींत मिसळले पाहिजे. आदिवासींसारखा मागास समाज हा राष्ट्राच्या साखळीतील कमकुवत दुवा आहे. हा दुवा पक्का झाल्याविना देश सामर्थ्यशाली होणार नाही. देशातील चार कोटी आदिवासींचे कर्तृत्व संधीच्या अभावी देशहिताला पारखे राहणे कोणाच्याच हिताचे नाही. आपल्या कार्यापेक्षा आपली दृष्टी व वृत्ती जास्त

महत्त्वाची व फलदायी आहे. उपकार करण्यापेक्षा मानाने वागविणे जास्त महत्त्वाचे आहे. आदिवासींना आपल्या पंक्तीत बसवून त्यांची पाठ वळल्यावर त्यांची चेष्टा, निंदा, टवाळी करणाऱ्यांची 'प्रेमहीन व दिखाऊ समानता' अनुसूचितांना उमगत नाही असे थोडेच आहे? उलट पांढरपेशांनी कमीपणाने वागविले तर त्यांच्या अशा वागणुकीचा ठसा अनुसूचितांच्या मनात खोलवर राहतो. 'उपकार, सहाय्य विसरणे व अपमान लक्षात ठेवणे' हा मनुष्यस्वभाव आहे. सेवकांमध्ये उच्चपणाची भावना असता कामा नये. परोपकाराचीही भावना नको. पांढरपेशाप्रमाणे आदिवासींमधे बरेवाईट, शहाणे–मूर्ख, कामसू–आळशी, हुशार–मंद, साव–चोर, शूर–भित्रे, नम्र–उद्धट, स्वाभिमानी–लाचार, समजुतदार–हेकेखोर, दयाळू–क्रूर इत्यादी मानवी भेद असतात व ते राहणार. प्रमाण कमी जास्त असेल इतकेच. आपण आदिवासींना देव माणसे म्हणून पुजू नये, तसेच दास म्हणून तुच्छ समजून त्यांचा तिरस्कारही करू नये. त्यांच्याशी 'ना देवी ना दासी' ही वृत्ती ठेवून बरोबरीच्या नात्याने वागले पाहिजे. पांढरपेशांनी सहानुभूतीने व प्रेमाने कार्य केले तर आदिवासींच्या राहणीत व वृत्तीत बदल घडून येण्यास वेळ लागणार नाही. या सहकार्यांतील आपला वाटा उचलण्यास आपण सर्वांनी स्वच्छ दिलाने पुढे सरसावले पाहिजे.

आदिवासींच्या सुधारणेसाठी खटपट करताना ते पुनः च्युत होणार नाहीत; मागे येणार नाहीत हे पाहवयास हवे. त्या दृष्टीने पाहतां आदिवासी वर्गासाठी काम करणाऱ्या खात्यांना कायमचे क्षेत्र राहील असे दिसते. कर्तबागारीला वाव न मिळाल्यामुळे माणसाची कुचंबणा होऊ नये व त्यांच्या कर्तबगारीस समाजाला मुकावे लागू नये हे पहावयाचे काम कायम स्वरूपाचे आहे. तथापि समान परिस्थितीत काही लोक सुधारतात; काही आहे तेथे राहतात व काही मागे पडतात असेही आपण पाहतो. आदिवासीही त्याला अपवाद नाहीत. हे असे का होते? याचा अभ्यास व्हावयास हवा. कोणत्याही सवलती व शिक्षणाची सोय नव्हती अशा काळीही काही आदिवासी गरिबीतूनही पुढे आले व त्यांनी आपली प्रगती साधली. ह्यापैकी काहींनी स्वकीयांना लुबाडून व खोट्या मार्गांनी आपली उन्नती साधली असली तरी काही जण दीर्घ उद्योग, कष्ट, निर्व्यसनीपणा व काटकसरीची राहणी या गुणांमुळे पुढे आलेले आहेत. खोट्या मार्गांनी पैसे मिळवून ते व्यसनांत उडवून शेवटी भिकारी ते भिकारी असे अनेक लोक समाजांत आपण पाहतो. खरे तर पैसे कमवायचे कसे याहून ते खर्च करावे कसे याला जास्त अक्कलहुशारी लागते. येथेच खरा जीवनमूल्याचा प्रश्न येतो. आर्थिक परिस्थिती सुधारलेल्या स्वकीयांचा आदिवासी पुढे आदर्श असतो व त्यांचे मार्ग अनुसरण्याचा व त्यांच्याप्रमाणे राहणी व वागणूक ठेवण्याचा आदिवासी प्रयत्न करतात.

इतरेजणांची राहणी त्यांना परकी वाटते. आजवरच्या सहाय्याचे व सेवाकार्यांचे आदिवासींच्या जीवनावर, राहणीवर व मनावर झालेले परिणाम पडताळून पाहणे फायद्याचे आहे. मनाचा विचारावर व विचारावर आचाराचा परिणाम होत असल्याने मनःस्थितीवर होणारे परिणाम परिस्थितीवर होणाऱ्या परिणामापेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत. मनःस्थिती बदलल्यामुळे परिस्थिती बदलली नसेल तर परिस्थितीतील बदल दिखाऊ व अल्पजीवी ठरावयाचा. राहणीमान वाढवावे, नीटनेटके रहावे अशी इच्छा, आंच मनात निर्माण झाल्याविना बाहेरून सहाय्याचा पाऊस कोसळला तरी माणूस कोरडाच राहील. 'बीज न पेरावे खडकी...ओल नाही ज्याचे बुडाशी' ही आंच सरकारी योजना आदिवासींत निर्माण करू शकल्या नाहीत. चिनी म्हण आहे की, 'गरीबाला मासा दिलात तर तो एक वेळ भूक भागवील, पण त्यास मासे मारावयास शिकविले तर त्याचा पोटाचा प्रश्न सुटेल.' योजनांतून आदिवासींची अशी सोडवणूक झाली पाहिजे. त्याच्या पोटाचा प्रश्न त्याला कायमचा सोडवता आला पाहिजे. म्हणून शेवटी आदिवासींना 'आपली आपण करा सोडवण' या ज्ञानेश्वरांच्या शिकवणीपर्यंत आणले पाहिजे त्याविना आदिवासी विकास हा पाण्यावरील केवळ बुडबुडा ठरेल.



परिशिष्ट नं. १

आदिवासी जमाती व जिल्हावार त्यांची लोकसंख्या

अ. नं.	आदिवासी जमातीचे नाव	लोकसंख्या	जिल्हानिहाय आदिवासी जमातींची संख्या
	१	२	३
	महाराष्ट्रातील आदिवासी जमाती	२९,५४,२४९	
१.	आंध	७५,१६२	परभणी ४०,९३६, नांदेड २८,५५५, यवतमाळ ५,६७१.
२.	भिल्ल	६,७८,७५०	धुळे ३,५८,०८८, नासिक १,३५,७३६, जळगाव ८७,०१५, अहमदनगर. ५७,४१६, औरंगाबाद ३०,८०१.
३.	धानका	५३,६४९	धुळे ३५,५१९, जळगाव १७,९६९
४.	धोडीया	९,९३६	ठाणे ६,१२३, मुंबई ३,४५८.
५.	दुबळा	१२,४७४	ठाणे ७,९७५, मुंबई ३,७९५.
६.	गामीत	१,२८,८३१	धुळे १,२८,५८९.
७.	गोंड	३,३१,७९८	चांदा २,०३,९०५, यवतमाळ १,०२,४७२, नांदेड १५,७८६.
८.	हलबा, हलबी	७,२०५	चंद्रपूर ५,३३१, यवतमाळ १,७११.
९.	कायोडी, कातकरी	१,४६,७९५	कुलाबा ६७,५६३, ठाणे ५६,३३०, पुणे ७,१०१, नासिक ३,८०४, रत्नागिरी ९,४५३.
१०.	कवर	२,८७७	चंद्रपूर २,८७२.
११.	खारीया	३,८२७	यवतमाळ ३४१९.
१२.	कोकणा	२,६४,००९	नासिक १,६४,४६९, धुळे ६५,४७० ठाणे ३३,००३.
१३.	कोलाम	५६,०६१	नांदेड ३,६२६, चंद्रपूर २,५५६, यवतमाळ ४९,७७५.

१	२	३
१४. कोळी ढोर	४३,५२८	पुणे ३,८८५, मुंबई ५,५५३, ठाणे ५,६९७, नासिक ५,९९४, धुळे ७,४८८. जळगांव ६,२५४, अहमदनगर ५,९००
१५. कोळी महादेव किंवा डोंगरकोळी	३,३९,८५५	नासिक १,८१,०८३, पुणे ६३,९०९ अहमदनगर ५७,७७९, ठाणे २९,६६०, कुलाबा ७,४२४.
१६. कोळी मल्हार	९९,६१३	ठाणे ९९,६१३.
१७. कोरकू	६७,७४२	अमरावती ६७,७१३.
१८. निहाल	३,६०४	अमरावती ३,६०४.
१९. नायकडा	९,३१५	धुळे ५,४८७.
२०. परधान	५९,९१०	यवतमाळ ३२,३३८,चंद्रपूर १४,५८१. नांदेड २,९३०.
२१. पारधी	२४,९५६	नासिक १,०९९, अहमदनगर १,७८०. सोलापूर ५,६४३, धुळे ४,१३४, जळगाव ७,३३५, यवतमाळ १,८५७.
२२. ठाकर (का. व मा. ठाकर)	१,७८,८०५	ठाणे ७५,५६३, कुलाबा ३०,०४४, पुणे २३,७१७, नासिक २८,२५५, अहमदनगर २१,२२६.
२३. वारली	२,९३,९३१	ठाणे २,६१,७५३, नासिक २६,९६७, मुंबई ४,८८७.
२४. विटोलिया	१,०३१	धुळे ९५१.
२५. अनिर्धारित	६८,६२०	कुलाबा ८,०७६, नासिक १२,४८८, धुळे ७,८२१, जळगांव ५,०७४, बृहन्मुंबई ९,७३३.
आदिवासी जमाती (१ हजार लोकसंख्येपेक्षा कमी संख्या असणाऱ्या २० जमातींची लोकसंख्या)		

परिशिष्ट नं. २

जिल्हावार आदिवासी लोकसंख्येचे एकूण आदिवासी लोकसंख्येशी शेंकडा प्रमाण

(१९७१ च्या जनगणनेनुसार)

राज्य–विभाग-जिल्हा	एकूण आदिवासी लोकसंख्या	आदिवासी लोकसंख्येचे एकूण आदिवासी लोकसंख्येशी शेंकडा प्रमाण	आदिवासी लोक संख्येचे एकूण लोकसंख्येशी शेंकडा प्रमाण
१	२	३	४
महाराष्ट्र :	२९,५४,२४९	१००.००	५.८६
१. मुंबई विभाग	२०,३५,१५१	६८.८९	११.५२
मुंबई शहर	३०,०१६	१.०२	०.५०
ठाणे	५,७९,८३८	१९.६२	२५.४०
कुलाबा	१,१३,५०२	३.८४	८.९९
रत्नागिरी	१०,०६६	०.३४	०.५१
नासिक	५,६१,२०२	१९.००	२३.६९
धुळे	६,१५,८०१	२०.८४	३७.०५
जळगाव	१,२५,०२६	४.२३	५.८९
२. पुणे विभाग	२,७२,६४०	९.२२	२.०९
अहमदनगर	१,४५,७८३	४.९३	६.४२
पुणे	१,०८,४०५	३.६७	३.४१
सातारा	३,६३०	०.१२	०.२१
सांगली	२,४२५	०.०८	०.१६
सोलापूर	८,६०८	०.२९	०.३८
कोल्हापूर	३,८०९	०.१३	०.१९
३. औरंगाबाद विभाग	१,३७,७०८	४.६७	१.७१
औरंगाबाद	३२,३००	१.०९	१.६४
परभणी	४२,१०१	१.७३	२.७९
बीड	४,३९४	०.१५	०.३४
नांदेड	५६,३०९	१.९१	४.०३
उस्मानाबाद	२,६०४	०.०९	०.१४

१	२	३	४
४. **नागपूर विभाग**	५,०८,७५०	१७.२२	४.३६
० वुलढाणा	—	—	—
० अकोला	—	—	—
० अमरावती	७९,३७१	२.६९	८.१५
० यवतमाळ	१,९७,९७७	६.७०	१३.९१
० वर्धा	—	—	—
० नागपूर	—	—	—
० भंडारा	—	—	—
० चंद्रपूर	२,३१,४०२	७.८३	१४.११

० ह्या जिल्ह्यांच्या अनुसूचित क्षेत्रावाहेर सुमारे ८ लाख आदिवासी लोकसंख्या आहे. १९७१ च्या जनगणनेत त्यांची गणना झालेली नाही. क्षेत्रबंधन उठविल्यानंतर येथील आदिवासींना सवलतीचा लाभ मिळू लागला आहे.

परिशिष्ट नं. ३

१० टक्क्यांहून अधिक आदिवासी लोकसंख्या असलेले तालुके

(१९७१ च्या जनगणनेनुसार)

जिल्हा	तालुका	एकूण आदिवासी लोकसंख्या	एकूण लोकसंख्येची आदिवासी लोकसंख्येचे शे. प्रमाण
१	२	३	४
पुणे	आंबेगाव	२७,६२२	१९.८३
	जुन्नर	३५,४५६	१७.०१
	खेड	२२,४६१	११.४०
अहमदनगर	अकोला	६६,१३३	४४.७७
ठाणे	मोखाडा	५०,४११	९२.६२
	जव्हार	८५,३२८	८८.९८
	तलासरी	४७,१४२	८६.३१
	डहाणू	१,२१,५२४	६४.९३
	वाडा	४०,९९५	४८.८५
	पालघर	७४,९५४	३५.१२
	शहापूर	४५,८७९	३२.०१
	मुरबाड	२३,२०४	२३.४०
	वसई	३२,३०४	१५.१६
	भिवंडी	२८,४१४	११.५५
रायगड	कर्जत	२५,९८०	२३.५९
	खालापूर	१५,१९८	२१.०२
	सुधागड	९,११७	२०.३०
	पेण	१२,१५२	१२.१३
नासिक	सुरगाणा	६६,७७१	९५.७७
	पेठ	७७,७८८	९४.४३
	कळवण	५९,६५८	४७.९८
	दिंडोरी	६५,३७९	४७.७६
	इगतपुरी	५१,६३०	३७.६२
	त्र्यंबकेश्वर	५७,६७९	२९.२६

१	२	३	४
	चांदवड	१६,६८४	१४.२२
	निफाड	३०,३४५	१४.००
	नासिक	५७,३७९	१३.५१
	नांदगांव	१५,७५०	१०.७६
	सिन्नर	१७,६२२	१०.७८
धुळे	आक्राणी (महाल)	४३,०३४	९४.३३
	नवापूर	१,१४,०८२	८६.८०
	अक्कलकुवा	६६,५५०	८४.५५
	तळोदा	४४,४३०	६३.४८
	साक्री	१,०२,१९९	४३.८०
	शहादा	७९,७५८	४३.४८
	शिरपूर	३७,३२४	२४.२६
	सिंदखेडा	२४,५५८	१२.१७
अमरावती	मेळघाट	७९,३७१	७३.६६
यवतमाळ	केळापूर	८१,४१७	३२.१६
	वणी	५१,६१५	२४.९७
	यवतमाळ	६४,९४५	२३ ८०
चंद्रपूर	सिरोंचा	७४,३३१	५२.९०
	गडचिरोली	१,२३,२३४	३२.२८
	राजुरा	३३,८३७	२६.८७
परभणी	कळम्मनुरी	२०,४५०	१२.८५

परिशिष्ट नं. ४ ।

अनुसूचित जमाती

(१३-२-१९७८ पासून)

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा १९७६ (१९७६ चा १०८ चा) मधील परिशिष्ट १ मधील भाग ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

१. आंध
२. बैगा
३. बेरडा
४. बावचा, बामचा
५. भैना
६. भारिया, भूमिया, भुइनआर, भूमिया, पांडो
७. भात्रा
८. भिल्ल, भिल गरासिआ, ढोली भिल, डुंगरी भिल, डुंगरी गरासिया, मेवासी भिल, रावल भिल, तडवी भिल, भगालिया, भिलाल, पावरा वसावा, वसावे.
९. भुंजिया
१०. बिझवार
११. बिरहुल, बिरहोर
१२. चोधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे सोडून)
१३. ढाणका, तडवी, तेतारिया, वळवी
१४. धनवार
१५. धोडिया

१६. दुबळा, तलाविया, हलपाटी.

१७. गामित, गामटा, गावित, मावची, पाडवी.

१८. गोंड, राजगोंड.

आरख, अराख, अगारिया, असूर, बडीमारिया, बडामारिया, भाटोला, भिम्मा, भूता, कोइलाभूता, कोइलाभूती, भार, बिसन हॉर्न मारिया, छोटा मारिया, दंडामी मारिया, धुरू, धुरवी, धोबा, धुलिया, डोरला, गायकी, गट्टा, गट्टी, गायता, गोंडगोवरी, हिल मारिया, कांदरा, कलंगा, खटोला, कोयतार, कोया, खिरवार, खिरवारा, कुच मारिया' कुचकी मारिया, माडिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मोगिया, मोंघ्या मुडिया, मुरिया, नागरची, नाइकपोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी झंरेका, थाटिया, थोटचा. वाडेमारिमा, वडेमारिया.

१९. हलबा, हलबी.

२०. कमार.

२१. काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोनकाथोडी, सोन कातकरी.

२२. कवर, कांवर, कोर, चेरवा.

२३. खैरवार.

२४. खरिया.

२५. कोकणा, कुकणी, कुकणा.

२६. कोल.

२७. कोलाम, मुन्नेरवारलू.

२८. कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा.

२९. महादेव कोळी, डोंगरकोळी.

३०. कोळी मल्हार.

३१. कोंध, खोंड, कांध.

३२. कोरकू, बोपची, मोवासी, निहाल, नहूल, बोंधी, बोंडया,

३३. कोया, भिनेकोया, राजकोया.

३४. नगेसिया, नगासिया.

३५. नाइकडा, नायका, कापडिया नायका, चोळीवाला नायका, मोटा नायका, नाना नायका.

३६. उराँव, धनगड.

३७. परधान, पाथरी, सरोटी.

३८. पारधी, आडवी चिचेर, फासे पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, शिकारी, टांकणकर, तकिया.

३९. परजा.

४०. पटेलिया.

४१. पोमला.

४२. राठवा.

४३. सवर, सवरा.

४४. ठाकूर, ठाकर, का–ठाकूर, का–ठाकर, मा–ठाकूर, मा–ठाकर.

४५. थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यांत व चंद्रपूर जिल्ह्याच्या राजुरा तहसीलमध्ये)

४६. वारली.

४७. विटोलिया, कोटवालिया, बारोडिया.

REFBK-0023444

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
२०१७
शाखा (स्थळ प्रत)